

# माणूस

नव्या पिढीचे नवे पाक्षिक : १ ऑक्टोबर १९६४

किंमत ५२ पैसे

कॅल्शियमयुक्त

बिटको

ग्राइप

नेहमी दिल्याने

लहान मुले सशक्त बांधेसूद

व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

बिटको

काळी टूथ पावडर

नेहमी वापरल्याने

दात मोत्यासारखे स्वच्छ

व चकचकीत होतात.

बिटको केमिकल इंडस्ट्रीज, नाशिक रोड

वर्ष चौथे : अंक सहावा

★

१ ऑक्टोबर १९६४ : बावन्न पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २

दूरध्वनी : ५७३५९





## स्वरूप दर्शन


व्यक्ती आणि वार्ता :

- श्री. एस्. एम्. जोशी
  - **श्री. ग. मा.**

कथा :

- दाब
  - **शरद काळे**
- अनोळखी
  - **सौ. विजया देखणे**

कविता :

- गोपीनाथ तळवलकर
- राजा महाजन
- प्रभा गणोरकर

पुस्तकपरिचय :

- नाझी भस्मासुराचा उदयास्त
  - **रा. म. शास्त्री**

विविध विषय विभाग :

- नाटयवाचनस्पर्धा
- चित्रपट : **घरबार**
- क्रीडा : **तीन स्फुटे**

शिवाय :

- राजकीय घडामोडींचे समालोचन
- जगाच्या पाठीवर • चकाटया आदी सदरे


---


मुखपृष्ठ : **अनंत सालकर**

वार्षिक वर्गणी दहा रुपये : सर्व हक्क स्वाधीन


**एक पत्र :**

स. न. २०–९–६४

आपला ताजा अंक आजच वाचला आणि अगदी न राहवूनच हे पत्र लिहीत आहे.

आपल्या मासिकाचे पाक्षिकात रूपांतर झाल्याचे पाहून अत्यंत आनंद वाटला. 'माणूस' याप्रमाणेच सतत भरभराटीस येवो ही परमेश्वरापाशी प्रार्थना. 'माणूस'ने मिळवलेले हे यश पाहिले तर 'समाजच बिघडलाय हो' हे काही लोकांचे समर्थनार्थ बोलणे म्हणजे शुद्ध थोतांड वाटू लागते, व समाजात चांगलेही खूप शिल्लक आहे याचा प्रत्यय येतो.

आज मला पत्र लिहिण्यास उद्युक्त करणारी गोष्ट म्हणजे श्री. पुरंदरे यांची 'कुर्बानी' ही गोष्ट. त्यांचे नेहमीचे लिखाण कसदारच असते. त्यातून ही गोष्ट तर अप्रतिम आहे असे माझे मत आहे.

ही कथा वाचत असताना श्री. पुरंदरे आपल्याला अगदी त्या ऐतिहासिक कालात नेऊन सोडतात. प्रत्यक्ष 'पुरंदर' गड हेच एक कथेतील जिवंत पात्र वाटते. कथेचा शेवट तर इतका हृद्य आहे की सांगता सोय नाही. या कथेवर एक प्रभावी चित्रपट होऊ शकेल असे मला प्रामाणिकपणे वाटते. ही कथा मी कधीच विसरणार नाही.

समाजातील जे जे चांगले ते 'माणूस'मध्ये यावे व 'माणूस'मधील सर्व काही समाजात पसरावे हीच एक इच्छा.

पुन्हा एकदा 'माणूस'ला सुयश चिंतून हे पत्र संपवितो.

**मु. बा. पुराणिक**
गोरेगाव (मुं. ६२)

# एस्. एम्. जोशी : संयुक्त महाराष्ट्राची मंगल शक्ती

काही व्यक्ती अशा असतात, की विरोधात, संघर्षाच्या कालातच त्यांचे कार्य उठून दिसते. शांततेचा, सुबत्तेचा, स्थिरतेचा काल अशा 'मंगळा'च्या व्यक्तींना मानवत नाही. एस्. एम्. ही अशी एक 'मंगळा'ची, क्रांतिकारक प्रकृतीची व्यक्ती आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी कॉंग्रेसच्या निशाणाखाली या व्यक्तीने परकीय सत्तेशी लढा दिला आणि लक्षावधी तरुणांचे एस्. एम्. हे एक स्फूर्तिस्थान झाले. पण या स्थानाचे 'दैवत' झाले ते मात्र स्वातंत्र्योत्तर कालात, महाराष्ट्रात घडून आलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या महाभारतप्रसंगी. एस्. एम्. च्या संघर्षप्रधान जीवनाचा हा कालखंड म्हणजे सुवर्णकळस होता. संयुक्त महाराष्ट्राचा 'कलश' दिल्लीहून कोणी आणला याबद्दलचा कॉंग्रेसी प्रचार काहीहि असो. कलश आणणारी व्यक्ति अ, ब, क,– कोणीहि असू शकती. कारण ऐतिहासिक दृष्ट्या या अ, ब, क चे महत्त्व गौणच राहणार आहे. पण या कलशामागची मंगलशक्ती एस्. एम्. होती, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेतील 'सिंहाचा वाटा' एस्. एम्. चा होता यात कोणाचेहि दुमत होणार नाही. एस्. एम्. चे हे ऐतिहासिक कार्य. त्या काळात एस्. एम्. हे एक तेज होते. महाराष्ट्राचे ते टिळकच बनले होते. एक दैवत...चार कोटी मराठी माणसांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेले.

**वारू केवळ पंचकल्याणी**

पुढे हा अशांतीचा काल संपला. महाराष्ट्राचे ईप्सित साध्य झाले. आणि पाठोपाठ या दैवताची शक्तीही हळूहळू क्षीण होत गेली. वास्तविक भारतीय पातळीवर असंतोषाचा वणवा भडकावण्यासारखी परिस्थिती आजही आहेच. आणि अशा परिस्थितीतच एस्. एम्. सारख्या पुरुषार्थी व्यक्तींच्या पराक्रमाला अधिक धार चढत जाते. पण वस्तुस्थिती अशी आहे की, एस्. एम्. ज्या वारूवर स्वार झालेले आहेत तो पंचकल्याणी असला तरी अबलक नाही. तो शुभ आहे, शोभिवंत आहे, पण अटकेपार जाण्याची हिंमत त्याच्या उरात नाही. मी समाजवादी पक्षासंबंधी बोलतो आहे, ज्याचे एस्. एम्. आज अध्यक्ष आहेत. हा पक्ष जरी स्वतःला 'विरोधी पक्ष' म्हणवून घेत असला तरी खऱ्या अर्थाने आज तो 'विरोधी'ही नाही आणि 'पक्ष'ही नाही. सत्ताधारी कॉंग्रेसपक्षात या पक्षाचा एक पाय तर सतत अडकलेलाच आहे. कॉंग्रेसच्या ध्येयधोरणाशी या पक्षाचा मूलभूत विरोध नाही. आहेत ते केवळ मतभेद; बहुतांशी अंमलबजावणीच्या क्षेत्रातले. त्यामुळे एकाच घरात दोन चुली मांडल्या जाव्यात आणि सणासमारंभाच्या दिवशी किंवा मुलांच्या खेळण्याबागण्यातहि दोन्ही चुलींचे वेगळे अस्तित्व नाहीसे होत राहावे, तसे या विरोधाचे वरपांगी स्वरूप आहे. आणि स्थापनेपासून या विचारसरणीच्या लोकांनी पक्षबांधणीचा शास्त्रशुद्ध असा कधी विचारच केलेला नाही. कुठल्याही वस्त्राला आडवे आणि उभे धागे असावे लागतात. केवळ आडवे किंवा केवळ उभे धागे असून वस्त्र तयार होत नाही. पण एस्. एम्. च्या पक्षात फक्त आडवेच धागे दिसतात. काही हजार चांगली माणसे यात आहेत एवढेच. पण ही संघटित राहतील, जिद्दीने एखादे कार्य शेवटपर्यंत तडीस नेतील याचा भरवसा नाही. कारण यासाठी जी श्रेणीबद्ध घटना, ज्येष्ठकनिष्ठ नात्याची पक्की बांधणी अवश्य असते ती या मंडळींनी कधी केललीच नाही. जनतेविषयी या मंडळींना जिव्हाळा आहे, कार्याची तळमळ आहे असे जरूर वाटते. पण तेवढ्याने जनता वश होत नाही. त्यासाठी काही निश्चयाची कृती, सातत्याची परंपरा पाठीशी उभी असावी लागते. एस्, एम्. ज्या पक्षाचे नेतृत्व करीत आहेत त्या पक्षाजवळ ही दमदार शिदोरी नाही. स्थापनेपासून संघटना बांधण्याच्या उद्योगात गढून जाण्याऐवजी हा पक्ष सारखे निवडणूक करार आणि एकीकरणे यातच गुरफटून बसला आहे. आज कृपलानींना दत्तक घ्या, उद्या लोहियांशी चुंबाचुबी करा, परवा मुस्लीम लीगही का नको ? मग इकडे हजारोंच्या संख्येने पक्षाचे कार्यकर्ते कॉंग्रसमध्ये शिरत आहेत, पट्टम थाणूंसारखे नेतेही कॉंग्रेसच्या गळाला लागत आहेत त्याची पर्वा नाही. ही म्हणजे पानपतानंतरची पेशवाईच झाली. श्रीमंत पेशवे मोहिमेवर आणि निजाम खुशाल पुण्यात येऊन पर्वतीचे कळस कापून नेत आहे. हे काही सामर्थ्यवाढीचे चिन्ह नाही. दोन चार जागा अशा करारांमुळे किंवा एकीकरणांमुळे अधिक मिळाल्या तरी राजकारणावरची माड त्यामुळे पक्की होत नाही. विस्तार होतो, विकास होत नाही.

त्यातल्या त्यात सभा आणि निवडणुका यांचे एवढे जबरदस्त व्यसन या पक्षाला सुरुवातीपासून जडलेले आहे,

□ □ □ संयुक्त भारताची ?

की कधीकधी यापासून काही काळ संपूर्ण दूर राहून, एकांतात काही भव्यदिव्य कृती करूनही जनतेचा विश्वास संपादन करता येतो याची जाणीवच येथे दिसत नाही. कॉंग्रेसच्या अधिवेशनात मिरविण्याऐवजी किंवा स्थानिक आणि पक्षीय राजकारणात गुरफटून घेण्याऐवजी गांधीजी नाही का प्रथम चंपारण्यात गेले ? सर्वंकष नेतृत्वाला काही वेगळी पार्श्वभूमी अवश्य असते. अतिपरिचयाचा धोका टाळावा लागतो. निदान प्रारंभकालात तरी. एस्. एम्. पक्षी. यांना या धोक्याची कल्पना नसावी हे प्रकर्षाने जाणवले एकाच प्रसंगी; जेव्हा खुद्द एस्. एम्.—संयुक्त महाराष्ट्राचा हा विजयी सेनापती—पुणे कार्पोरेशनच्या निवडणुकीसाठी उभा राहिला तेव्हा. त्या वेळी मनात आले, की घाव घालण्याची वेळ आली नाही म्हणून आपली तलवार म्यान करून ठेवण्यापेक्षा भाजी चिरण्यासाठी तिचा वापर होत आहे. त्या वेळी एस् एम्. आणि त्यांच्या पक्षातली मातब्बर मंडळी असे सभातून सांगत होती, की दिल्लीपेक्षा गल्ली सुधारण्याचे काम आधी केले पाहिजे. पण दिल्लीच्या तोफा गल्लीत डागून कशा चालतील ! अशा तोफा दिल्लीला निकामी, आणि गल्लीला भारी. म्हणजे फार तर मुबईला चालतील. पहिला बाजीराव म्हणाला असता, 'अरे ! फांद्या कसल्या तोडत बसलात ! दिल्लीला जाऊन मुळालाच हात घालू. इकडे आहेतच नाना पाहायला.' मग दिल्ली गाठण्यापूर्वी वाटेत नर्मदातीरी देहावसान घडण्याची पाळी आली तरी तो महत्संकल्प पूर्ण करण्यास एखादा सदाशिवरावभाऊ पुढे येता झाला असता. पण एस् एम्. सदाशिव पेठेत गुरफटले आणि दिल्ली तो बहोत दूर चली गयी. बहोत दूर.

पण आजच्या राजकारणातील एस्. एम्.च्या स्थानाविषयी दुमत असले तरी दिल्लीपासून गल्लीपर्यंत आणि बंगल्यापासून झोपडीपर्यंत एस्. एम्. या व्यक्तीविषयी आदर, प्रेम आणि पूज्यभावच आहे इथे एकाचेही मत वेगळे असू शकणार नाही. म्हणूनच येत्या नोव्हेंबरात एस्. एम्.च्या षष्ठ्यब्दपूर्तीचा जो समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे त्यात सर्व विचारांचे, सर्व थरातील नागरिक कर्तव्यभावनेने सहभागी झालेले आहेत. विशेषतः स्वातंत्र्योत्तर कालात राजकीय क्षेत्र म्हणजे गुंडांचा आणि भ्रष्टाचारी व्यक्तींचा बाजार ठरू पाहत असता एस्. एम्. सारख्या राजकीय जीवनातही साधनशुचिता पाळू पाहणाऱ्या चारित्र्यसंपन्न व्यक्तीची समारंभपूर्वक ओळख पटवण्याची निकड तर अधिकच जाणवते. राजकारणात राजकीय चारित्र्यतरी असावे की नसावे हा वादाचा मुद्दा ठरण्याइतपत या क्षेत्रातील आमची अधोगती सुरू आहे. एस्. एम्. याबाबत भट्टीतून, तावून सुलाखून निघालेले शंभर नंबरी सोने आहे हे कुठल्याही पक्षाच्या, कुठल्याही वर्गाच्या व्यक्तीस मनोमन मान्यच आहे. वैयक्तिक हितासाठीच काय, पण पक्षाच्या हितासाठीही एस्. एम्. यांच्या हातून व्यापक देशहिताचा बळी दिला जाणार नाही. इतकेच नव्हे तर उद्या ज्या वर्गाच्या हितासाठी एस्. एम्. ने आपली उभी हयात वेचली, त्या कामगार वर्गाचे हित आणि राष्ट्रहित यात विरोध आला—आणि तो येतच नसतो हे साम्यवादी पुस्तकपंडिताशिवाय कुणालाच गृहीत धरून चालता येणार नाही—तर एस्. एम्. व्यापक राष्ट्रीय हिताचीच काळजी वाहतील एवढीही बाहेर त्यांच्याविषयी श्रद्धा आहे.

यालाच सार्वजनिक क्षेत्रातील चारित्र्य म्हणतात. सदसद्विवेक बुद्धीला स्मरून देशहिताला प्राधान्य देणे. भर्तृहरीचा राम म्हणतो, 'स्नेहं दयां च सौख्यं च, यदि वा जानकीमपि । आराधनाय लोकानां, नास्ति मे मुञ्चतो व्यथा ॥' 'लोकप्रियतेसाठी नाही, लोकाराधनेसाठी वैयक्तिक स्नेह, दयाभाव, सौख्याची आवड, इतकेच काय प्रत्यक्ष 'जीवितं मम द्वितीयं' असणारी जानकीहि सोडावी लागली तरी मला दुःख नाही.' असा राम होता, अशी राघवांची रीत होती म्हणून 'रामराज्य' भारतीयांचे आदर्श राज्य ठरले. अयोध्यानगरीतील समृद्धीच्या आणि वैभवाच्या भौतिक प्रदर्शनाला काही रामराज्य ही संज्ञा नव्हती. हाच 'वरं जनहितं ध्येयं, केवला न जनस्तुतिः' हा लोकाग्रणीचा चारित्र्याचा मानदंड एस् एम्. उंचावत आहेत म्हणून त्यांचे विशेष मोल.

आयोजित केलेल्या सत्कार समारंभांत व निधीसमर्पणात सर्वजण आपापला वाटा उचलतील अशी आशा आहे.

श्रीधर महादेव जोशी याना 'माणूस'चे नम्र अभिवादन.

—श्री. ग. मा.

# जगाच्या पाठीवर

## गणेशोत्सव की गणेशाची थट्टा!

यंदाचे पुण्या-मुंबईचे गणेशोत्सव चिकित्सकपणानं पहावेत असं माझ्या मनांत कधीपासून घोळत होतं. त्यातच या दोन्ही शहरांतील काही मान्यवर संस्थानी मला गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात व्याख्यानं देण्यासाठी निमन्त्रिल्यानं माझा हेतू सुकरतेनं साध्य झाला. बुद्धिदात्या श्रीगणरायानं यंदा बहुतेक प्रसिद्ध मूर्तिकारांना व त्यांच्या आश्रयदात्यांना काही आगळीच 'प्रतिमा' बहाल केल्याचं माझ्या निदर्शनास आलं—की या लंबोदरदेवानं त्या सर्वांची चेष्टा केली? 'अगोदर जाते बुद्धि न् मग जात इतर सारं काही' असं आपण म्हणतो ना! बुद्धिदात्या गजाननमहाराजांनी चालू साली आमच्या गणेशभक्तांना सद्बुद्धी दिली की त्यांची बुद्धी अजीबात बोथट करून टाकली? मला काही शंका येतात त्या जरा स्पष्टपणानंच मांडतो म्हणजे मला काय म्हणायच आहे ते आपणाला कळेल.

पं. जवाहरलाल नेहरू हे आपल्या देशाचे पहिले नि लाडके पंतप्रधान. त्यांच्या निधनानंतर आलेला हा पहिला गणेशोत्सव. पं. नेहरूं संबंधीचा भक्तिभाव प्रकट करायला हा गणेशोत्सवाचा मोसम कसा अगदी नेमका सापडला काहीजणांना. गजाननाच्या मूर्तीसमोर वेगवेगळ्या प्रकारात नेहरूंच्या मूर्तीला स्थान मिळालं! नेहरू विघ्नहर्त्याला वंदन करून स्वर्गारोहण करीत आहेत, ते श्री. शास्त्री यांच्या हाती भारताची धुरा देत आहे, पुष्पमालांनी हे जवाहरलाल गणेशमूर्तीला अलंकारीत आहेत इ. अनेक दृश्यं मी पाहिली. तेव्हां खरं म्हणजे मला त्या कलावंताचा अतिशय राग आला. असल्या अभिरुचिशून्य कलाकृतींचं कौतुक करायला हजारो प्रेक्षक रांगा करून उभे असत याच मला विशेष वाईट वाटलं नाही, कारण आमच्या बहुसंख्य समाजाला खरी कलादृष्टी अजून प्राप्त झालेली नाही. आजकाल लागणारे शेकडो कलाशून्य चित्रपट या गोष्टीची साक्ष देऊ शकतात. कारण कलाशून्यतेच्या आधारानही ते गल्लाभरू ठरतात! मला अत्यंत दु ख झालं ते अशासाठी की स्वतःला 'सुशिक्षित' समजणाऱ्या मंडळींनीही वरील प्रकारच्या गणेशमूर्तींचं मनमुराद कौतुक केलं. एका गणेशमूर्तीच्या दिमतीला तर अमेरिकन प्रेसिडेंट कै. केनेडीही पं. नेहरूंसमवेत उभे होते!

### हे फल काय मम तपाला?

"मृत्यूनंतर माझ्यासाठी कोणताही धार्मिक विधी केला जाऊ नये, असे मला अगदी मनापासून जाहीर करावयाचे आहे. अशा कर्मकांडावर माझा मुळीच विश्वास नाही. केवळ औपचारिक गोष्ट म्हणूनसुद्धा अशा धार्मिक विधींना बळी पडणे म्हणजे एक प्रकारचे ढोंगच ठरेल. त्यामुळे आपली व लोकांची फसवणूक होते असे माझे स्पष्ट मत आहे!" पं. नेहरूंच्या मृत्युपत्रातील हे उद्गार काय सांगतात? त्यांच्या तपाला हेच फल काय?

गणपतीची पूजाअर्चा करताना आम्ही नेहरूंच्या मूर्तीलाही गंध-अक्षता लावायला विसरलो नाही, फुलंही वाहिली नि गुलालही उधळला! नेहरूंनी आजपर्यंत आम्हाला वैचारिकता, शुद्ध बुद्धिवाद आणि अंधश्रद्धाविरोध शिकविला होता. चालू गणेशोत्सवात आम्ही या नेहरूवादावर सपशेल डांबर फासलं! मूर्तिपूजेला कडकडून विरोध करणाऱ्या केनेडीसारख्या बुद्धिवादी कॅथॉलिक नरवीराचीच मूर्ती मूषकवाहनाशेजारी उभी करण्यात आमच्या कलावंतानी दाखविलेली कल्पकता? किती पराकोटीची! धन्य ते कलावंत, धन्य त्यांचे आश्रयदाते नि धन्य ते गणेशोत्सव! सर्व आयुष्यभर झुंझार लढवय्ये ठरलेले नेहरू व केनेडी शेवटी आमच्या मूर्तिकारासमोर हतबल झाले? नेहरू आणि केनेडी यानी स्वर्गातून या मूर्तिकारांना पारितोषिकासह प्रशस्तिपत्रे पाठविली आहेत अशा अर्थाची बातमी उद्या प्रसिद्ध होणारच नाही अशी खात्री सुद्धा कुणाला देता यायची नाही! ●

## आचार्य अत्रे यांचा दरबार

"हा पाहिलात ना आमचा दरबार? यातून सुटका झाल्यानंतर मी माझं लेखन करणार!" आचार्य प्र. के. अत्रे यांच्या मुंबई येथील विन्हाडी मी परवा गेलो असता त्यानी हे उद्गार काढले.

माझ्यादेखत तीनचार प्रकरणं तरी त्यानी हाताळली. किती दूरवरून माणसं येतात त्यांच्याकडे.

"जगात केवढा अन्याय भरलेला आहे. पाहा! मोठमोठे अन्याय पाहिले म्हणजे लहानसहान तक्रारी क्षुद्र वाटू लागतात. वास्तविक सारे अन्यायच. मी तरी सर्वांना न्याय मिळवून द्यायला कितीसा पुरे पडणार? आचार्य अत्रे अर्थात् 'साहेब' मला सागत होते. त्यांच्या डोळ्यात तरळणारा दिलदारपणा, त्यांचं प्रेमळ अंतःकरण उकलून दाखवत होता.

'साहेब बाहेर दोन मुलं आली आहेत. काल-परवा भेटून गेलेली...'' निरोप आला. साहेब म्हणाले, "हा, आलं लक्षात. त्याना आत पाठवा! दहा बारा वर्षाची दोन मुलं आत आली. त्या बहीणभावडांशी साहेब दयार्द्र भाषेत बोलले. शेवटी ते म्हणाले, "पैशाची जरुरी असेल ना आता तुम्हाला?" काही संवाद झाला. मुलं कृतज्ञ भावनेनं निघून गेली. परिचित अशा कुणा कलावंतांची मुलं होती ती. कलावंत निर्धन परिस्थितीत मेला. कुटुंबियाना साहेबांची आठवण झाली. साहेबाकडून त्याना मदत मिळेल, मिळालीही असेल. या गुप्तदानाची वाच्यता साहेबांच्या तोंडून व्हायची नाही!

आचार्य अत्रे यांच्या पत्रकर्तृत्वाविषयी ज्याना उत्सुकता, आत्मीयता असेल अशा प्रत्येक माणसानं त्यांचं अद्यावत् कार्यालय 'शिव शक्ति' एकदा जरूर पाहिलं पाहिजे. तिथंही साहेबाना भेटू इच्छिणाऱ्यांची ही रीघ असते. जवळच बसलेल्या एखाद्या स्नेह्याला ते म्हणतील, "आज आत्मचरित्राचं पुढचं प्रकरण लिहायला हवं. पण लिहिणार केव्हा? हा आमचा दरबार पाहात आहाच तुम्ही!"

अशा घाईगडबडीतूनही आचार्य अत्र अव्वल प्रतीचं साहित्य कसं निर्माण करीत असतील याचं आश्चर्य वाटतं. त्यांच्या नाटयकृती, वृत्तपत्रीय लेख अथवा इतर प्रकारच्या सर्वच साहित्यात जो ज्वलंत जिवंतपणा आढळतो त्याच्या रहस्याचा मात्र मला तरी उलगडा झाला. मानवी जीवनातील सुखदुःखं, समरप्रसंग आणि न्याय-अन्याय यांच्याशी तादात्म्य कसं राखावं हे आचार्य अत्रे यांनी निश्चितच ओळखलं आहे. त्यांचा दरबार त्यांना याकरताही खचितच प्रिय असावा !

**चार्ली चॅपलिन नि अत्रे**

चार्ली चॅपलिन या जगप्रसिद्ध बोलपटलेखकाचं नि नटाचं आत्मचरित्र सध्या युरोपातील काही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊ लागलं आहे. लवकरच त्याचं भाषांतर जगातल्या अनेक भाषांत होईल. Gold Rush Modern Times, Limelight इ. काही चित्रपट निर्माण करून चॅपलिननं स्वतःचं असं एक निश्चित स्थान निर्माण केलं. चॅपलिननं स्वतःच्या चित्रपटांच्या कथा स्वतःच लिहिल्या व त्यांतील भूमिका.ही स्वतःच वठविल्या.

आचार्य अत्रे यांचं आत्मचरित्रही अनेक भाषांत भाषांतरित व्हायला पाहिजे असं मला वाटतं. भारतीय बोलपटकथालेखनाच्या क्षेत्रांत आचार्य अत्रे यांनी एक प्रकारची क्रांती घडवून आणली. चॅपलिननं कथालेखक व नट या नात्यानं पाश्चात्य कलाक्षेत्रात फार मोठी कामगिरी केली. आचार्य अत्रे यांचं कार्य काही बाबतींत चॅपलिनलाही सहज मागे टाकील. आचार्य अत्रे चॅपलिनप्रमाणं नट नसतील, पण काव्य, नाटय, चित्रपट, पत्रसृष्टी व राजकारण इ. अनेक क्षेत्रांत आचार्यांनी मानाचा मुजरा घेतला आहे.

मॅकार्थिझमचा अमेरिकेत जोर होता त्याकाळी चॅपलिनला सरकारी छळ सोसावा लागला. सध्या तो स्विट्झर्लंडमध्ये स्थायिक झाला आहे. आचार्य अत्रे यांच्या वाटचालाही असले छळ अधूनमधून आले होतेच.

आचार्य अत्रे यांच्या आत्मचरित्राचंच नव्हे तर त्यांच्या समग्र वाङमयाचं परकीय भाषांत भाषांतर अवश्य व्हावं असं मला वाटतं. विशेषतः त्यांचा "तो मी नव्हेच" या नाटकावर चॅर्ली चॅपलीन तर नक्की फिदा होईल.

●

## द गॉलचा ' बलशाली फ्रान्स '

फ्रान्सची सूत्रं हाती घेतलेल्या दिवसापासून अध्यक्ष जनरल द गॉल यांनी एकच मंत्र जपला आहे, "फ्रान्स ही जगातली एक मोठी शक्ती झाली पाहिजे. जागतिक राजकारणात फ्रान्सची सत्ता महत्त्वाची ठरली पाहिजे, फ्रान्सच्या शब्दाला वजन मिळायला हवं ! " द गॉलच्या या धोरणाचा उल्लेख "Grand Design" अथवा भव्य योजना या शब्दांनी केला जातो. Might is Right–समर्थाच्या बाजूला सत्य असतं, हा आंतरराष्ट्रीय राजकारणातला त्रिकालाबाधित सिद्धांत द-गॉलनी ओळखलेला आहे.

इंग्लंड–अमेरिकेच्या सल्लावजा धमकीला न जुमानता फ्रान्सने स्वतःचे अणुबाँब निर्माण करायला सुरुवात केली. फ्रान्सची आर्थिक घडी पुन्हा नीट बसताच द गॉल एवढे धीट बनले की त्यांनी इंग्लंडला ' यरोपियन संयुक्त बाजारपेठेत ' (E. C. M.) मज्जाव केला. (याच



## त्र्यं. न. कुलकर्णी

इंग्लंडमध्ये बसून फ्रान्समधून जर्मन सैन्याला हाकण्याच्या योजना द गॉलनी दुसऱ्या महायुद्धात आखल्या होत्या ) आफ्रिकन राष्ट्रांत फ्रान्सचं वजन आज कितीतरी वाढलं आहे. सध्या द गॉल दक्षिण अमेरिकेतल्या देशांना भेटी देत आहेत. तिकडील देशांतही फ्रान्सचा मानमरातब आज वाढत आहे !

उत्तर अमेरिकेला ( U. S. A. ) आजपर्यंत असं वाटत आलं आहे की दक्षिण अमेरिकेतील देशांच्या वाटेला तर इतर राष्ट्रांनी जाऊ नये; दक्षिण अमेरिका नेहमी अमेरिकेच्याच वजनाखाली, वर्चस्वाखाली राहिली पाहिजे. दक्षिण अमेरिका हे आमच्या वजनाखालचं क्षेत्र (Sphere of Influence) आहे,' असा दावा आज कित्येक वर्ष अमेरिकेनं मांडला आहे.

अलीकडेच झालेलं क्यूबा प्रकरण घ्या. क्रुश्चेवनी तिथं रशियाचा लष्करी पगडा बसवायचं काम चालविलं होतं. अमेरिकेचे अध्यक्ष कै. केनेडी यांनी त्यावेळी एक झणझणीत चपराक रशियाला दिली ! हा इतिहास तर अलीकडचा आहे.

द–गॉल यांनी द. अमेरिकेतील देशांना शुभेच्छा भेटी द्यायचा सपाटा सुरू केला आहे सध्या. अशा भेटींविरुद्ध काही उपाययोजना करता येत नाही म्हणून अमेरिकेची मोठी पंचाईत झालेली आहे. द गॉल यांचं भव्य व्यक्तिमत्त्व, त्यांची कीर्ती आणि त्यांचं ओजस्वी वक्तृत्व यामुळं फ्रान्सची इभ्रत त्या देशात वाढत आहे एवढं मात्र नक्की !

उद्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात द. अमेरिकेतील देशांना फार महत्त्व प्राप्त होणार हे द गॉलनी पुरेपूर ओळखलं आहे.

**स्वर्णसिंगांना अवाहन**

या देशांच्या बाबतीत भारतानं मात्र आतापर्यंत फारच थोडी जागरूकता दाखविली आहे. दिल्ली सरकारच्या परराष्ट्रीय विभागात जबाबदारीच्या जागांवर कामं करणाऱ्या कितीतरी अधिकाऱ्यांना द. अमेरिकेतील सर्व देशांची तर राहोतच, पण चारपाच देशांची नावंही एकदम सांगता येणार नाहीत.

मी तर परराष्ट्र–व्यवहार मंत्री श्री. स्वर्णसिंग यांना आवर्जून सांगेन की शक्य तितक्या लवकर दक्षिण अमेरिकेचा दौरा करा !

● ●




१५ ऑगस्ट जनता विशेषांक

## मुखपृष्ठ रसग्रहण स्पर्धा

# प्रथम पारितोषिक

लेखक : अनंत विठ्ठल खिरे, मुंबई

## पंचवार्षिक योजना जनतेपासून अनेक योजने दूर आहे.

माझ्या दृष्टीने पंचवार्षिक योजनांवर टीका करून त्यांतील दोषांचे दिग्दर्शन करण्यांत चित्रकार यशस्वी झाले आहेत. व्यवहारातसुद्धा आपण चर्चा करताना बऱ्याच वेळा ऐकतो, की आपल्या या पंचवर्षीय योजना म्हणजे नुसते कागदी घोडे आहेत. सर्वसामान्य भारतीयाला त्यांच्यापासून म्हणावा तसा फायदा झालेला नाही. पंचवार्षिक योजनांमुळे जे राष्ट्रीयधन निर्माण होत आहे ते बहुजनसमाजाच्या खिशात जाण्याऐवजी काही मूठभर लोकांचेच उखळ पांढरे होत आहे. सारांश, भारतीय जनता व पंचवार्षिक योजना यांमध्ये अनेक योजने अंतर आहे. वरील सर्व आशय या चित्रावरून व्यक्त होतो, तो असा ––

चित्राच्या मध्यभागी घोड्यावर मनुष्य बसलेला दाखविला आहे खालच्या बाजूला थोडे अंतर ठेवून समाजातले विविध थरातले लोक दाखविले आहेत. ते सर्व आश्चर्याने, उत्सुकतेने वरील घोडेस्वाराकडे पाहताना दाखविले आहेत. जणू काही ते एखादा आकाशात उडणारा पक्षीच पाहत आहेत. इथे चित्रकाराने पंचवार्षिक योजना या सर्वसामान्य जनतेपासून अनेक योजने दूर आहेत हे दाखवण्यात यश मिळविले आहे. घोडेस्वाराच्या मांडीखालचा घोडा हा पांढरा दाखविला आहे. जणू काही भारत सरकार नुसते कागदी घोडे नाचवीत आहे असेच चित्रकाराला सांगायचे असावे. कागदी घोडे जसे व्यवहारात नाकामी ठरतात त्याप्रमाणे पंचवार्षिक योजना ह्या बहुजनसमाजासाठी नाहीत. बहुजनसमाजाला त्यांच्यापासून फायदा नाही हेच चित्रकाराला दाखवायचे असावे. घोडेस्वाराच्या हातात जी एक थैली दाखवली आहे ती योजनांच्या द्वारे उत्पन्न होणारे धन दाखविले आहे. ते धन घोडेस्वार पिशवीतून नेत आहे व खाली उभे असलेले लोक आशाळभूतपणाने आपणाला त्यातील काही मिळेल का याचा मागोवा घेत आहेत. इथे चित्रकाराने हे समर्थपणे दाखवून दिले की योजनांच्या कार्यवाहीने जे धन पैदा होते ते मुठभर वरिष्ठांच्या, ज्यांचा प्रतिनिधी तो घोडेस्वार आहे, खिशात पडते आहे व सर्वसामान्य माणूस मात्र पाण्यात राहून कोरडा राहत आहे. घोडारूपी योजनेवर ज्यांच्या हातांत योजनांपासून फायदा पडतो असा मनुष्य स्वार झालेला दाखविला आहे. मला वाटते चित्रकाराला सांगायचे असावे की योजना जरी बहुजनसमाजाने निर्माण केलेल्या शासनाने आखलेल्या असल्या तरी त्यांच्यावर मुठभर लोकांचीच पक्कड आहे व त्यामुळे निर्माण होणारे धन, राष्ट्रीयसंपत्ती ही त्या मुठभर लोकांच्याच हातात जात आहे.

कदाचित चित्रकाराला असे दाखवायचे असावे की योजनाकारांच्या अव्यवहार्य व अशास्त्रीय योजनांमुळे योजनेचा व तीपासून ज्यांचा फायदा व्हायचा तो बहुजनसमाज यांमधील अन्तर वाढत आहे. एवढेच नव्हे, तर योजनेत निर्माण झालेल्या समृद्धीचा उपभोग घेणे हे त्याला अशक्य होत आहे.

अनंत विठ्ठल खिरे

१५ ऑगस्ट जनता अंकावर दिलेल्या मुखपृष्ठावर रसग्रहणाची स्पर्धा ठेवावी अशी कल्पना सहज 'माणूस' कार्यालयात निघाली आणि लगेच ती अंमलातही आणली गेली.

या उपक्रमात अपेक्षेपेक्षा खूपच अधिक लेखक-ले-खिकांनी भाग घेतला. या सर्वांचे माणूस अभार मानीत आहे. संपादक

---

## दुसरे पारितोषिक (विभागून)

## बी. एस्. सोनार, सुपे आणि शरद गंगाधर भागले, औरंगाबाद.

१ :

### नियोजत आहे पण शासनाची अंमलबजावणी दुर्लक्षित

सतरा वर्षात नियोजनाद्वारे अपेक्षित उद्दिष्टे म्हणजे शेती उत्पादन, गलिच्छ वस्त्याचे उच्चाटन, त्यातील एक भाग म्हणजे गृह-निर्माण योजना, यंत्रसामुग्री उत्पादन व शेवटी ज्यावर उपरिनिर्दिष्ट बाबीचा विकास निर्भरित आहे, असतो ते शिक्षण ही होत. यात फक्त कागदोपत्री घोडे नाचविले गेले, फुगलेले आकडे दाखवून निवडणुकांपुरती फक्त आकर्षणे निर्माण केली गेली. परंतु प्रत्यक्षात तशी उन्नती, प्रगती झालेली नाहीच हे वरील बाबीच्या स्पष्टीकरणावरून समजून येईल असे वाटते.

तृतीय पंचवार्षिक योजनेचा सन १९६३ चा अहवाल ज्यावेळी सादर केला गेला त्या वेळी काय दिसून आले? शेतीचे उत्पादन दीड टक्क्यानी कमी झालेले दिसून आले. (का?) नियोजन आहे पण शासनाची अंमलबजावणी दुर्लक्षित!

गलिच्छ वस्त्याचे उच्चाटन झाले नाहीच. फक्त या पचवार्षिक योजनेत पूर्ण उच्चाटन करू; पुढच्या योजनेत नाहीशा करू म्हणून आश्वासने देणे हे अगदी ठरलेलेच. पण कधी त्या वस्त्यांची पाहणी पाच वर्षात होत नाही, अडचणी समजून घेतल्या जात नाहीत. नवीन घरे बांधली गेलीत पण सर्व वरच्या दर्जाच्या ऑफिसरासाठी. मजूर व मध्यम वर्गीयासाठी फक्त 'गाळे बाधले जाणार'ची आश्वासने! पण वेळ नाही, जागा नाही आणि शासनयत्रणा कार्यक्षम नाही म्हणून भारत सरकारकडून मिळालेले अनुदानही (Grant) परत करावे लागते. फक्त कागदोपत्री इतके गाळे बाधले, इतके पुढच्या योजनेत बांधले जाणार! आयुर्विमा गृहमंडळातर्फे इतके कर्ज दिले पण फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यासाठी, मजुरासाठी, मध्यमवर्गासाठी (खेड्यातील) थोडेतरी काही यशस्वी झाले आहे का? नाहीच! मात्र कायदे रेकॉर्ड–हॉर्सपॉवर–आकडे फुल्ल!

शैक्षणिक प्रगती प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज (आर्ट)ची तेवढी खरोखर प्रगती. पण, तात्रिक, औद्योगिक शिक्षणाची प्रगती फार कमी म्हणून नियोजन (औद्योगिक वगैरे) तंत्रज्ञाअभावी कागदी घोड्यावर बसून राहिलेले. शिवाय संस्था, विद्यार्थीसंख्या वाढली पण शिक्षणाचा दर्जा (त्याचा कस) मात्र अकार्यक्षमतेमुळे आहे त्यापेक्षाही खालावला ही ओरड.

शेतीउत्पादन, आरोग्य (सार्वजनिक), पाणीपुरवठा यामध्ये मुळीच सुधारणा व कार्यक्षमता नाही म्हणून प्रगती कमी हे प्रांजळपणे सरकारही कबूल करते. पुरेसे डॉक्टर नाहीत म्हणून *दवाखाने काढून काय उपयोग?* पाणीपुरवठा योजनेसाठी मिळालेले अनुदान तसेच पडून राहणे! त्याचा उपयोग, पुरेपूर केला नाही म्हणून रक्कम राज्यसरकारानी भारतसरकारला 'रिफंड' करणे! शेती-उत्पादन घटले म्हणून आजची ही अन्नटंचाई व भाववाढ झाली–हे कागदी घोडे विशेषत: मध्यम, मजूर वर्गाच्या डोक्यावरून वेगाने धावत आहेत.

अशा कागदी घोड्यावरील योजना, नि–योजनामुळेच अकार्यक्षम ठरतात हे आजही खेदाने म्हणावेसे वाटते, भाडवलशाही लोकशाहीत मजूर, शेतकरी, नोकर याचे जीवन सुधारलेले नाही आणि हे सुधारावयाचे असेल तर कार्यक्षम शासनयत्रणा–अमलबजावणी झाली तरच स्वराज्याचे सुराज्य निर्माण होऊन आशा, समाधान, विकास, स्नेह (परस्परांतील) निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

**बी. एस्. सोनार.**

२ :

### जनता 'भारत बंद' करून घोड्याचा लगाम हाती घेईल

भारताला स्वातंत्र्य मिळून आता १७–१८ वर्षे झाली. पहिल्या दोन पचवार्षिक योजना सपल्या...म्हणजे अंमलात आणल्या गेल्या. तिसरी योजना चालू आहे. चौथी तयार होत आहे. यावरून भारत प्रगती करीत आहे असे वाटण्यास हरकत नसावी. परंतु या दोन अथवा अडीच योजनामुळे झालेली प्रगती, झालेला नफा, झालेली उत्पादनवाढ, झालेल्या सोई *सामान्यजनतेपर्यंत जाऊन* पोहोचल्या आहेत का? हा प्रश्न उभा राहतो. या प्रश्नाला जाडेजाडे शब्द न वापरता, क्लिष्ट आकडेवारी न देता, प्रचलित सरकारला सरळसरळ दोष न देता दिलेले समयोचित उत्तर म्हणजे आपले चर्चाविषय अगर स्पर्धाविषय असलेले फडणीसाचे 'मुखपृष्ठ' होय.

योजनारूपी घोड्यावर बसून सरकार जनतेला लागणाऱ्या वस्तू आणीत आहे. योजनेचा घोडा चौखूर उधळतो आहे. वायुवेगाने पळत आहे, सरकारने हस्तगत केलेल्या वस्तूही

अगदी ' जीवनावश्यक ' आहेत. खायला अन्न, राहायला घर अगावरल्यायला कपडे व ज्ञानार्जनासाठी पुस्तके. पण...

पण या सर्व वस्तू त्याच्माकडे हावरटपणे, अगदी आसुसलेल्या नजरेने बघणाऱ्या जनतेला मात्र मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. या जीवनावश्यक वस्तू मधल्यामध्ये गडप होत आहेत. व्यापारीलोक धान्य, कापड याचा साठा करून मग त्याचा काळाबाजार करीत आहेत. सीमेंट, पत्रे, व्यापाऱ्यानी गडप केल्यामुळे लोकाना ' मजासवाडी ' टाईप झोपड्याचा आश्रय घ्यावा लागत आहे. शिक्षणाचा, पुस्तकाचा सरकार किती पद्धतशीरपणे बट्याबोळ करीत आहे हे उदाहरणासाठी सांगायला नकोच! (आठवा—भूगोल प्रकरण.) या जीवनावश्यक वस्तू आकाशातच राहत आहेत. गुरुत्वाकर्षणाच्या नियमांप्रमाणे खाली पडून, जमिनीवरील उभ्या असलेल्या जनतेच्या हाती त्या लागल्या पाहिजेत. त्या खाली पडत नाहीत कारण त्या गुरुत्वाकर्षणाहूनही वर चढ असे लाचलुचपतीचे आकर्षण सरकारी अधिकाऱ्यावर योजिले जात आहे.

तेव्हा अशा वेळी चित्रकाराला असे म्हणायचे आहे की हा योजनारूपी घोडा जमिनीवरून चालला पाहिजे. जमिनीवरच चौखूर दौडला पाहिजे. जीवनावश्यक वस्तू जमिनीवर राहणाऱ्या प्रत्येक लहानथोरांना, गोरगरिबांना मिळाल्या पाहिजेत; तरच तरणोपाय आहे. नाहीतर ही भुकेने वखवखलेली, अन्यायाने चिडलेली जनता ' महाराष्ट्र बंद 'च नाही तर ' भारत बंद ' करून त्या घोड्या चालगाम आपल्या हाती घेतल्याशिवाय राहणार नाही ! ! !

**शरद गंगाधर भोगले**

★

★ ★ ★

# तिसरे पारितोषिक ( विभागून )

## सुलभा मंगरूळकर, पुणे आणि मुल्लाअल्ली अब्बास मुल्ला, सोलापूर

१ :

### योजनेच्या अपयशात रक्तरंजित क्रांतीची बीजें

' योजना ', ' योजना ', ' योजना ' ही अखंड घोषणा पांढऱ्या कागदावर लाल रंगात दाखविल्याने तिच्यातील ( योजनेतील ) ' लाल ' संस्कृतीचे अनुकरण मोठ्या खुबीने सूचित झाले आहे. त्या बरोबरच घोडेस्वाराच्या पेहेरावात गळ्याजवळ व किनारीला लाल रंगाची फीत दाखविल्याने ' योजने 'च्या कार्यवाहीतील " लाल फीत " (Red tape) अतिशय कौशल्याने उघड केली आहे असे दिसते. कदाचित आतला डगला (म्हणजे अंतरंग) ' लाल 'संस्कृतीचेही द्योतक असावे !

सतत शोषण झाल्याने काळी ठिक्कर पडलेली जनता काळ्या रंगाने दाखवून, योजनेचा कागदी घोडा पांढऱ्या रंगाचा दर्शवून व ह्या साऱ्याची पार्श्वभूमी तावडया रंगात दाखवून चित्रकाराने अवघ्या तीन रंगाचा उपयोग करून चित्र अतिशय प्रभावी केले आहे, यात शंका नाही.

तावडया लाल पार्श्वभूमीवर रेखाटलेले ' योजने 'वरील हे ' भाविष्यचित्र ' योजनेच्या अपयशात रक्तरंजित क्रांतीची बीजे असतात असे तर सुचवीत नाही ना ?

— कु सुलभा मंगरूळकर

२ :

### योजना घोड्याला कान नाही

कागदी योजना-घोड्याची गती, त्याच्या सर्वांगावरील ' योजना ' शब्द व जनतेच्या डोक्यावरून चाललेले उड्डाण यावरून एकामागून एक भरमसाट योजना आखण्याचे काम चालल्याचे कळते व त्या योजना जनतेचे मत विचारात घेऊन आखल्या जात नाहीत, हेही स्पष्ट होते कारण खाली चित्रात लोक योजना-घोड्याबद्दल विचारप्रदर्शन करीत आहेत, पण ते ऐकायला-योजना-घोड्याला जनतेकडील बाजूला चित्रकाराने कान काढलेला नाही, तसेच योजनेला चालविणारा घोडेस्वारही जनता-आवाजाकडे लक्ष देत नाही, हे दर्शविण्यास त्या स्वाराच्या कानाला छिद्र चित्रकाराने दाखविलेले नाही. योजना आखताना जनमताला वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात, हे सूचित होते. योजना चालविण्याच्या भरात जनमताकडे कानाडोळा केला जातो हे दाखविण्यास घोडेस्वाराची नजर जनतेकडे दाखविली नाही, घोड्याच्या गतीबरोबर पुढे धावणारी दाखविली आहे.

योजना-घोड्याच्या तोंडात लगाम भक्कम नाही, नुसती दोरी आहे, म्हणजे योजनेवर नियंत्रण व्यवस्थित नाही, खर्चाला ताळमेळ नाही, योजना-घोड्याच्या डोक्यात ' योजना ' पुरा शब्द आहे. योजना आखताना पूर्ण डोक्यात असते, चित्रात लगामापाशी तोंडावर ' योजन ' शब्द आहे. योजनेवर नियंत्रण करताना ती योजना ' योजन ' दूर पळून जाते, अंमलबजावणी नीट होत नाही. योजना म्हणजे तोंडातली पोकळ बडबड ठरते.

योजना घोड्याच्या खालील जनतेत शेतकरी कामकरी हे कपड्याविना व बारीक पोटाचे दाखविले आहेत, म्हणजे राबणाऱ्याना अन्न, कपडा नाही, हमाल डोक्यावर कपडा ठेवून उभा आहे, हॉटेलाचा पोऱ्या ट्रे घेऊन उभा दाखविला आहे, म्हणजे आर्थिक विषमता अजून नष्ट झालेली नाही. गरीब गरीबच आहेत. मुलाना शिक्षण घेता येत नाही, हॉटेल वा फेरीवाला याचा आश्रय घेऊन जीवन जगावे लागते, तसेच बऱ्याच गर्दीवरून, हातवर केल्यावरून लोक बेकार असल्याचे व ते योजनाकडून काम मिळण्याची अपेक्षा करीत असल्याचे सूचित केले आहे.

**मुल्लाअल्ली अब्बास-मुल्ला**

## तुझी याद......

तुझी याद...अंतरात
जखमेचा एक दिवा
गर्द चिंब अंधारात
एक जागता पारवा

तुझी याद...अंतरात
घमन्यांचे ध्रुवपण
मुक्त तेजाचे स्पंदन
नभी ल्यावे सूर्यपण,

तुझी याद...अंतरात
वेदनेचा स्वर्गसूर
विझताना...तुझी याद
माझे जळू दे गोपूर !

—*राजा महाजन*


## सूर मिटवावे तशा ...

सूर मिटवावे तशा
दूर केल्या आठवणी
पापणीत आठविले
ओढभरतीचे पाणी

वळणाची पायवाट
क्षीण पाहून थांबले
संथ थिजल्या डोळ्यांनी
स्वप्नदिवे मालविले

सूर मिटले, तरी न
दूर झाल्या आठवणी
जीव पेटवून वाहे
क्षण थिजलेले पाणी !

—*प्रभा गणोरकर*



## चार कणिका

उद्योग थोकडा शक्तीही थोकडी
जाई न लांबवर आकांक्षेची उडी
परि दोन वैभवे अजोड मम संग्रही
तुजवरची प्रीती–ज्ञानाची लालसा
मी करीन हेवा कधी, कुणाचा, कसा ?

* *

हे ग्रहताऱ्यांनो ! तुमचा मी किंकर
रमणीय फुलांनो ! तुमचा मी प्रियकर
परि भक्तीप्रीती होइल अस्तंगत
जरि विन्मुख झाली माझी मजला सखी
तेज वा गंधही होइल मज घातकी !

* *

हा अंक जोडता एकच की मागुनी
ये मूल्य निरर्थक शून्यांना तत्क्षणी
आलीस जेधवा माझ्या तू जीवनी
भावास लाभल्या काया चेतोहर
निर्वासित हृदया मिळे स्वतःचे घर !

* *

मी प्रौढपणाचे छत्र धरी तुजवरी
कधि युवक होउनी प्रेमसाधना करी
विक्राळ नियतीचा बागुल येता पुढे
वाटते लोपुनी जावी यौवन, जरा
अन् कुशीत तुझिया शोधावा आसरा !

* *

—*गोपीनाथ तळवळकर*



# दाह...

शरद विनायक काळे

दुपारी अचानक मळभ भरून आले. वरचे किरण वर, खालचे खालीच राहिले. कुंद मगभगीत प्रकाश सर्वत्र कोंदला. पान न् पान निश्चळ झाले.

अंगणातल्या पायरीवर बसून दावकेभाऊ आकाशाकडे बघत होते. त्यांचे नितळ टक्कल घर्मबिंदूंनी डवरून गेले होते. छातीवरल्या पिकल्या केसांतून एकेक थेंब–हळू–निथळत होता. अंगात जास्तच शिजून रटमटून येत होते.

अंगणापलीकडे फाटकाला लागून उतरती पाणंद नि पाणंदीला लागून घराखालून सडक गेली होती. मध्येच एक ट्रक रुमरुमत आला. कर्कश स्वर काढून, धूळ उसळवून खडबडत, घडपडत निघून गेला. कुणी पिसाट माणूस छाती पिटीत, हातवारे करीत ओरडत जावा, तसे दावकेभाऊंना वाटले. त्यांचे डोके सैरभैर होऊन गेले. खांद्यावरल्या पंचाने त्यांनी टक्कलावरला घाम पुसून काढला. मग पंचाचा एक शेव ते मुठीभोवती गरगर फिरवीत बसले...पण वाऱ्याचे पान हलत नव्हते. अभ्रे साचत होती. पांढऱ्या लगद्यांचे ढीगढीग लोटत होते–ठेचून भरले जात होते...दावकेभाऊंचा श्वास रोधल्यासारखा झाला. दुधी काचेच्या एका प्रचंड घुमटात आपण अडकलो आहोत, त्याला बाहेरून विलक्षण आच दिली जात आहे, फक्त मगभगीत उजेड दिसतो आहे, असे त्यांना वाटले. त्यांचा चेहरा तापल्या लोखंडासारखा लालीलाल झाला...

––मघाशी गेलेला ट्रक दूर हॉर्न देत होता...

––दावकेभाऊ भानावर आले.––दुकानचा ट्रक आला आहे. दुकानात जायला हवे. माल उतरून घ्यायला हवा...कोणतीही मन:स्थिती असली तरी नोकरी बजावायलाच हवी...असे उगीच विचार करीत मख्खासारखे बसून राहून––शिवाय नुकतेच डॉक्टरांनी सांगितले

आयुष्यभर दाबकेभाऊ हेच म्हणत होते, 'हे दडपण झुगारून देईन.... नोकरी सोडीन, मागे त्या बंडू मिरकराने सोडली तशी...पुडीचा दोरा तोडावा तशी झटकन्–' परंतु दाब वाढतच गेला.... वाढतच गेला !

आहे–" जास्त विचार करू नका. रक्तदाब वाढेल—पुन्हा अटॅक येईल. " दाबकेभाऊंना आठवले, मागे असाच एकदा रक्तदाब वाढला होता–चहा पिता पिता हात थरथरून चहा सगळा सांडला होता, कप खडखडून पडून फुटला होता...त्या पूर्वीदेखील आपण अचानक भयकर मोठ्याने ओरडलो होतो–

ओसरीवरल्या घड्याळात ठोका पडला. अडीच वाजल्याचे घड्याळाकडे न बघताच दाबकेभाऊंच्या ध्यानात आले. ते घाईघाईने माजघरात आले.

माजघरात त्यांची बायको चटईवर झोपली होती. सुस्कारे घुमत होते. आता एवढा ठणकन् ठोका पडला, मघाशी घराखालून ट्रक खडखडत गेला, पण तिची झोप चाळवली नव्हती. तिचा स्थूल देह अस्ताव्यस्त पसरला होता. दाबकेभाऊंना संताप आला. " काय शिंची झोप ! आपली चाहूल लागताक्षणी हिने दचकून उठायला हवे, चहा टाकायला हवा.. तिला उठवून गदगदा हलवावी, दरडावून विचारावे–' हे काय चालल आहे ? मला काही किंमत आहे की नाही ? अॅं–ए सटवे "— असे बरेच बरेच त्याच्या मनात आले. पण ते तसेच मागील दारी गेले–

मागीलदारच्या उघड्या पडवीत भिंतीशी माचा टाकला होता. त्यावर श्रीधर झोपला होता. कसलेतरी जाडे पुस्तक त्याच्या छातीवर उपडे घसरल्यासारखे होते. बाजूला एक रंगीबेरंगी मासिक तिरपे पडले होते. त्याच्या मिशीची बारीक रेघ त्याच्या गोऱ्या चेहऱ्यावर रेखीवपणे उठून दिसत होती. छातीवर तुरळक केस उमटले होते–त्यामुळे त्याचे धिप्पाडपण नजरेत भरत होते. चष्मा त्याच्या उशाशी तसाच न मिटता ठेवलेला होता. त्यामुळे त्याचे डोळे भलतेच ओकेओके वाटत होते. डोक्यामागे हात सोडून, लहान मुलासारखा पाय फाकून तो उताणा ऐसपैस पसरला होता...

मुलगा, बायको अशी गाढ झोपलेली बघितल्यावर दाबकेभाऊंना चीड आली— 'घरात आपली कशी जरब असायला हवी...! निदान आपल्या कष्टाची काही फिकीर हवी– पण ती आत घोरासुराचे आख्यान लावते आहे ! ...हा गद्धा–

—हो ! गद्धा, प्रोफेसर असला .तरी गद्धा, ज्याला कष्टाचे चीज कळत नाही, बापाचे मन उमजत नाही तो त्रिवार गद्धा ! ...केवढे घोटाळे माजवून ठेवलेत या लोकानी ? ...आता हा चष्मा–तसाच उघडा ! अगदी टोकाशी येऊन राहिला आहे–झोपेत हात लागला तर तो खाली पडून फुटेल, चक्काचूर होईल !—पण हा आपला खुशाल ताणून झोपेल... !'

दाबकेभाऊ पुढे झाले नि श्रीधरचा चष्मा त्यानी हळूच पाकिटात ठेवला. त्याचे लक्ष सहज जवळच्या मासिकाकडे गेले...मुखपृष्ठावरली बाई वेडीवाकडी उभी होती–वाऱ्यावर तिचा पदर घसरून उडत होता, डोळे उडवीत ती बया लफ्फेदार नाचत होती !...

श्रीधरचे लग्न आता होणार आहे, याची दाबकेभाऊंना आठवण झाली. ते अधिकच चिडले—'अरे, लग्नासारखी एवढी महत्त्वाची गोष्ट तो काय या बाईचा नाच आहे ? इतका कष्टाचे डोंगर उपसून तुला शिकवल तो असले थेर करायला होय ?...'

त्याचे लक्ष पुन्हा त्या मासिकाकडे गेले नि त्याच्या डोळ्यासमोर निमा दिसू लागली– 'दुकानदाराची निमा–असेल श्रीधरच्याच कॉलेजात, पण म्हणून काय यानी एकदम एकमेकावर सरळ प्रेम करावे ? बाकीच्यांना कळवले तसे मला कळवायला हवे होते की नाही ? गुलामाची आपली बायकोदेखील त्याना भाळलेली–अगऽ पण दुकानदाराशी आपल नात काय ? आपण कसे झालो तरी नोकर ना ? तो लेकाचा दुकानदार देखील पक्का वणिग्वृत्तीचा—स्वस्तात राजबिंडा जावई मिळतो, तेव्हा दिली पोरीला फूस— त्याला फुकटात जावई मिळणार, बायकोला श्रीमंत दुकानदारणीची विहीण व्हायला मिळणार, श्रीधरला मनाजोगी मुलगी बायको लाभणार–नि मला ? मला ?...

—आपला विचारच कुणी केला नाही– आजपर्यंत या सगळ्यांना दबून वागत आलो तसेच वागायचे–कसला विचार करायचा नाही–

– विचार ! इथे कसला आचार विचार नाही– डॉक्टर म्हणतो, ' डोक जास्त तापवून घेऊ नका– नाहीतर– '

– एक भयंकर विचार धूमकेतूसारखा दाबकेभाऊंच्या मनी उमटला–' कुणी सांगावं ? आता या क्षणी आपल्याला जबरदस्त झटका आला नि रक्ताच्या चिळकांड्या कवटी फुटून उडाल्या तर–

– तर काय ? काही नाही– बायको ताणून झोपली आहे. मुलगा लग्नाची चित्रे बघत गुगला आहे नि आपण रक्ताच्या थारोळ्यात पडलोत...'

त्याना मग तिथे राहवले नाही. ते न्हाणीशी गेले. चूळ भरून पाण्याचे बरेचसे हपके त्यानी तोंडावर नि तप्त टक्कलावर सपासपा मारले; तेव्हा कुठे त्याना जरा बरे वाटले– मग कुठेही ढुकूनदेखील न बघता ते ओसरीवर आले, धोतर बदलून अडरवेअर त्यानी चढविला नि खुंटाळ्यावरला शर्ट घेता घेता त्याची नजर सहज भिंतीवरल्या फोटोंकडे गेली.

एका फोटोत ते हसत उभे होते, जवळ खुर्चीवर बायको बसली होती. तिच्या मांडीवर लहानगा श्रीधर टोपडे घालून, पायाचा अंगठा चुफीत बसला होता–

जवळच दुसरा मोठा फोटो होता— त्यात मोठा श्रीधर पदवीदानसमारमाच्या वेळी काळी संकासुरासारखी टोपी न् काळा गाऊन घालून उभा होता— त्याच्या हातात एम्. ए.च्या प्रमाणपत्राची सुरळी होती—

टोपडे घातलेला श्रीधर हे पदवीचे छत्र मस्तकी वागविण्याच्या पायरीवर केव्हाच येऊन ठेपला ! तसा तो पायगुणावा. त्याच्या पाठीवर कुमुद, शरद ही दोन्ही मुले नक्षत्रासारखी लामली—

—या आठवणींनी दावकेमाऊंचे हृदय आनदाने भरून जायला हवे होते. पण एखादे गाधीलमाशीचे पोळे डिवचावे नि सहस्र डंख इथे तिथे मारले जावे, जीव व्याकुळ व्याकुळ व्हावा, तसे त्याना वाटले !

अंगणाचे फाटक कुरकुरले. कुमुद, शरद ही दोन्ही मुले हायस्कुलातून मधल्या सुट्टीत आली होती. कुमुद पुढे होती. ती भलतीच थोराड वाटत होती— 'आईचा स्थूलपणा ही उचलणार की काय ? तिची वेपर्वाई हिच्या अगात शिरणार काय ? आता हे हिचे शेवटचे वर्ष— मग उजवून टाकायला हवी— शिकते म्हणते आहे पण करायचं काय शिकून ? त्या दुकानदाराच्या निमासारखं—'

मागून उडया मारीत शरद आला. त्याने अंगणात उभ्या केलेल्या दावकेमाऊंच्या सायकलची घटी टिण् टिण् वाजवली नि 'अजून तुम्ही गेलां नाही ?' असा माव मुद्रेवर आणून त्याने त्यांच्याकडे बघितले. !दोन्ही मुले त्यांच्या अंगावरून वाऱ्यासारखी आत गेली— आतून कुमुदचा आवाज आला— 'माऊऽ, चहा घ्या नि मग जा दुकानात—'

'—अरे हो ! दुकानात जायचं आहे. काही असलं तरी नोकरी टळते थोडीच ?'

दावकेमाऊंनी घडयाळाकडे बघितले— पावण तीन होऊन गेले होते— आता निघायलाच हवे होते.

ते बाहेर आले. भिंतीशी टेकलेल्या सायकलची चाके त्यांनी चाचपली— ती अगदीच पिसपिशीत लागली— हवा भरायला हवी होती— त्यानी पंप घेतला— टयूबमध्ये अडकवला नि पपाचा दट्टया ते ,रेटू लागले. 'खुमक् खुसक्' आवाज करीत हवा भरू लागले— टायर आस्ते आस्ते फुगत होता—

दावकेमाऊंना वाटले— 'आपल्या आयुष्यात आपण अशीच वेळोवेळी हवा भरीत आलो. बापाच्या मागोमाग दुकानदाराकडली ही नोकरी गळयात पडली— बापाने मुळी तिथे जखडूनच टाकले. पहिल्या पहिल्याने जड गेले, पण पुढे लाचारीची, कारकुडेपणाची सवय झाली. पोकळ आयुष्य भरले गेले ! पुढे श्रीधर झाला. आशा वाटू लागली— श्रीधर मोठा होईल, आपल्याला जे होता आले नाही, जे करता आले नाही, ते ते सगळे याच्या बाबतीत करता येईल... हवा भरली गेली. आयुष्याची चाके त्या जोरावर वर्षानुवर्षे भिरभिरत राहिली! पण आता ती हवा पुन्हा गेली आहे ! श्रीधरने दुकानदाराच्याच निमाबरोबर लग्न ठरवले आहे. आता पुन्हा हवा भरावी लागणार आहे ! छे ! या वेळी हे झेपणार नाही. हवेचा दाब मलताच वाढला आहे, टयूब अगदी जुनी होऊन गेली आहे— फाडकन् फुटेल !... '

—पंपावरला दावकेमाऊंचा हात ढिला पडला. फसकन् आवाज होऊन पंप निसटला !

शरद तेवढयात आतून चहा घेऊन आला नि टेबलावर कपबशी ठेवून आत पळताना ओरडला, 'माऊऽऽ चहा ! '

दावकेमाऊ आत गेले. चहा पिता पिता आतल्या गडबडीचा अंदाज घेऊ लागले. बायको उठली असावी. श्रीधर मागीलदारी चूळ भरीत होता. त्याने मग विचारले, 'बापू गेले का ग ? मी येणाराय् म्हणावं संध्याकाळी दुकानात.'

'—उगीचच चौकशी ! त्याला म्हणायचे असेल, "पीडा गेली का एकदाची ?" नाही— नाही रे बावा ! माझी पीडा काही नाही. मी काही बोलत नाही. तुम्हांलाच उलट दवून वागतो आहे. काय वाटेल ते करा ! नाहीतरी या घरात, या जगात मला कसली किंमत आहे ? कोण आपला शब्द पाळते आहे ? येताहेत, जाताहेत, झोपताहेत, चहा करताहेत, लग्ने लावताहेत— आपण मात्र यात कुठेकुठेच नाही... कुठवर झेपते देव जाणे !...'

—दावकेमाऊंनी टोपी चढवली नि सायकल बाहेर काढली.

सायकलवर पाय टाकण्यापूर्वी त्यानी वर बघितले. मोकळे आकाश तिळभर देखील दिसत नव्हते. अभ्राचे भातट, पाढरट लगदे आकाशात ठेचून भरले जात होते— मोकळया टयूबमध्ये हवेचे लोट भरले जावे तसे ! पाण्याचा थेंब जमून यावा, कुठल्या क्षणी टपकन् गळेल ते सागता येऊ नये, तसे वातावरण झाले होते. पुढल्या क्षणी काय होईल, याचा अदाज लागत नव्हता ! ...

सायकलवर बसता बसता दाबकेमाऊंच्या लक्षात आले,— "या वयात अशी नाजूक प्रकृती असताना सायकल वापरणे धोक्याचे आहे. डॉक्टर वेळोवेळी बजावीत आले आहेत त्या लखजी सान्यांसारखे होईल एखादे वेळी ! लखजी असेच उतार वयात सायकल वापरीत— रक्तदाबाचा विकार त्यानी ध्यानात घेतला नाही नि अचानक वाटेतच ते कोसळले... पंधरा दिवस अजून व्हायचेत !... माणसाची काही शाश्वतीच नाही...केव्हा कसा दगाफटका होईल, काही सागता येणार नाही...!"

पण तरीही दावकेमाऊ सायकल वापरीत होते—आज जरा वेगानेच ते पाय मारीत होते. दोन प्रहरची तप्त हवा त्यांच्या कानशिलाशी घासून फणफणत होती—अलीकडे हे असेच होत होते—भरल्या ताटावर असूनदेखील समोर उकिरडा वाढलेला दिसावा तसे वाटत होते. त्यातच आज तर फारच विलक्षण स्थिती झाली होती—दुपारपासून सारखे गुदमरल्यासारखे का वाटते ते लक्षात येईना !

मध्ये चढ लागल्यावर दाबकेमाऊ सायकलवरून उतरले. 'हा चढाव चढून दोन फर्लांग पेठ मागे टाकली की दुकान ! —

दुकान ! नोकरी ! नोकरीपुरतीच ही जखडबंदी असती तर बरे झाले असते—मागे त्या दुकानात पुडया बांधायला असणाऱ्या बद्रू मिरकराने अशीच नोकरी सोडून दिली— पुडीचा दोरा तोडावा तशी ! असे कित्येक नोकर दुकानदाराशी असलेला उपरा संबंध तोडून चालते झाले. आपण मात्र कधीकाळी आपल्या बापाचा दुकानदाराशी असलेला घनिष्ठ सबंध अजून शिरी वागवीत आहोत. आपल्या बापाला धाकटया दुकानदाराचे वडील फार मानीत—आपलाही तसा मान असायला काय हरकत होती ? पण बाप गेला नि ही नोकरीच फक्त शिरावर येऊन पडली—मानसन्मान दूरच्या डोंगरी गेले ! वरचा शुभ्र फुलासारखा भात सपला नि तळचे करपट वाटट पापुद्रे उरले ! वाटत होते—कधीकाळी हे संपेल—पण आयुष्यभर या घाणीतच राहावे लागले—बरे, नोकरी सोडीन म्हटले तर हा जुना सबंध, हे कुटुंब असे आड

येते. समधासारख्या या गोष्टी मान पकडून दाबून टाकतात......!'

चढाव संपवून दाबकेमाऊंनी वळण ओलांडले नि ते पुन्हा सायकलवर बसणार येवढ्यात समोरून येणाऱ्या मुलीकडे त्याचे लक्ष गेले. वाऱ्यावर तिचा पदर उडत होता— मघाशी श्रीधरजवळच्या मासिकाच्या मुखपृष्ठावर नाचणाऱ्या बाईची दाबकेमाऊना आठवण झाली. जवळ आल्यावर त्या मुलीला त्यानी ओळखले. आठ्या घालीत ते म्हणाले, 'कोण निमा ? आत्ता इकडं कुठ ?'

'तुमच्याकडेच !'

'का ?'

'अशीच आपली !'

'अं ?'

—पण निमा कधीच निघून गेली होती— 'ही आपल्याकडे चालली आहे ना ? मग मी भेटलो की ! हो ! हो ! श्रीधरची गाठभेट घ्यायला चालली आहे बेटी ! अरे, जरा बेताने वागा—छे: आता ही पोर घरी जाईल— श्रीधरशी लगट करील—निर्धोक त्याच्या-जवळही जाऊन बसेल !...'

दाबकेमाऊंच्या पायाची तिडीक मस्तकी भिनली—सायकल एकदम वळवावी, निमाला खसकन् ओढून ढकलून द्यावी, असे त्याना वाटले.

पण ते दुकानाच्याच दिशेने सायकलची पायकी मारीत होते. स्वत:चे स्वत:लाच त्याना कळेना—' हे असे विचित्र झाले कसे ? जे दूर करायला निघालो त्याचाच विळखा कसा पडला !...'

दुकानात ते गेले तेव्हा सव्वातीन होत होते. दुपारी आलेला ट्रक पोती घेऊन उभा होता. हमाल मग ती पोती उतरून घ्यायला लागले—काटयावर टाकून त्याचे वजन करू लागले—ते वजन टिपून घेण्याचे काम करायचे होते—पण दाबकेमाऊचे लक्ष एकदम त्यांच्या डेस्कशेजारी येऊन पडलेल्या मोठ्या चौकोनी गठ्ठ्याकडे गेले. वर लिहिले होते—' आमत्रणपत्रिका '

—गेल्या आठवड्यात दुकानदार मुबईला गेले तेव्हा त्यांनी निमाच्या लग्नाच्या निमत्रणपत्रिका छापायला दिल्या होत्या—आजच्या ट्रकने त्या आल्या—दाबकेमाऊना चोरून हे लग्न सगळ्यानी ठरविले होते—श्रीधरला या सुट्टीत लग्न उरकून घेण्याबद्दल दाबकेमाऊ सागणारच होते—पण त्या आधीच त्याचे पत्र आले होते—दुकानदाराची निमा त्याच्याच हाताखाली बी. ए. ला होती—मुबईतच त्याने तिला एकदम पसतही करून टाकली· दोन्ही‡ कडला खर्च दुकानदारच करणार होते—

—आणि दुकानदाराशी श्रीधरचा संबध काडीइतकाही नको असा दाबकेमाऊंचा चग होता !—शेवटी सगळेच उफराटे झाले— विचित्र त्रागडे निर्माण झाले !

गठ्ठ्यावरली अक्षरे ठळठळीत दिसत होती—

'आमत्रणपत्रिका !'

तो गठ्ठा घसमुसळेपणाने फोडून त्यातल्या सगळ्या पत्रिका टरटरा फाडाव्या, अशी तीव्र इच्छा दाबकेमाऊना झाली.

पण तेवढ्यात दुकानदार डुलत डुलत आले. लोडाला टेकून बसत ते म्हणाले, 'वाऽ आल्या वाटत पत्रिका ? बघू !'

—एक पत्रिका उघडून बघत ते म्हणाले, 'छान छापल्यात ह !'

दाबकेमाऊ काहीच बोलले नाहीत. दुकानदारानी हुकूम सोडला—' दाबकेभाव...! आटपा झटक्यासरशी ! नावं घालून टाका यादीप्रमाणं—आजच्या टपालानं सगळ्या पत्रिका गेल्या म्हणजे वेळी पोचतील—'

—' यादीप्रमाणं कादे, बटाटे, गूळ पोचता करा—' असेच जणू दुकानदार म्हणत होते. एवढा लग्नासारखा विषय पण चुटकीसरशी तो सुटला—विचारविचार काही नाही—

'विचार फक्त आपण करायचा—हो ! पण कसला विचारच करता कामा नये. नाहीतर रक्तदाब वाढेल—झटका येईल त्या लखजी साऱ्यासारख होईल—अरे बापरे !...'

दाबकेमाऊचे डोके भलतेच भणाणले. त्यांच्या नितळ टक्कलावर पुनश्च घामाची गर्दी झाली. रुमालाने घाम टिपताटिपता त्यानी आमत्रणपत्रिकाच्या गठ्ठ्याकडे बघितले—दुपारी आकाशात लोटणारे मळभ त्याना आठवले—पिवळट मातट लगद्याचे ढीगढीग लोटत होते. त्याना वाटले—आमत्रणपत्रिकाचे गठ्ठेच्या गठ्ठे आपल्या अंगावर आदळले जात आहेत—त्या ढिगाखाली दबून जायला झाले आहे. त्या ढिगावर मग दुकानदार थपकन मारल्यासारखे बसले. आपली बायको, श्रीधर, निमा—सगळीसगळी खिदळत आहेत. थयथया नाचत आहेत—आपण तुडवले गेलोत, बेडकीसारखे चिरडले गेलो...ईऽऽ...'

'छे: छे: ! हे दडपण झुगारून देईन—हा दाब छेदून टाकीन—हा काचेचा घुमट मुळी आपटून आपटून फोडीन—पण हे काय ? हे कोण असे पप खेचते आहे ? मस्तकात हे काय ठेचून भरले जात आहे ? अहो ! अहोऽ ! मस्तक फुटेल—रक्ताच्या चिळकांड्या उडतील—नको—नको !—'

—तिडिकेसरशी दाबकेमाऊ उठले. पण त्याच्या छातीत मनस्वी कळ आली. वेदनेबरोबर ते भयंकर विचित्र ओरडले नि तिथेच मागच्या लोडावर लवंडले.

माणसे जमा झाली. कुणीतरी दाबकेमाऊच्या नाकाशी कादे फोडून लावू लागले. श्रीधर तेवढ्यात घरून आला. तो तसाच डॉक्टरकडे धावला. पण दाबकेमाऊच्या घशात एकदम घरघरले— तोंडाच्या कडेने फेसाचे बुडबुडे बाहेर पडले नि त्यांचे डोके लोडावरून खाली घसरले.—

—काद्याचा असह्य दर्प दुकानात कोंदला होता !......

●●●

प्रसिद्ध झाले

# मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे

किंमत दोन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

मागील अंकात दिलेले डॉ. सिकदार यांचे चाकोरीबाहेरील, अद्‌भुतरम्य जीवन वाचकांना आठवत असेलच. मानसिक व्याधींनी तुंबलेली अनेक जीवने पुन: प्रवाहित करणाऱ्या डॉ. सिकदार यांच्या व्यावसायिक अनुभवांचे व शास्त्रीय पद्धतीचे हे त्यांचे निवेदन—



# मानसिक विकृती व मानसोपचार पद्धती

मानसिक विकृती आणि मानसोपचार या शास्त्राचा सखोल व शास्त्रशुद्ध अभ्यास प्राचीन भारतीयांनी केलेला होता. परंतु यावरील बहुमूल्य ग्रंथसंपत्तीचा परकीयांनी अपहार केला आणि त्यामुळे या देशात या क्षेत्रातील प्रगती खुंटली. पाश्चात्य देशांमध्ये जादूटोणा, बाधा (विचक्राफ्ट) यावरील भ्रामक समजुती अस्तित्वात होत्या. परंतु अशा संभ्रमात सापडलेल्या व्यक्तीला ठार मारण्याची त्यांची पद्धत होती; हेतू हा की या संभ्रमाचा प्रसार होऊ नये. आपल्याकडेही भूतबाधा, दैवी बाधा यांच्यावर प्राचीन काळापासून विश्वास आहे. ( अजूनही तो बऱ्याच प्रमाणात आहे. ) पण अशा संभ्रमी व्यक्तीला बरे वाटावे म्हणून देवादिकांची शांती, पिशाच्चाला खूष करण्यासाठी बलिदान अशा उपायांची योजना केली जात असे. संभ्रमिताला ठार करण्याचा प्रकार कदापि अस्तित्वात नव्हता— हाच परकीय व भारतीय यांच्या विचारसरणीतला मूलभूत फरक आहे.

## प्राचीन भारतीयांची आघाडी

मानसोपचाराची खरीखुरी सुरुवात इ. स. १७९२ मध्ये पिनेल या फ्रेंच डॉक्टरपासून झाली. आपल्याकडे या शास्त्राचा अभ्यास इ. स. पूर्वी ५०० वर्षे अगोदर सुरू होता हे चरकसंहिता, सुश्रुतसंहिता, वाग्भट यांच्या ग्रंथांवरून दिसून येते. मानसिक विकार हे वात, पित्त, कफ या त्रिदोषांवर आधारभूत आहेत आणि मानसिक विकृतीचे या पार्श्वभूमीवर त्यांनी विविध भाग पाडले आहेत. ग्रीक शास्त्रज्ञांप्रमाणे हे त्रिदोष रक्त, पित्तरस (पिवळा व काळा) यावर आधारभूत धरण्यात आले आहेत. अपस्मार, वातोन्माद, पित्तोन्माद, कफोन्माद, संनिपातोन्माद, मानसिकोन्माद, विषोन्माद वगैरे उन्मादाचे प्रकार भारतीय शास्त्रकारांनी वर्णिलेले आहेत. या विविध प्रकारच्या उन्मादांवर औषधोपचार, सूचक पद्धती, शास्त्रचिकित्सा आणि विरोधपद्धती यांचा अवलंब केला जात असे. आधुनिक शास्त्रातील मेडिसिनल मेथड, सजेस्टिव्ह थिरपी, सर्जिकल व शॉक थिरपी यांच्याशी हे प्रकार निश्चितपणे संलग्न वाटतात. ते वापरीत असलेली साधने मात्र त्या काळाला अनुसरून होती. औषधांमध्ये ते कोठा साफ करणारे पदार्थ, अमली पदार्थ यांचा वापर करीत असत. सूचक पद्धतीमध्ये ते धर्मग्रंथांचे वाचन, करमणुकीचे कार्यक्रम रोग्यासाठी करीत असत. शॉक थिरपीमध्ये रोग्याला ते अचानक उथळ पाण्याच्या विहिरीत टाकीत, एखादा साप अकल्पितपणे त्याच्यापुढे धरीत किंवा शिकवून तयार केलेला हत्ती त्याच्या अंगावर सोडीत असत. उंचीवरून डोक्यावर थंड पाणी ओतणे, कापूर, गंधक आदी जाळणे वगैरे प्रकारही चालत. यावरून भारतीयांची या शास्त्रात केवढी आघाडी होती हे लक्षात येईल.

## संपूर्ण वेडे थोडेच

आधुनिक मानसोपचाराचा जनक म्हणून क्रापेलिन या शास्त्रज्ञाचा उल्लेख केला जातो. त्यानेच व्यावसायिक उपचारपद्धती, करमणुकीची पद्धत, विश्रांती आणि आनंदी वातावरण वगैरे मार्गांचा जोरदार प्रचार केला व प्रसार केला. प्रत्येक देशामध्ये वेड्यांची इस्पितळे (मेंटल असायलम्स) प्रचंड प्रमाणात अस्तित्वात आहेत. आपल्या देशात ठाणा, येरवडा येथील दवाखाने प्रसिद्ध आहेत. अशा दवाखान्यांत दोन दोन हजार रोगी असतात. त्यांच्यावर देखभाल करणाऱ्यांची संख्या अत्यल्प असते. त्यामुळे अशा ठिकाणी रोगी गेलाच तर तो बरा होऊन परतण्याची आशा फारच कमी असते. 'सब घोडे बारा टक्के' हा मामला मानसिक विकृतींच्या रोग्यांच्या बाबतीत अगदी चुकीचा आहे. रोग्याचा आपल्या नातेवाईकांशी संबंध राहत नाही, त्याला डिस्चार्ज मिळून तो बाहेर आला तरी समाजात मिसळणे त्याला फार अवघड होऊन जाते. एक तर त्याचा आत्मविश्वास ढळलेला

असतो व दुसरे म्हणजे समाजाचा त्याचे बाबतीत वेगळा दृष्टिकोन तयार झालेला असतो. ( हा वेड्याच्या दवाखान्यात होता असेच जो तो बोट करून बोलत असतो ) त्यामळे त्याच्या विकृतीचा नक्की प्रादुर्भाव ( रिलॅप्सेशन ) होतो. यासाठी आम्ही आमच्या केंद्रात रोग्याच्या नातेवाईकाला त्याच्याजवळ राहायची परवानगी देतो. आजार जुजबी स्वरूपाचा असल्यास त्याच्या घरी जाऊन उपचार करण्याचा प्रघात आम्ही पाडलेला आहे. मानसिक विकृतीचा रोगी हा इतर रोग्यांहून भिन्न असतो असे मानण्याचे कारण नाही. इतर रोग्याप्रमाणे त्याला स्वतंत्र पलंग, ताजी हवा, प्रसन्न वातावरण करमणुकीची साधने यांची आवश्यकता असते. आमच्या केंद्रात दर गुरुवारी भजनाचा कार्यक्रम असतो. मला आढळले आहे की एखादा रोगी तबला वाजविण्यात, पेटी वाजविण्यात, किंवा गाण्यात चांगलाच तरबेज असतो. भजनाच्या वेळी तो आपण होऊनच सामील होतो आणि त्याला त्यात केवढे समाधान लाभते !

तसे म्हटले तर रोग्यामध्ये संपूर्ण वेडाचे प्रमाण २० ते २५ टक्केच असते. मानसिक विकृतीचे प्रमाण शेकडा ७५ असू शकते. कित्येकांची अशी कल्पना आहे की आनुवंशिकतेने आलेली विकृती सुधारणे शक्य नाही. पण हे खोटे आहे. असे रोगीही बरे होतात. मात्र रोग्याने मधून मधून तपासणी करून घ्यायला हवी (चेक अप्) व उद्रेकाचा समय आला की ताबडतोब उपचार करून घ्यायला हवेत. ब्लड प्रेशर, मधुमेहासारख्या आजारा प्रमाणेच आनुवंशिक चक्रमपणाची अवस्था असू शकते.

## विकृतींचे प्रकार, कारणे

मानसिक विकृतीची कारणे अगदी अगणित ताऱ्याप्रमाणे असंख्य असू शकतात. प्रत्येक प्रकृतीची भूमिका भिन्न भिन्न असू शकते. आजकालचा धकाधकीचा काल म्हणजे चिंता-काळजी यांनी ओतप्रोत भरलेला आहे. एखाद्या मुलाच्या मनाचा कल साहित्यशाखेकडे असतो. पण त्याच्या आईबापांना तो इंजिनियर व्हवा, डॉक्टर व्हावा असे वाटत असते. अशा परिस्थितीत जबरदस्ती झाली की मुलाचे मन उद्विग्न होते आणि त्याचे मन लवचिक असेल तर त्याच्यामध्ये विकृती निर्माण होते. मुलांमध्ये लैंगिक बाबतीत ज्या

*

# निवेदक


## डॉ. बी. एम्. डेब सिकदार

बी. एस्सी., एम्. बी. बी. एस्., डी. पी. एम्.

कृपामयी नर्सिंग होम, मिरज

लेखक

## एस्. ए. कुलकर्णी


* * *

काही गुप्त सवयी लागलेल्या असतात त्याच बाबतीत रक्ताचे दहा थेंब म्हणजे एक वीर्याचा थेंब वगैरे माहितीचे स्वस्त माहितीची पुस्तके वाचण्यात आली की ती बिघडतात. मुलींची लग्ने कशी होतील, नोकरीत बढती केव्हा मिळेल, कर्ज कसे फिटेल वगैरे विचारात सदैव चिंतामग्न असणाऱ्या व्यक्तीमध्ये विकृती निर्माण होऊ शकते. एखाद्याला एखाद्या गोष्टीचा भयंकर राग आला असला परंतु तो त्याने आवरण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला तरीही एखाद्या प्रसंगाने त्या अनावर भावनेचा उद्रेक होतो. लैंगिक असमाधान हे कित्येक तरुण-तरुणींच्या मनोविकृतीस कारणीभूत असलेले आढळते. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीचा लाभ झाला नाही, दुसऱ्याच कुणाशी लग्न झाले की संभ्रमावस्था प्राप्त होते. थकवा, मानसिक न्यूनगंड, डोकेदुखी, आतड्याचा व्रण (अल्सर), अस्थमा, (दमा), मनोदौर्बल्य, भीती, तसेच लैंगिक आजार अशातरी कारणावरूनही विकृती निर्माण होऊ शकते. कित्येक शारीरिक व्याधींस मानसिक विकृतीची पार्श्वभूमी आधारित असते. अशा वेळी सर्वसाधारण वैद्याची औषधे उपयोगी पडू शकत नाहीत.

मानसोपचाराचे तंत्र आज अतिशय पुढे गेलेले आहे. नार्को अनॅलिसिस (मनोविकाराचे पृथक्करण) ही पद्धती अत्यंत उपयुक्त ठरलेली आहे. रोग्याच्या मनात विचाराचे व विकाराचे एक प्रकारचे मिश्रण झाले असते (कॉम्प्लेक्स) ; त्याचे पृथक्करण करण्याची पद्धत निघालेली आहे. मादक द्रव्याचे सेवन केल्यानंतर मनुष्य मादक पदार्थांचा अमल असेपर्यंत फार वेगळा वागतो—काही तरी बडबडतो, गातो, हसतो; या प्रकाराचे निरीक्षण करून ही पद्धत अमलात आणली आहे. त्यासाठी रोग्याला आम्ही एका बंदिस्त खोलीत नेतो. तेथे डॉक्टरखेरीज कुणालाही येऊ देत नाही. त्याला सोडियम ॲमीटल, मेथेड्रिन हायड्रोक्लोराईड किंवा थायोपेंटोन सोडियम याचे इंजेक्शन देण्यात येते. डोस रोग्याच्या एकंदर प्रकृतिमानावर ठरविण्यात येतो. ॲमिलो बारबिटोनच्या कॅप्सूल्सही वापरल्या जातात. नंतर रोगी दहापंधरा मिनिटांत अर्धवट बेशुद्धावस्थेत येतो. तेव्हा डॉक्टर त्याच्याशी बोलू लागतात. रोग्याच्या अंतर्मनातील कप्पे आपोआप उघडले जातात. यावरून विकृतीचे अचूक कारण समजते व मग निदान समजून घेऊन उपचार केले जातात.

## चित्रे आणि चरित्रे

नार्को अनॅलिसिसमधली काही उदाहरणे तुम्हांला गमतीदायक वाटतील. एका रोग्याला वाटत होते की आपली मान थरथरते व तुटून पडते. त्याने पृथःक्करणाच्या वेळी सांगितले की माझे आईबाबा मला न आवडणारी एक मुलगी लग्नसंबंधाने माझ्या गळ्यात बांधू इच्छीत आहेत. एका मुलीला एका पायाचा अर्धांग झाला होता व पाय सपशेल लुळा पडला होता. तिच्यासाठी शेकडो फिजिशिअन्सनी उपचार करून अपरंपार पैसा लाटला. शेवटी पृथःकरणाच्या वेळी समजले की तिला न आवडणाऱ्या नवऱ्याबरोबर जबरदस्तीने समागम करावा लागतो. तिच्या अर्धांगाचे कारण म्हणजे हा एक प्रकारचा जबरी संभोगच होता. एका तेरा वर्षे वयाच्या मुलीची वाचा सतत सात वर्षे बंद होती. पुष्कळ प्रयत्न झाले परंतु काहीही उपयोग झाला नाही. परंतु नार्को अनॅलिसिसच्या पहिल्याच मुलाखतीत कळून आले की तिच्या आईच्या धमकीनेच ती मुकी झाली होती. एक बडे गृहस्थ डोकेदुखीने जवळजवळ बारा वर्षे त्रस्त झाले होते. त्यांनी या किरकोळ आजारापायी वीस हजार रुपये खर्च केले ! ते माझ्याकडे आले नि पृथःकरणामध्ये डोकेदुखीचे कारण वेगळेच असल्याचे आढळले. त्याचा प्रेमभंग झाला होता. त्याच्यावर योग्य ते उपचार केल्यावर एका आठवड्यात त्यांना बरे वाटले. अशी ही मनाची बाब आहे. मनुष्याचे मन म्हणणे कमालींचा अजब


मामला आहे. आपल्या नवऱ्याचा भावजयीशी संबंध आहे, आपल्या बायकोचा शेजाऱ्याशी संबंध आहे, आपली बायको फार सुंदर आहे– मग ती पतिव्रता कशी असणार, आपला नवरा देखणा आहे वगैरे अनेक कारणे मनोविकृतीच्या बुडाशी असतात. समागम-सौख्य पुरेपूर लाभत नाही किंवा वासना आवरत नाही म्हणूनही कित्येकांची डोकी फिरतात. नुसता साहेब रागावला, शिक्षक बोलले एवढ्या क्षुल्लक कारणावरून मुले–तरुण बिथरतात. ऐन परिक्षेच्या वेळी आजारी पडल्यावर वर्ष बुडाले म्हणून हळहळत काही मुले आपोआप मुखस्तंभ होऊन जातात. स्त्रियांमध्ये मासिक पाळी बंद व्हायची वेळ आली, मुलगा बाल्यत्वामधून तारुण्यात प्रवेश करू लागला, मुलगी संसारी जीवनात शिरू लागली किंवा स्त्री-पुरुषांना वृद्धत्व येऊ लागले म्हणजे मनोविकारांमध्ये चलबिचलता निर्माण होण्याची शक्यता फार तीव्र असते.

आपल्याकडे भूतबाधा झाली, झपाटले, भीती वाटली वगैरे प्रकार अजूनही अस्तित्वात आहेत. अशा प्रसंगी व्यक्ती वेगळी भाषा बोलते, वेगळेच काही करते, स्त्री-पुरुषाप्रमाणे वागते बोलते, पुरुष स्त्रीप्रमाणे चालतो बोलतो; यावरून झपाटणारे भूत पुरुष किंवा स्त्री असा मांत्रिक लोक अर्थ लावीत सुटतात. परंतु खरे कारण म्हणजे त्या व्यक्तीच्या अंतर्मनावर (सब्-कॉन्शस माइंड) काही संस्कार, परिणाम अप्रत्यक्षपणे घडून आले असतात– त्यांचाच असा उद्रेक झालेला असतो. त्याला जरूर ते मानसिक स्वास्थ्य मिळाले की तो चटकन बरा होतो. माझ्याकडे एक अत्यंत गरीब समाजातला धार्मिक प्रवृत्तीचा मॅट्रिक्युलेट विद्यार्थी रोगी म्हणून दाखल झाला. त्याची तक्रार एवढीच होती की त्याला नेहमी स्वप्नात व जागेपणी नाग, साप दिसतो. पृथःकरणामध्ये मला आढळून आले की तो स्वतःला अर्जुन समजत होता व नागलोकात जाऊन उलुपीबरोबर विवाह करू इच्छीत होता. एक जण जमिनीला कान देऊन ऐकत असे नि म्हणत असे की मुंग्या काय बोलतात ते ऐकतो. 'मला हात लावू नका-मी काचेचा आहे, फुटेन' असे म्हणणारा इसम काचेच्या भांड्यांचा दुकानदार होता. काही रोग्यांना जगातले आपले अस्तित्व (एक्झिस्टन्स) नसल्यासारखे वाटते. आपण या जगात नाहीच असा त्यांना भास होत असतो.

## ९० टक्के बरे होतात

जे रोगी आरडाओरडा, दंगा करणारे असतात किंवा मारायला उठतात, गळफास लावून घेण्याचा प्रयत्न करतात, अशा अनेकविध विकृतींच्या रोग्यांना इलेक्ट्रिक शॉक देण्यात येतो. तो केवळ अर्धा सेकंदाचाच असतो. त्या वेळी रोगी हातपाय झाडून थोडा वेळ धडपड करतो एवढेच. पण त्याला कोणतीही इजा होत नाही. दीड तासाने तो सरळ घरी चालतही जाऊ शकतो. इन्शुलिन इंजेक्शन देऊन चार पाच तास बेशुद्ध करण्याचा उपचारही आहे. या सर्वांचा हेतू एवढाच असतो की रोग्याला मानसिक विश्रांती मिळावी, त्याच्या मनामध्ये वावरत असलेल्या काही गूढ विचारांचा त्याला काही काल विसर पडावा हाच असतो. त्या गोष्टीची त्याला हळहळू भूल पडते. व तो बरा होतो. झोपेची औषधेही प्रथमावस्थेत वापरण्यात येतात. इतर आजाराप्रमाणे मनोविकृतीच्या केसीस जुन्या झाल्या (क्रॉनिक) म्हणजे मात्र उपचारांच्या उपयोगांची शाश्वती सांगता येत नाही. यास्तव सायकॅस्ट्रिस्टची (मानसोपचारतज्ञांची) मदत शक्यतो प्रथमास्थेत घेणे आवश्यक असते. प्रथमावस्थेतील रोग्यांपैकी शेकडा ९० रोगी बरे होतात आणि तेही दोन तीन आठवड्यांच्या आत, असा माझा अनुभव आहे. इतर वैद्यांना (फिजिशिअन्स) रोग्याच्या एखाद्या शारीरिक व्याधीमागे मानसिक विकृतीचा अंश आहे असा नुसता संशय आला तरी त्यांनी मानसोपचारतज्ञांचा सल्ला घेणे इष्ट आहे. परंतु आपली बिले फुगवीत नेणाऱ्या वैद्यराजांसंबंधी आम्ही काय सांगावे ! त्यांचा खेळ होतो, परंतु तो रोग्याच्या जीवनाशी खेळ होऊन बसतो– त्याला इलाज नाही ! एका रोग्याला पोटात एक वीत अंतरावर वरून खाली व खालून वर चाक फिरवल्याप्रमाणे वेदना होत. त्याचे इतर वैद्यांनी जवळ जवळ साठ एक्स–रे फोटो काढले. यावरून त्याचे किती पैसे गेले असतील याची कल्पना येईल. पृथक्करणात कळले की त्याच्या सावत्र आईने त्याला विष घातले असा समज झाला होता. थोड्याशा उपचाराने व त्याच्या बापाने त्याला दूर ठेवल्यावर तो पंधरा दिवसात खडखडीत बरा झाला.

डॉक्टर सिकदार हे मानसोपचारतज्ञ म्हणून अतिशय प्रसिद्ध आहेत. त्यांनी मिरज येथे "कृपामयी नर्सिंग होम" नावाची संस्था १६ मार्च १९६३ पासून सुरू केली असून हजारो रोग्यांचा त्यांनी आजवर दुवा संपादन केला आहे. त्यांनी 'मानसोपचार' या विषयावरील एम्. डी. पदवीचा पहिला प्रबंध लिहिला असून तो मान्यही झालेला आहे. 'कृपामयी नर्सिंग होम'मधील नोकरवर्गही चांगला अनुभवी व पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला असा आहे. श्री. थॉमस, श्री. डेव्हिड, श्री. काकासाहेब पाटील, श्रीमती हेर्लेकर व खुद्द डॉक्टरांच्या पत्नी हे नर्सिंग होमची बाजू सांभाळतात. केंद्र मानसोपचारांतील सर्व आधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे. डॉक्टरनी मिरज-सांगली रस्त्यावर अडीच एकरांचा प्लॉट घेतला असून चालू वर्षी तिथे ते मानसोपचाराचे मोठे केंद्र स्थापन करणार आहेत





**तो बाहेर उभा राहून सगळी गंमत पाहत होता. मुलगा....नातवंड....बायको....सगळी रंगून गेली होती. त्याने पडदा बाजूस केला....अरेरे! सगळे एकदम असे गप्प का झाले?**

# अनोळखी

मूळकथा : श्री. बलवंतसिंह

अनुवाद : सौ. विजया देखणे

--व्हरांड्यात तो जिथं बसला होता तो भाग त्याच्या बंगल्याच्या एका बाजूस होता.

रात्रीची वेळ होती. पाऊस पडून गेलेला असल्यामुळे आकाश स्वच्छ झालं होतं. चांदण्या लहान मोठ्या बत्ताशाप्रमाणे चहूकडे पसरल्या होत्या. झाडाच्या फांद्या खाली मान घालून गहन विचारात गढून गेल्यासारख्या दिसत होत्या. पाऊस पडून गेलेला असल्यामुळे हवेत गारठा होता; परंतु तो सुखकारक वाटत होता. आणि प्रत्येक वस्तुमात्रानं मौनव्रत घेतल्यासारखं वाटत होतं... मात्र त्यात उदासीनता अजिबात नव्हती. उलट प्रत्येक वस्तू अत्यंत आनंदानंतर येणाऱ्या पूर्ण सुखाच्या गुंगीत गुंगून गेल्यासारखी वाटत होती. ...आता जणू प्रत्येक झाड-झुडुप, प्रत्येक घर, प्रत्येक वीट, प्रत्येक दगड, गवताची पानं ही सगळी निद्रेच्या आधीन झाल्याप्रमाणे दिसू लागली. जणू त्या एखाद्या नशेत आहेत! उद्या सकाळी प्रत्येक वस्तू जागी होईल, मग हे सगळे मिळून पुन्हा एकाच तालावर एखादं नवं गीत किंवा नृत्य सुरू करतील.

बाहेरच्या जगात इतकी शांतता होती; परंतु त्याच्या डोक्यात एका नवीन विचारानं थैमान मांडलं होतं.

या वेळी त्याचं वय साठ वर्षांच्या पुढं आहे. प्रकृती चांगली असली तरीही वृद्ध. पूर्वीप्रमाणे रंग आणि उत्साह आता कुठे! या वेळी तो आरामखुर्चीवर पडून रात्रीच्या अंधाराला निरखीत होता.

हा बंगला त्यानंच बांधला होता. आपल्या खोलीसमोरच्या व्हरांड्यात अशा तऱ्हेनं बसण्याची त्याची अनेक वर्षांपासूनची सवय आहे. समोरच्या अंधुक अंधारात टेनिस–कोर्टावर ओढलेल्या फक्कीच्या रेघा थोड्या थोड्या दिसताहेत. टेनिस कोर्टाच्या एका बाजूला एक लोखंडी बाक पडला आहे. जेव्हा त्यानं हा बंगला बांधला तेव्हाच हा बाक तिथं पक्का रोवून टाकला होता. तेव्हापासून आजपर्यंत ऊन, पाऊस आणि थंडीमधे हा बाक पडून आहे. तरीही तो अजूनही जसाच्या तसा आहे कुणास ठाऊक कसल्या लोखंडाचा बनवला आहे!

जीवनात कितीतरी वेळा तो त्याच्यावर बसला होता. झोपला होता. त्याला धरून किती तरी वेळा उभा राहिला होता. त्याची पत्नी, त्याची मुलं आणि इतर अनेकांनी त्याचा उपयोग केला होता तरीही त्याचं काही बिघडलं नव्हतं. प्रत्येक वस्तू बदलली. मुलं मोठी झाली. तो तारुण्यातून वृद्धावस्थेत आला. ती गुबगुबीत आया--जिला मुलांना सांभाळण्याकरता ठेवलं होतं, आणि जिच्या गालावरून त्याची नजर चटकन दूर होत नसे–ती आतां म्हातारी झाली होती...परंतु हा बाक?...

कधी कधी मनुष्य अशा गोष्टींचा विचार करावयाला लागला म्हणजे असल्या या निर्जीव गोष्टीपासून त्याच्या मनाला फार दुःख होतं. इमारती, रस्ते, डोंगर नद्या झाडं इत्यादि मनुष्याच्या जीवनात येतात पण जशाच्या तशाच रहातात. मनुष्य मात्र सारखा बदलत असतो. त्याला दिसतं की आजूबाजूच्या वस्तूंत कुठलाही फरक पडलेला नाही; फरक पडलेला असतो त्याच्यातच! त्यामुळे माणसाला फार दुःख होतं. त्याला वाटतं, जगाचा बाजार अजूनही जोशांत आहे आणि त्याला स्वतःला मात्र तिथून धक्के देऊन बाहेर काढलं जात आहे. तो डोंगर–ज्याच्यावर तो हां हां म्हणता चढून जात होता, आता नुसतं त्याच्याकडे पाहूनच धाप लागते आणि तो डोंगर जणू त्याच्या दुर्बलतेला हसतो आहे. ती नदी–जी पूर्वी हात पसरून त्याला ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत पोहत जाण्याचं आमंत्रण देत होती,

ती आता त्याची कमजोरी जाणून हळूच हसून पुढे निघून जाते. तरुणी—ज्या कधी त्याच्या नजरेसमोर खाली मान घालीत, त्या आता, " चल रे बाबा, रस्ता सोड ! " अस म्हणून चटकन तोंड वळवून निघून जातात.

त्याच्या कानाना थंडी जाणवू लागली. त्यानं त्याच्यावर मफलर गुडाळून घेतला आणि व्हराड्यांत टांगलेल्या कुंड्यांच्याकडे पाहू लागला. कोमल नाजूक फांद्या खाली लटकल्या होत्या. फिक्या रंगाची फुलं अगदी स्थिर होती, जणू नृत्य करता करता एकदम थांबली आहेत. अजुनही कुंड्यांतून पाणी ठिबकतं आहे थेंबाथेंबानं...

एकाएकी आलेल्या हसण्या खिदळण्याच्या आवाजानं तो दचकला. ही त्याचीच मुलं होती. दोन मुल आणि तीन मुली. सगळ्यांत मोठ्या मुलाच वय अठ्ठावीस वर्षं होतं. त्याच्याहून लहान असलेल्या मुलीचे चोवीस; तिचही लग्न झालेलं आहे. एकोणीस वर्षांची दुसरी मुलगीपण विवाहित जीवन व्यतीत करीत आहे. लहान मुलगा चौदा वर्षांचा आणि सगळ्यात लहान मुलगी बारा वर्षांची. सगळे एका गावात आल्यामुळं ह्या हसण्या खिदळण्याच्या मैफलीत त्याची सून, छोटासा नातू आणि त्याची पत्नी पण सामील झाली होती.

ते सगळे हसत खेळत होते आणि तो एकटा बसला होता. नेहमी असच होत आलंय्. पूर्वी तो आपल्याच उद्योगात गढून गेलेला असे; त्यामुळं ही गोष्ट त्याला कधी खटकली नव्हती. त्याचे आपले मित्र असत, ज्याच्याबरोबर खाणं, पिणं, गाणं—बजावणं—सगळं—काही होत असे. त्यावेळी घरच्या एखाद्या माणसानं त्याचा जर जास्त वेळ घेतला तर त्याला ते त्रासदायक वाटत असे. घरात त्याचा धाक असे. मुलं त्याच्याजवळ कधी विशेष येतही नसत आणि पत्नीशी त्याचा संबंध इतकाच होता की, जितका एका कर्मकुशल पतीचा असावयास पाहिजे. मुलाचं रडणं-ओरडणं, त्यांचा हट्ट, त्यांचा गडबड-गोंधळ तो सहन करू शकत नसे. मुलाना जर दाडगाई करावयाची लहर आली तर ते त्याच्यापासून दूर जाऊन करीत. म्हणून त्यानं आपली खोली अगदी एका बाजूला घेतली होती. मुलं जेव्हा थोडी मोठी झाली तेव्हा आपल्या वडिलांचा स्वभाव त्याना चांगला समजू लागला आणि त्यानी त्याप्रमाणेच आपली वागणूक ठेवली. तेव्हा वडीलही मुलांवर खूष झाले.

काळ चालला होता ! आठवडे, महिने आणि वर्षे निघून गेली. आता त्याचं शरीर दुर्बल झालं आहे. आता तो तरुणाच्या बैठकीत भाग घेऊ शकत नव्हता. तितकी शक्तिही नव्हती त्याच्यांत, की त्यांच्यासारखं हिंडणं फिरणं त्याला जमलं असतं. उरले सुरले दोन चार म्हातारे याचीच सोबत उरली होती, ज्याच्याबरोबर काठी टेकत टेकत तो पार्कवर फिरायला जातो. बहुतेक म्हाताऱ्यांच्या तरुण आणि तरुणीच्या बाबतीत काही ना काही तक्रारी असतात. नाहीतर नातेवाईकाच्या गोष्टी. गेलेल्या दिवसांच्या स्मृती. आत्मा आणि परमात्मा याचा सयोग कसा होऊ शकतो ? अशा तऱ्हेच्या गप्पा म्हातारे आपल्या दंतहीन झालेल्या तोडून करतात. या गोष्टीतून विशेष तथ्य निघत नाहीच, उगीच वेळ घालवायचं साधन आणि आपल्या मनाला धीर देण्याची खटपट असते ती. कारण मनातून सगळे या गोष्टीचा अनुभव घेत असत की आता आपला काळ सपला आणि आज ना उद्या या जगातून आपला गाशा आपल्याला गुडाळावयाचा आहे !

—मात्र जगात अजूनही बैठकीना रंग भरतो आहे. ज्योतीमोवती घिरट्या घालून पतंग आत्मबलिदान करीत आहेत. जगाच्या नित्यक्रमात थोडासासुद्धा फरक पडलेला नाही...म्हणजे तेच जीवन होतं ? त्याच्यासाठीच सगळी धडपड होती ?

जगाच्या रंगलेल्या बैठकीतून अशा तऱ्हेनं अपमानित होऊन दूर काढल जाणं किती दुःखदायी असतं ! भरलेल्या बैठकीतून घालवून देणारासुद्धा कसा दबल्या पावलांनी नकळत पुढे येतो, ते ह्या कानाचं त्या कानालाही कळत नाही. जणू तो माणसाला हळूहळू चहूकडून घेरतो आणि एक दिवस बाहेर उकिरड्यावर फेकून देतो ! बैठक नेहमीच रंगलेली असते. ती गझल, ती ठुमरी, ती मदिराक्षी ! माणसाला इच्छा असूनही केवळ निःशक्त झाल्यामुळे तो या बैठकीला अयोग्य ठरतो. इच्छेविरुद्ध बैठकीतून निघून जावं लागतं...काय ? माणसाला वेडा बनवायला हे पुरेसे नाही ?

त्यान चाचपडत शेजारच्या तिपाईवरचं सिगारेटचं पाकीट उचललं. एक सिगारेट ओठात धरून ती पेटवली. उठणाऱ्या धुराच्या पातळ चादरीतून मटारच्या वेलीकडे तो बघू लागला, जी आपल्या नाजूक फाद्यारूपी करानी मांडवाच्या बाबूंना घट्ट लपेटून त्याच्या आधारान उभी होती.

पुन्हा त्याची विचारधारा पत्नीकडे वळली. पूर्वी त्याने तिच्याकडे विशेष कधी लक्ष दिल नव्हतं— कधी एके काळी दोघही तरुण होते तरीसुद्धा— ! आता ती पण म्हातारी झाली आहे. परंतु तिच्याकडे पाहून ती असतुष्ट आहे असं मुळीच वाटत नाही. जर ती असंतुष्ट नव्हतीच तर ती तशी कशी दिसणार ! ती कोणावर चिडत नाही की उगीच बडबडहि करीत नाही फारशी.

स्त्रियांना तो नेहमीच बुद्धीहीन समजत आला आहे. पण आता विचार करताना त्याला वाटू लागलय् की ही बुद्धिहीनताच त्याच्या सुखाचं साधन आहे ! ही बुद्धिहीनताच त्याच्या पथ्यावर पडते तर ! मध्यंतरी एकदा त्याचा सर्वांत मोठा मुलगा आईच्या मांडीवर डोक ठेवून झोपलेला त्यानं पाहिला. मोठी अजब गोष्ट होती. त्याच्यापुढे त्याचा ह्य मुलगा अगदी विल्लीमांजर होऊन वागतो. तोच एका मुलाचा बाप होऊन सुद्धा आपल्या आईजवळ किती मोकळ्या मनान आणि आनंदानं वागू शकतो !

जगातल्या बैठकी राहू दे दूर. स्वतः त्याच्या घरची बैठक सुद्धा अजूनही गरम आहे. उलट पूर्वीपेक्षाही जास्त. कारण त्याची सूनही घरात आली होती आणि तिनं एका छोट्या मुलाला जन्मही दिला होता. नातवाच्या रडण्याच्या आवाजाबरोबरच त्याला आपल्या मुलांचा भाडल्याचा आणि आरडाओरडीचा आवाजही ऐकू येई. कधी लाब ते एकमेकांच्या मागे धावताना दिसत, कधी कधी आधळी कोशिंबीर खेळताना ते आईलाही त्यात घेतल्याखेरीज राहात नसत. बिचारीला डोळ्यावर पट्टी बांधून चोर पकडण भाग पडे !

अन् इकडे तो होता, की मुलं निर्माण करण्याचं काम केल्यानतर त्यांना जणू विसरून गेलेला. ते आपोआप मोठे झाले. शिकले सवरले. आणि जगाच्या बैठकीत आपली जागा भूषवू लागले.

एकाएकी त्याच्या मनात आलं. त्याच्या मनात एक रंगीत तरंग उठला— " काय तो

आपल्या मुलांच्या खेळात भाग नाही घेऊ शकत ? नक्कीच तो इतका दुर्बल झालेला नाही की तो थोडसही दूर जाऊ शकणार नाही ! तो ओरडू शकतो, गाऊ शकतो, आणि नाचूसुद्धा शकतो—

तो गुपचूप सिगारेटचा धूर सोडीत राहिला. त्याच्या मनावरचं ओझ कमी होऊ लागलं तरीही थोडचा हिंमतीची जरूरी होती. तो आपल्या टक्कल पडलेल्या डोक्यावरून हात फिरवीत कल्पनेतच नाचणं खेळणं पहात होता. तो काठी टेकीत टेकीत त्याच्यात जाऊन बसेल अचानक. अखेर ती त्याचीच मुलं होती ना. कधी काळी जे छोटे छोटे होते आणि आपल्या बोबडचा बोलांनी बोलत होते— आज मोठे झाले आहेत म्हणून काय झालं ? ते मोठे झाले ते त्यांच्यापुरते. आपल्याला तर ती कालची पोरं आहेत.

लांबच्या खोलीतून गाण्याचे आणि हसण्याचे आवाज येत होते. नाव चालली होती; आणि तो उगीचच होडीशिवाय उभा होता. एका अधाऱ्या कोपऱ्यात. त्याच्या शरीराचे तुकडेच होते ती मुलं, की जी आनदानं गाणी गात चालली होती— खरोखर तो त्याना दूर ठेवून त्याच्यापासून तुटक का बरं झाला होता?...

इतक्यात त्याच्या मोठचा मुलाचा खूप मोठ्यानं हसल्याचा आवाज आला—

तो चमकला ! त्याच्या मुलाच्या आवाजात आणि त्याच्या आवाजात किती साम्य होतं ! त्याचे मित्र पण म्हणत, की त्याच्या या मुलाचा आवाज अगदी थेट त्याच्या सारखाच आहे ! म्हणून त्याची नेहमी फसगत होते...खरोखरच त्याचा मुलगा कोणत्या गोष्टीमुळे इतका हसतो आहे ? कसली फिकीर नाही, कसली काळजी नाही. कृत्रिमता नाही. एका अल्लड तरुणाच दिलखुलास हसू...जणू त्याचा आत्मा कुठल्या नवीन शरीरात मिसळून गेला आहे. त्याला एक प्रकारचा आनद होऊ लागला. काय झाल त्याचं स्वत:च्या शरीर, तुटलेल्या जहाजासारखं झाल असलं म्हणून ? त्याचा आत्मा तर त्याच्या मुलाच्यामध्ये आहे, की ज्याच्या चेहऱ्यावर एकसुद्धा सुरकुती नाही. एक दिवस त्याचा मुलगासुद्धा म्हातारा होईल. परतु तोपर्यंत त्याचा छोटा मुलगा जवान झालेला असेल आणि त्यालाहि त्याचा आत्मा एका नव्या शरीरात आनंदानं रहात असलेला जाणवेल...या प्रमाणे अनत कालपर्यंत हे चक्र चालू राहील.. खोलवर विचार केला तर कोणालाही भरल्या बैठकीतून घालवून दिलं जात नाही. कारण शरीर वृद्ध झाल तरी आत्मा...तो नाही वृद्ध होत. तो जून आणि जीर्ण शरीरातून उठून नवीन, ताज्या, आणि शक्तिशाली शरीरात प्रवेश करीत राहणार !

सिगारेटचा उरलेला तुकडा त्यानं लाब फेकून दिला. तो ठिणग्या उडवीत व्हराडचाच्या बाहेर जाऊन पडला...तेव्हा त्यानं हातात काठी घेतली, गुडघे चोळले आणि मग एकदम उठून उभा राहीला.

हळू हळू काठी टेकीत तो बंगल्याच्या दुसऱ्या बाजूला आला, जिथं घरच्या लोकाची बैठक रगात आली होती. त्या हास्याच्या लाटा आणि ते बोलणं लाबून जे अस्पष्ट ऐकू येत होतं, आता जवळ आल्यामुळे स्पष्ट ऐकू येऊ लागल. त्याचं मन मुलांच्या हर्षभऱ्या हास्यात मिसळून आनदानं नाचू लागलं.

तो अंधेऱ्या भागातून आला होता. जसा जसा पुढे येऊ लागला तसातसा प्रकाशात येऊ लागला, इतका की त्या खोलीच्या अगदी जवळ येऊन पोहोचला, जिथे सगळे गप्पात आणि हसण्यात रगून गेले होते. तो दरवाज्यावरचा फुलदार कापडाचा पडदा सरकविणार, इतक्यात त्यानं आपला हात मागे घेतला आणि नुसता उभा राहिला जरा वेळ.

खोलीत टचूबलाईटच्या प्रकाशात त्याची पत्नी एका तक्क्याला टेकून बसली होती. सर्वात मोठा मुलगा आपल्या आईच्या मांडीवर डोकं ठेवून झोपला होता. आणि तो आपल्या छोटचा मुलाला हातात धरून उंच करीत होता. उच फेकलं म्हणजे तो गुलाम आनदाने खदखदून हसत होता. एक मुलगी तक्क्याच्या मागून आईच्या गळचात पडली होती आणि तिला तिच्या आईनं धरून ठेवल होत. सून खुर्चीवर बसून स्वेटर विणीत होती. सगळचात लहान मुलगी हातात एक छोटी काठी घेऊन नाचत होती आणि म्हणत होती, "वैजयंतीमाला कस नाचते दाखवू ?" आणि अस म्हणून कमर लचकावीत ती नाचू लागली. बरोबर थेट तिच्याच मागे त्याचा छोटा मुलगा उभा होता आणि कापडाची बनवलेली शेपटी तिच्या वेणीला बाधण्याच्या खटपटीत होता. त्याच्या चेहऱ्यावर खोडकर भाव पसरले होते आणि बाकीची मडळी त्याचा डाव ओळखून त्याला मदत करीत होती. ते नाचणारणीचं लक्ष आपल्याकडे वेधून घेत होते. डाव यशस्वी होण्याकरीता एक मुलगी जाजमावर पडल्या पडल्या भावाला पाडण्याच्या खटपटीत होती. तिची खटपट यशस्वी झाली. इकड उच फेकलेल्या मुलाची लाळ त्याच्या बापाच्या नाकावर टपकन् पडली...मग काय ? एकदम खूप मोठा हशा पिकला.

—तो बाहेर उभा राहून सगळी गंमत पहात होता—मग एकदम पडदा बाजूला करून आत दाखल झाला.

क्षणभर तर कोणाला तो आल्याच समजलच नाही. हसणं आणि ओरडण जसच्या तसं चालू होत मात्र जेव्हा तो खोलीत आल्याचं त्याच्या लक्षात आल, तेव्हा सगळे एकदम गप्प झाले.

—मोठा मुलगा आईच्या माडीवरचं डोकं उचलून एकदम सरळ उभा राहिला. ती मुलगी, जिच्या वेणीला शेपूट बांधलं होतंकोपऱ्यात जाऊन बसली. आणि ज्यानं शेपटी बाधली होती तो मुलगा घाबरून बाहेर पळून गेला. सूनबाई आणि दुसऱ्या मुलीही पदर सावरीत मुकाटचाने बसून राहिल्या. इतकच नव्हे तर त्याची बायकोसुद्धा जी तक्क्याला टेकून आरामशीर बसली होती ती चटकन सरळ बसली.

तो पूर्वी असा अचानक कधी आला नव्हता. नेहमी लाबूनच खोकत खाकरत येत असे, की सगळचानी सावध व्हावं. त्यामुळेच तर सगळे लोक इतके घाबरून गेले. जणू चिमण्याच्या घरटचात सापच शिरला एकाएकी !

त्यानें हळूच सगळचाच्याकडे पहाण्याचा प्रयत्न केला, परतु त्याला वाटल, इतकी वर्षं आपण त्याच्याकडं लक्ष दिल नाही, त्यामुळे ते त्याच्यापासून इतके दूर गेले आहेत, की आता त्याला ती जवळ यावीत असं वाटत असतानासुद्धा त्याच्यात त्याच्याजवळ येण्याचं साहसच उरलेलं नाही. त्याना तो कुणी अनोळखी, अपरिचित वाटतो.

—जित्या जागत्या माणसाच्या त्या खोलीत स्मशानवत् शातता पसरली होती...जणु एका अनोळखी इसमाच्या आगमनानं !

• • •

THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRER
यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

## लेखांक सहावा

जेव्हा ऱ्हाईनलँड जर्मनीने कबजात घेतला त्या वेळी आपली मनःस्थिति वर्णन करताना ऑस्ट्रियाचा नवा चॅन्सेलर डॉ. शुशेनिग याने लिहिले होते,

" डोलफसच्या थडग्याजवळ उभा असताना माझ्या मनात हेच येत होते, की यापुढे ऑस्ट्रियाचे स्वातंत्र्य टिकवावयाचे असेल तर मला जर्मनीच्या खुशामतीच्या नव्या मार्गाने गेले पाहिजे. "

शुशेनिग या नव्या मार्गाने जाऊ लागला. पण खुशामतीने कोणता आक्रमक आजवर संतुष्ट झाला आहे ?



: १ :

११ जुलै १९३६ ला ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर डॉ. शूशेनिग याने जर्मनीशी जो मैत्रीकरार केला त्याअन्वये नाझी पक्षाशी सहानुभूती असलेल्या ऑस्ट्रियातील ' राष्ट्रीय पक्ष ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पक्षाचे सर्व सभासद बंदीवासातून सुटले. ( याशिवाय नाझी पक्ष होताच ! ) पॅपेन याने तेव्हापासून डॉ. शूशेनिगवर वाढते दडपण आणण्याचा उद्योग जारी ठेवला होता. १९३६ च्या अखेरीस फ्यूररला पाठविलेल्या गुप्त अहवालात त्याने हे धोरण सांगितले होते. त्यात तो लिहितो—

" Only by subjecting the Chancellor to the strongest possible pressure can further progress be made. "

[ चॅन्सेलरवर जास्तीत जास्त दबाव आणून यापुढील प्रगती करता येईल. ]

हा दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. देशात कुठल्यातरी भागात बॉंबस्फोस्ट होऊ लागले होते. आज या शहरात तर उद्या त्या खेड्यात ! याच्या जोडीला नाझी जर्मनीशी नाते जोडू पहाणाऱ्या लोकांची मोठाली निदर्शने आखण्यात येऊ लागली. डॉ. शूशेनिग यांना डोलफसच्या मार्गानेच उडवण्याचा एक कटही पोलिसांनी उघडकीस आणला—२५ जाने. १९३८ !

व्हिएन्ना ही ऑस्ट्रियाची राजधानी ! आतापर्यंत बर्लिनमध्ये राहिलेला वुइल्यम शिरर याची नेमणूक आता रेडिओ वार्ताहर म्हणून व्हिएन्नात झालेली होती. १९३७ च्या डिसेंबरमध्ये शिरर व्हिएन्नात आला. यामुळे या सुमारास ऑस्ट्रियात घडणाऱ्या घटनांची सुसूत्र मांडणी केलेली आढळते.

४ फेब्रुवारी १९३८ ला पॅपेनला व्हिएन्ना येथील जर्मन वकिलातीत फोन आला. बर्लिनहून राज्यमंत्री हान्स लॅकर्स हा फोनवर बोलत होता. फोनवरून पॅपेनला कळवण्यात आले,

' न्यूराथ, फ्रिट्श् यांचेबरोबर पॅपेनलाही निवृत्त करण्यात आले आहे ! '

पॅपेन क्षणभर अवाक् झाला. खोली आपल्याभोवती गरगर फिरू लागली आहे असे त्याला वाटले. परंतु त्याने लगेच हे ताडले की याचा अर्थ फ्यूररची तावडतोब ऑस्ट्रियात गडबड करण्याची इच्छा दिसते !

पॅपेनची हकालपट्टी हा डॉ. शूशेनिगला इशाराच होता. पॅपेन हा राजकारणात थोडासा सभ्य विचारांचाच समजला जात असे. म्हणजे तो अपेक्षेपेक्षा बराच कमी पाताळयंत्री होता. शिवाय धर्माने तो कॅथॉलिक असल्यामुळे डॉ. शूशेनिगला त्याचा थोडा आधार वाटे.

मध्यंतरीच्या काळात जर्मनी व इटाली यांची (Axis) युती झाली होती व आता मुसोलिनी ऑस्ट्रियाच्या मदतीला येण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच. इंग्लंडचा नवा पंतप्रधान नेव्हिल चेंबर्लेन हा हिटलरच्या प्रियाराधनेलाच लागला होता. फ्रान्समध्ये नेहमीप्रमाणे पंतप्रधानांची बैठक अस्थिर होती. अशा स्थितीत पॅपेनची व्हिएन्नातून उचलबांगडी झाल्यामुळे डॉ. शूशेनिग धास्तावला. धास्तावलेले राजकीय नेतृत्व हे नेहमी आत्मघातकी ठरते ! अशा नेतृत्वाला सतत जे उबड

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उघड शत्रू आहेत त्यांची मनधरणी करीत राहण्याखेरीज अन्य धोरणच नसते. डॉ. शूशेनिगने ठरवले, पुनः एकदा फ्यूररला आणखी काय सवलती हव्या आहेत याचा कानोसा घ्यावा.

पॅपेन हा कारकुनी वृत्तीचा माणूस होता. साहेबांनी दिलेली चपराक त्याला फारशी लागत नसे. फ्यूररने त्याला फोनवरून 'डिसमिस' केला. त्याची प्रतिक्रिया एवढीच झाली की दुसऱ्याच दिवशी ५–२–१९३८ ला ही स्वारी हिटलरला भेटावयास बर्चेसगार्डन येथे गेली.

हिटलर हा या वेळी मागे सांगितल्याप्रमाणे लष्करी अधिकाऱ्यांशी उडालेल्या झगड्यांचा शीण घालवण्यासाठी विश्रांतीला आलेला होता. हिटलरच्या बाबतीत महत्त्वाची गोष्ट ही होती, की त्याच्या वृत्ती ताळ्यावर येण्यास फार वेळ लागत नसे–His recuperative powers were considerable. ] त्यामुळे पॅपेन त्याला भेटला तेव्हा त्याने तो काय म्हणतो हे शांतपणे ऐकले. पॅपेनने सांगितले की, " डॉ. शूशेनिगला भेटायला का बोलवत नाही ? मी त्यांच्याशी बोलणी करून आलो आहे. तो धावत भेटायला येईल. "

**शूशेनिगचे आगमन**

हिटलरने विचार केला, की ही क्लृप्ती बरी दिसते. त्याने पॅपेनला सांगितले की परत व्हिएन्नाला जाऊन भेट निश्चित कर.'

डॉ. शूशेनिगने भेट घेण्याचे मान्य केले. कारण त्याला भेट हवीच होती. परंतु त्यापूर्वी त्याने दोन अटी घातल्या––

(१) ११ जुलै १९३६ च्या कराराप्रमाणे जर्मनीने ऑस्ट्रियाचे स्वातंत्र्य मान्य केले आहे व अंतर्गत राज्यकारभारात ढवळाढवळ न करण्याचे कबूल केले आहे. या दोन्ही गोष्टी पुढे चालूच राहतील



अशी हमी पुन: मिळावी.

(२) बैठकीत कोणते प्रश्न चर्चेला येतील त्याची कल्पना तो व्हिएन्नाहून निघण्यापूर्वी त्याला देण्यात यावी.

डॉ. शूशेनिग हे समजून होता, की आपण सिंहाच्या गुहेत जातो आहोत. जास्तीत जास्त खबरदारी घेण्याच्या दृष्टीने त्याने या अटी पुढे केल्या. पॅपेनने हिटलरचे उत्तर आणले—

" १९३६ चा करार आहे तसाच राहील, परतु त्यानतर काही गैरसमज व वादग्रस्त मुद्दे निर्माण झाले आहेत. त्याचे समक्ष निराकरण करावे हा या भेटीचा हेतू आहे. "

हे उत्तर डॉ. शूशेनिगला कितपत अनुकूल होते ? जवळजवळ नव्हते. परंतु धास्तावलेला नेता नेहमी स्वत:लाही फसवत असतोच. डॉ. शूशेनिगने सागितले, ' ठीक आहे. आता भेटीला जाण्यास हरकत नाही ! '

१२ फेब्रुवारी १९३८ ही भेटीची तारीख ठरली. ११ फेब्रुवारीला शूशेनिग व ऑस्ट्रियाच्या परराष्ट्रखात्याचा अडरसेक्रेटरी श्मिद (Guidu Schmidt) असे दोघे खास गाडीने गुप्तपणाने साल्सवर्ग (Salzburg) येथे जाण्यास निघाले. साल्सवर्गहून मोटारीने हे दोघे बर्चेसगार्डनला दि. १२–२–१९३८ ला सकाळी जाणार होते.

ऑस्ट्रियन पाहुण्यांच्या स्वागताला स्टेशनवर पॅपेन स्वत: हजर होता. गाडीतून खाली उतरताच हस्तांदोलने झाली, हवापाण्याची चौकशी झाली. पॅपेनने सांगितले, फ्यूरर फार चांगल्या मन:स्थितीत आहे. डॉ. शूशेनिगलाही बरे वाटले.

मोटारीत सर्व जण बसले व मोटार बर्चेसगार्डनच्या दिशेने वेग घेऊ लागली. अगदी सहज सागावे तसे पॅपेनने म्हटले,

" कालच अचानक जनरल कायटेल आपल्या दोन सहकाऱ्यांसह फ्यूररला भेटावयास आला आहे. आपल्या भेटीच्या वेळी आणखी हे तिघे लष्करी अधिकारी असतीलच. पण त्याने फारसे बिघडत नाही."

डॉ शूशेनिगने खरे पाहता या गोष्टीला नकार द्यावयास हवा होता. परंतु पाहुणे जातो आहोत, तर यजमानाच्या घरात कुणी असावे, कुणी नसावे, हे आपण कोण ठरवणार ? अशा विचाराने तो काहीच बोलला नाही. मौनं संमतिलक्षणम् !

आपल्या निवासात हिटलर शूशेनिगची वाट पाहत होता. त्याच्या अंगात तपकिरी रंगाचा S. S. गणवेषातील 'ट्युनिक' होता. काळ्या ट्राउझरमध्ये तो काहीसा उग्र दिसत होता. हिटलर, कायटेल व इतर दोन जनरल्सनी त्याचे निवासाच्या पायरीवर स्वागत केले.

शूशेनिगला घेऊन हिटलर आपल्या भेटीच्या दालनात आला. दुसऱ्या मजल्यावर हे दालन होते. जिना चढून वर येताच कायटेल व त्याचे सहकारी शेजारच्या दालनात अदृश्य झाले. भेटीच्या दालनात फक्त हिटलर व शूशेनिग हे दोघेजण उरले.

### गुहेतील गडगडाट

खिडकीबाहेर आल्प्स् पर्वताची बर्फाच्छादित रांग दिसत होती. ही रांग ओलाडली की ऑस्ट्रियाची सरहद्द सुरू होत होती. शूशेनिग व हिटलर या दोघाचाही जन्म ऑस्ट्रियातच झालेला होता.

अर्थातच ४१ वर्षे जगाचा अनुभव घेतलेल्या शूशेनिगने सहजगत्या संभाषणाची सुरुवात खिडकीतून दिसणारे रम्य दृश्य, बर्चेसगार्डनमधील निवासाची सुंदर निवड व हवापाण्याच्या स्तुतीने केली. डॉ. शूशेनिग एकटाच बोलत असताना हिटलरने एकदम त्याला खडसावलाच,

" We did not gather here to speak of the fine view or the weather ! "

' हवापाण्याच्या आणि रम्य दृश्याच्या गप्पा मारण्यासाठी आपण येथे जमलेलो नाही. '– हे वाक्य हिटलरच्या तोडून येताच डॉ. शूशेनिगला आपल्यापुढे वाढून ठेवलेल्या वादळाची काहीशी कल्पना आली. या भेटीचे वर्णन डॉ. शूशेनिगनेच पुढे केल्यामुळे ही सर्व नाट्यमय हकीकत उपलब्ध आहे. हिटलर जवळजवळ दोन तास याच चढ्या आवाजात त्याला खडसावीत राहिला,

" You have done everything to avoid a friendly policy, the whole history of Austria is just one uninterrupted act of high treason. And I can tell you right now, Herr Schuschnigg, that I am absolutely determined to make an end of all this. "

[ स्नेहाचे धोरण टाळण्याच्या दृष्टीने आपण सतत वागला आहात. ऑस्ट्रियाचा सर्व इतिहास म्हणजे एका ओळीने केलेल्या राष्ट्रद्रोही कृत्याची मालिकाच आहे. मी तुम्हांला आताच स्पष्ट सागतो, हर शूशेनिग, मी या प्रश्नाचा सोक्षमोक्षच लावायचा निश्चय केलेला आहे.]

यावर डॉ. शूशेनिग म्हणाला,

" परंतु ऑस्ट्रियाने जर्मन इतिहासात बरीच भर घातली आहे."

[ Austria's contribution is considerable. ]

हिटलर सतापून म्हणाला,

" Absolutely zero. I am telling you absolutely zero. Every national idea has been sabotaged by Austria. "

[ कसली कपाळाची भर ! मी सांगतो ही भर शून्य आहे. प्रत्येक राष्ट्रवादी विचारसरणीला ऑस्ट्रियाने सुरुग लावलेला आहे. ]

पुढचे संभाषण याच तारेत सुरू राहिले–।

**डॉ. शूशेनिग** : परंतु ऑस्ट्रियाचा वाटा जर्मन संस्कृतीतून वेगळा काढताच येणार नाही.

**हिटलर** : मी सांगतो ते नीट ध्यानी घ्या. मला काही इतिहासवत्त कार्य करावयाचे आहे. नियतीने ही जबाबदारी माझ्यावर टाकली आहे असा माझा विश्वास आहे. मला ठाऊक आहे की माझा मार्ग कठीण आहे. परंतु जो आडवा येईल त्याला दूर करण्याचा माझा निर्धार आहे. जर्मन जनतेच्या विश्वासावर हे कार्य सुरू झाले आहे.

**डॉ. शूशेनिग** : मला या गोष्टीला विरोध करावयाचा नाही. तुम्हांला आम्ही कोणत्या गोष्टी कराव्यात असे वाटते तेवढे कळू द्या. शक्य असेल तेवढे आम्ही करू.

**हिटलर** : हे तुम्ही बोलता; मग जर्मन-ऑस्ट्रियन सरहद्दीवर बंदोबस्त उभा करण्याचे कारण काय ?

**डॉ. शूशेनिग** : ही गोष्ट खोटी आहे.

**हिटलर** . तुम्हाला असे वाटते का, की ऑस्ट्रियात जे घडते ते मला कळत नाही ? एखादी गोष्ट घडल्यापासून चोवीस तासाच्या आत ती माझ्या कानी येते. मी फक्त आज्ञा देण्याची खोटी आहे, एका रात्रीत तुमच्या संरक्षण तटबंदीला आम्ही उडवू शकू. अर्धा तास तरी तुम्ही प्रतिकार करू शकाल काय ? तुम्ही असे समजू नका की

जगाच्या पाठीवरचा, कुणी हरीचा लाल माझ्या निर्णयाविरुद्ध आवाज करील. इटाली आमचा दोस्त आहे. इंग्लड इकडची काडी तिकडे करणार नाही; फ्रान्स माझ्या हिशेबातच नाही.

**डॉ. शूशेनिग** : तुमच्या अटी तरी काय आहेत ?

**हिटलर** : समझौता करण्याची शेवटची संधी मी तुम्हांला देत आहे. या प्रश्नाचा समाधानकारक निकाल याच भेटीत लागला पाहिजे. तसे झाले नाही तर प्रसंगोपात जे घडेल ते घडल्याशिवाय राहणार नाही. यासंबधी आपण पुढे दुपारी बोलू.

" We find a solution now or else events will take their course ! Think it over. I can only wait till this afternoon. We can discuss that this afternoon. "

खाण्याचे वेळी हिटलर मोठ्या खुषीत होता. अमेरिकेपेक्षा उंचच उंच स्कायस्क्रेपर्स ( गगनचुंबी इमारती ) जर्मनीत उभ्या करू असे त्याने जेवताना सांगितले. घोडे व घरबांधणी या दोन गोष्टींवर संभाषण बराच वेळ रेंगाळत होते. डॉ. शूशेनिग हा अखंड धूम्रपान करणारा असूनही फ्यूररच्या पुढे त्याने सिगरेट ओढू नये असे त्याला बजावण्यात आले होते. अर्थातच डॉ. शूशेनिग अस्वस्थ होता. जेवण आटोपताच वामकुक्षीसाठी हिटलरने शूशेनिगची रजा घेतली व तेवढ्या वेळात डॉ. शूशेनिगला सिगरेट पेटवता आली. खोलीत डॉ. शूशेनिग व अंडरसेक्रेटरी श्मिद असे दोघेच दोन तास होते.

दोन तासानंतर दोन्ही ऑस्ट्रियन पाहुण्याना रिबेन्ट्रॉपच्या भेटीला नेण्यात आले. न्यूराथच्या जागी नेमलेला हा नवा जर्मन परराष्ट्रमंत्री दोघांना अपरिचित होता. रिबेन्ट्रॉपने दोघासमोर दोन पानी टाईप केलेला मसुदा ठेवला. हिटलरच्या या अखेरच्या किमान मागण्या आहेत व यावर आता चर्चा होणार नाही असे रिबेन्ट्रॉपने बजावले. डॉ. शूशेनिगला थोडे बरे वाटले की निदान फ्यूररला नेमके काय हवे ते तरी समोर आले. इतका वेळ सकाळपासून नुसताच गडगडाट सुरू होता व तो मावळला होता.

### शूशेनिगची शरणागती

मसुद्यातील मजकुरावरून नजर फिरताच मात्र त्याचा उत्साह मावळला. हिटलरच्या मागण्या होत्या :

१. ऑस्ट्रियात नाझी पक्षावरील बंदी लगेच उठवली जावी व सर्व नाझी बंडखोरांना मुक्त करावे.

२. व्हिएन्नातील नाझी पुढारी व पेशाने वकिली करणारा डॉ. सेयस इन्क्वार्ट (Dr. Seyss Inquart) याला सरकारात अंतर्गत मंत्री (Minister of the Interior) नेमावे. ग्लाईस (Glaise) या नाझीविषयी सहानुभूती असणाऱ्या पुढाऱ्याला युद्धमंत्री नेमावे.

३. नाझी व ऑस्ट्रियन सैन्यात सद्‌भावना राहावी याकरता १०० लष्करी अधिकाऱ्यांची अदलाबदल करण्यात यावी.

४. जर्मनीच्या आर्थिक व्यवस्थेत ऑस्ट्रियाने सहभागी व्हावे यासाठी त्वरित उपाययोजना व्हावी. या दृष्टीने डॉ. फिशबॉक ( Dr. Fishbocck ) याला अर्थमंत्री म्हणून स्वीकारण्यात यावे.

मसुदा वाचून होताच डॉ. शूशेनिगच्या हे लक्षात आले की या अटी स्वीकारणे म्हणजे ऑस्ट्रियन स्वतंत्रतेला नख लावण्यासारखे आहे.

भेटीला येण्यापूर्वी पॅपेनजवळ जी आश्वासने त्याने मागितली होती व जी दिली गेल्याचे पॅपेनने त्याला कळवले होते त्या आश्वासनाला या मसुद्यातील अटींनी हरताळ फासला होता. डॉ. शूशेनिगने पॅपेनची भेट मागितली. पॅपेनने भेटीत तो मसुदा वाचला व आश्चर्य प्रकट केले. लग्नाची ठरवाठरव करताना, मधला माणूस जसा ऐन लग्नाचे-वेळी सोईस्करपणे गडप होतो, तसाच हा प्रकार होता. तुमचे त्याचे काय ठरले हे आपल्याला माहित नाही, असे असते तर आम्ही पूर्वीच विचार केला असता, अशा सोयीस्कर पळवाटा यामुळे उपलब्ध होतात. पॅपेनने आश्चर्य प्रदर्शित केले; परतु सल्ला काय दिला ?

" मसुद्यावर सही करा ! मला हिटलरने आश्वासन दिले आहे की एवढ्या अटी तुम्ही मान्य केल्या तर ऑस्ट्रियाला यापुढे कसलाच त्रास होणार नाही."

पॅपेन गेला. डॉ. शूशेनिगला मग पुन्हा फ्यूररकडे नेण्यात आले. हिटलर आपल्या दालनात फेऱ्या मारीत होता. डॉ. शूशेनिग आत येताच तो म्हणाला,

" Her Schuschnigg, there is nothing to be discussed. I will not change one single iota. You will either sign it as it is, within three days, or I will order march into Austria. "

[ हेर शूशेनिग, यापुढे चर्चा नाही ! मी मसुद्यातील एक शब्दही बदलणार नाही. तीन दिवसाची मुदत देतो. एकतर या मसुद्यावर सही करा, अन्यथा मला ऑस्ट्रियात सैन्य घुसवण्यासाठी आज्ञा द्यावी लागेल. ]

डॉ. शूशेनिगने शरणागती दिली; परतु तो सही देईना. तो म्हणाला, " मी सही करून काय उपयोग ? ऑस्ट्रियन घटनेप्रमाणे ऑस्ट्रियन प्रजासत्ताकाच्या अध्यक्षाची सही यावर लागेल. मी परत जातो व अध्यक्षाना सही करण्याचा सल्ला देतो. परंतु अध्यक्ष काय करतील याबाबत कसलेच आश्वासन मी देऊ शकत नाही. "

हिटलर कडाडला, " आश्वासन द्यावे लागेल. "

" मी ते देऊ शकत नाही. "

डॉ. शूशेनिगकडून हा नकार ऐकताच हिटलर शेजारच्या खोलीच्या दाराशी गेला व त्याने पलीकडील खोलीत बसलेल्या जनरल कायटेलला हाक मारली, " जनरल कायटेल—! "

कायटेल आत येताच हिटलर डॉ. शूशेनिगला म्हणाला, " तुम्ही बाहेर थांबा. मी पुनः बोलावतो. "

डॉ. शूशेनिग दालनाबाहेर गेला. श्मिद तेथेच बाहेर बसलेला होता. दोघे बाहेर वाट पहात उभे राहिले. दोघांचा तर्क झाला की हिटलरने जनरल कायटेलला सैन्ये घुसवण्याचा हुकूम दिला असावा. निदान त्याबाबत निर्णय आत चालू आहे. दोघाची धाबी दणाणली.

अर्ध्या तासाने डॉ. शूशेनिगला पुनः आत बोलावण्यात आले. हिटलरने सांगितले—

" I warn you, this is your very last chance. I have given you three additional days to carry out the agreement. "

[ ही मी तुम्हाला शेवटची संधी देतो आहे. मी आणखी तीन दिवस देतो. या तीन दिवसांत या करारनाम्यावर शिक्कामोर्तब झाले पाहिजे. ]

डॉ. शूशेनिगने बर्लिन सोडण्यापूर्वी सही दिली. हा करारनामा

कसला ! ही तर ऑस्ट्रियन स्वातंत्र्यावर पडलेली मृत्युझेप होती. १२ फेब्रु. १९३८ !

## : २ :

एखाद्या राजकीय पुढाऱ्यावर जेव्हा सामर्थ्याचा दबाव आणला जातो तेव्हा त्याची वागणूक ही अनेकांना कोड्यात पाडते. तसे पाहिले तर डॉ. शूशेनिग हा जरी केवळ चाळिशीच्या वयाचा असला तरी काही अगदीच कच्च्या मातीचा नव्हता. डोलफसच्या खुनानंतर त्याने आपल्याकडून ऑस्ट्रियाचे स्वातंत्र्य टिकवण्याची विलक्षण धडपड केली होती. असे असूनही ११ फेब्रुवारी १९३८ ला हिटलरने लष्करी कारवाईचा आसूड उगारताच, त्याने शरणागती पत्करली. त्याच्या देशबांधवांना आणि इतिहासकारांना त्याचे हे कृत्य मोठे आश्चर्यजनक वाटते. डॉ. शूशेनिगने शरणागती पत्करली नसती आणि हिटलरचे लष्करी आव्हान त्याने स्वीकारले असते तर परिस्थिती काय झाली असती ?

हिटलरने अजून आपल्या राष्ट्राची मोठ्या युद्धाच्या आगमनासाठी मानसिक सिद्धता केलेली नव्हती. समजा, ऑस्ट्रियाने प्रतिकार केला असता व ब्रिटन–फ्रान्सनी ऑस्ट्रियासाठी युद्ध पत्करले असते तर हिटलरला यावेळी हे सर्व परवडणारे नव्हते. जगाच्या डोळ्यात हिटलरचे हे आक्रमण मोठा अत्याचार ठरला असता. परंतु हे सर्व हिटलरने यावेळी टाळले ते केवळ डॉ. शूशेनिग या व्यक्तीच्या आत्मविश्वासालाच आघात करून ! डॉ. शूशेनिगला बर्चेसगार्डन येथे जी वागणूक देण्यात आली, ज्या पद्धतीने त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे पोतेरे करण्यात आले त्यामुळे डॉ. शूशेनिगने हाय खाल्ली. इतकेच नव्हे तर बर्चेसगार्डन येथील करारावर सही दिल्यानंतर त्याने हिटलरशी जे संभाषण केले त्याचा रोख, आता तरी माझ्यावर प्रेम करशील ना ? असा लाळघोटेपणाचा होता. त्याने हिटलरला विचारले,

"जगातले संघर्षाचे प्रश्न शांततेने सुटतील असे आपल्याला वाटते काय ?"

हिटलर उत्तरला,

"का नाही सुटणार ? माझ्या म्हणण्याप्रमाणे गोष्टी होऊ शकल्या तर हे केव्हाही शक्य आहे."

डॉ. शूशेनिगला वाटले, हिटलर थोडासा धडपणे बोलत आहे. म्हणून त्याने फ्यूररला विनंती केली,

"आपल्या भेटीबद्दल जे सरकारी पत्रक निघेल त्यात १९३६ चा करार पाळण्याबाबत दोघांचे मतैक्य झाले असा उल्लेख असावा."

हिटलरचा पारा पुन्हा चढला. आपल्या उद्दिष्टाबाबत येवढा सावध नेता क्वचितच जन्माला येतो. हिटलरने ताडकन् सांगितले, "नाही, तसा उल्लेख असणार नाही. प्रथम तुम्ही आमच्या नवीन अटी कार्यवाहीत आणल्या पाहिजेत. वृत्तपत्रांना येवढेच पत्रक देण्यात येईल की, आज डॉ. शूशेनिग यांनी फ्युररची बर्चेसगार्डन येथे गाठ घेतली. बस्स, यापेक्षा पत्रकात अधिक काही असणार नाही."

जमा केलेला डॉ. शूशेनिगचा उरला सुरला उत्साहही निमिषार्धात मावळला. फ्यूररच्या वतीने करण्यात आलेले रात्रीचे भोजनाचे निमंत्रण त्याने नाकारले व त्याच दिवशी डॉ. शूशेनिग व श्मिद हे मोटारीने साल्सबर्गला निघाले. मोटारीत त्याचेबरोबर पॅपेन होता. आपल्याकडून तो दोघांच्या वृत्ती सुधाराव्यात म्हणून प्रयत्न करीत होता. परंतु डॉ. शूशेनिग प्रवासभर उदासीन होता. आपल्या देशाचे स्वातंत्र्य विकून आपण परतत आहोत याचा विषाद त्याला सहन होत नव्हता.

डॉ. शूशेनिग व्हिएन्नाला परतला. १५ फेब्रुवारीपर्यंत ऑस्ट्रियाने बर्चेसगार्डन येथे केलेला करार स्वीकारल्याचे फ्यूररला अधिकृतरीत्या कळवावयाचे होते व १८ फेब्रुवारीपर्यंत कराराच्या सर्व अटी अमलात आणावयाच्या होत्या. १२ फेब्रुवारीला व्हिएन्नात आल्याआल्याच डॉ. शूशेनिग अध्यक्ष मिकलास (Miklas) यांना भेटायला गेला.

### फितुरांची कामगिरी

अध्यक्ष मिकलास हा सामान्य कुवतीचा माणूस होता. म्हणून तर अध्यक्षपदाची नामधारी सूत्रे त्याचेकडे आली होती. वर्षाकाठी त्याच्या घरात अव्याहत पाळणा हालत असे; या पलिकडे पुरुषार्थाशी त्याचा फारसा संबंध आलेला नव्हता. अर्थात मूळचा तो रांगडा शेतकरी होता. म्हणूनच डॉ. शूशेनिग जिथे हताश झाला तिथे या बावन्न वर्षांच्या अध्यक्षाने थोडासा ताठपणा दाखवला. मिकलासने बाकी सर्व अटी मान्य केल्या, परंतु सेयस इन्क्वार्ट याला पोलिसदलाचे अधिकार सुपूर्त करण्याचे त्याने साफ नाकारले. त्यामुळे पॅपेनने, अध्यक्षानी दिलेला हा नकार तावडतोब बर्लिन येथे कळवला. अर्थात याच निवेदनात त्याने हेदेखील कळवले की, अध्यक्षाचा विरोध नाहीसा व्हावा यासाठी डॉ. शूशेनिग प्रयत्न करीत आहे.

हे निवेदन बर्लिनला सकाळी पोहोचले. सायकाळी ७॥ वाजता हिटलरने, जनरल कायटेलने ऑस्ट्रियावर लष्करी दबाव आणण्याची जी योजना तयार केली होती त्यावर सही केली. ही योजना काय होती ?

" Spread false but quite creditable news, which may lead to the conclusion of military preparations against Austria. "

[ सपशेल खोट्या परंतु निराधार वाटणार नाहीत अशा वार्ता प्रसृत करा की ज्यामुळे ऑस्ट्रियाविरुद्ध लष्करी कारवाईचे आदेश सुटले असा निष्कर्ष (ऑस्ट्रियात) निघेल. ]

दि. १३ आणि १४ या दोन दिवसात जर्मनीत सैन्याच्या हालचाली सुरू झाल्याच्या विलक्षण वार्ता ऑस्ट्रियात पसरल्या. याचा परिणाम तात्काळ झाला. दि. १५ फेब्रुवारीची सायंकाळ उजाडण्यापूर्वी अध्यक्ष मिकलासने आपला विरोध मागे घेतला. पॅपेनला डॉ. शूशेनिगने कळवले की, दि. १८ फेब्रुवारीपूर्वी बर्चेसगार्डन करार संपूर्णतया अमलात येईल.

१६ फेब्रुवारीला डोलफसच्या खुनाच्या आरोपाखाली पकडलेले सर्व नाझी सुटले !

१८ फेब्रुवारीला सेयस इन्क्वार्ट हा नाझी हस्तक संरक्षणप्रमुख (Minister of Security) म्हणून मंत्रिमंडळात नेमला गेला. चोराच्या हाती अशा रीतीने जामदारखाना गेला.

सेयस इन्क्वार्ट हा नाझींना मदत करणारा पहिला क्विसलिंग (Quisling– फितूर) होय. १९१८ पासून याच्या मनात जर्मन–ऑस्ट्रिया याचे एकीकरण व्हावे हा विचार होता. १९१८ मध्ये पहिले महायुद्ध संपले व व्हर्सायच्या तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या, तेव्हा

**हिटलर ऑस्ट्रियात पोहोचतो**



फ्यूररच्या येण्याचा मार्ग जाहीर झाल्याबरोबर नगरानगरातून स्वागताच्या कमानी उभ्या झाल्या. ज्यांना ऑस्ट्रिया-जर्मनीचे ऐक्य हवे होते ते नेते ठरले. नको होते त्यांना मूग गिळावे लागले. अर्धातरी लॉबकळणारी सामान्य जनता उत्साहाने या नव्या कल्लोळातहि सामील झाली—– ' हाईल हिटलर ! हाईल हिटलर ! ! "

ऑस्ट्रिया जर्मनीला जोडा अशी मागणी पुढे आली. परंतु दोस्तांनी हे होऊ दिले नाही. १९१८ ते १९३३ पर्यंत ऑस्ट्रियातील बहुसंख्य लोकांना जर्मनीशी एकीकरण घडू नये असेच वाटत होते यात शंका नाही. कारण, सुखासुखी आपले स्वातंत्र्य बर्लिनच्या कक्षेत का लोटावे ? असे असूनही सेयस इन्क्वार्टसारख्या कडव्या लोकांना ऑस्ट्रियाचे जर्मनीशी एकीकरण अटळ आहे असेच वाटत होते. या दृष्टीने ऑस्ट्रियाचे स्वातंत्र्य टिकविणाऱ्या सरकारात मंत्रिपद स्वीकारून त्याने मंत्रिमंडळाला आतून सुरुंग लावण्याचीच कामगिरी आपल्यापुढे ठेवली. यात तसे पाहता फारसे काहीच चुकले नाही. ऑस्ट्रियाच्या स्वातंत्र्याचा विचार करता मात्र ही फितुरीच ठरते.

## हिटलरची नवी मागणी

२० फेब्रुवारीला हिटलरने राईशस्टॅगपुढचे आपले वार्षिक भाषण दिले. हे भाषण वस्तुतः ३० जानेवारीला व्हायचे, परंतु ब्लोमबर्ग, फ्रिट्श यांच्या प्रकरणात भाषण पुढे ढकलावे असे ठरले. आता भाषण करताना हिटलरला पुनः वेगळा उत्साह आला होता. त्याच्या हिशोबाने ऑस्ट्रियाचे जर्मनीशी एकीकरण हा फक्त कालावधीचा प्रश्न उरला होता. आपल्या भाषणात हिटलरने सांगितले—

"Over ten million Germans, live in two of the states adjoining our frontiers. There must be no doubt about one thing. Political separation from Reich may not lead to deprivation of the general rights of self-determination. To the interest of the German Reich belongs the protection of those German people who are not in a position to secure along our frontiers their political and spiritual freedom by their own efforts."

[एक कोटीहून अधिक जर्मन नागरिक आमच्या सरहद्दीला लागून असलेल्या दोन देशांत राहत आहेत. एक गोष्ट निर्विवाद आहे की आमच्यापासून राजकीय दृष्टचा ते दुभंगलेले असले तरी त्यामुळे केवळ स्वयंनिर्णयाचा सर्वमान्य अधिकार त्यांना नाही असा याचा अर्थ नाही. या सरहद्दीपलीकडील जर्मन लोकांचे संरक्षण करणे हे जर्मन राईशचे कर्तव्य आहे. कारण आपल्या आध्यात्मिक व राजकीय स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याची शक्ती सरहद्दीपलीकडे असलेल्या या आपल्या देशबांधवांत आज नाही.]

सरहद्दीपलीकडील जर्मन लोकांचे उत्तरदायित्व मागणारी ही हिटलरची नवी मागणी म्हणजे शेजारच्या राष्ट्रांच्या अंतर्गत राज्यकारभारात ढवळाढवळ होती ! उद्या पाकिस्तानात आयुबखानाने भारतातील मुसलमानांसाठी असली भाषा तोंडातून काढली तर भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने त्याचा वेळीच बंदोबस्त करणे आपल्याला भाग पडेल, अशा तऱ्हेची ढवळाढवळ आम्ही सहन करणार नाही असे भारताचे दिवंगत पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी लोकसभेत मागे एकदा स्पष्टही केले आहे. परंतु हिटलरने जेव्हा हे स्वयंनिर्णयाचे भूत उभे केले तेव्हा इंग्लंडचे पंतप्रधान नेव्हिल चेंबर्लेन

यानी त्यातला धोका ओळखला नाही असेच म्हटले पाहिजे. हे भाषण करून हिटलरने एक गोष्ट जाहीर करून टाकली की ऑस्ट्रियातील सत्तर लाख जर्मन आणि झेकोस्लोव्हाकियातील तीस लाख सुटेडन जर्मन याचे भवितव्य हा त्याच्या सरकारचा प्रश्न आहे !

### आता हद्द झाली !

डॉ. शूशेनिग आता अखेरची तडफड करू लागला होता. २४ फेब्रुवारीला व्हिएन्नाला आपल्या पार्लमेंटपुढे भाषण करताना डॉ. शूशेनिगने हिटलरला उत्तर दिले—

"Austria has gone to the very limit of concessions, when we must call a halt and say; thus far and no further. Red, White, Red, until we are dead."

[ऑस्ट्रियाने तडजोडीसाठी आता जास्तीत जास्त दान जर्मनीला केले आहे. आता हद्द झाली. आता आम्ही असे म्हणू की, बस्स्, आता अधिक नाही ! जे दिले आहे ती हद्द समजा, आणखी मागू नका. जोपर्यंत आम्ही जिवंत आहोत तोपर्यंत ऑस्ट्रियात आमचाच तिरंगा फडकत राहील. लाल, पाढरा, लाल !! ]

हे भाषण झाले व डॉ. शूशेनिग बर्लिनची प्रतिक्रिया काय होते याची वाट पाहात होता. या भाषणावर पॅपेनने मखलाशी केली होती. "डॉ. शूशेनिगचे हे भाषण फारसे मनावर घेऊ नका. त्याचे आसन स्थिर राहावयाचे असेल तर त्याला असे काही तरी बोलत राहिले पाहिजे. देशातील राष्ट्रवादी गट अन्यथा त्याला अधिकापदावर राहू देणार नाही. काळजी करू नये. सेयस इनक्वार्ट आपले काम ठरल्याप्रमाणे नेटाने करीत आहे."

सेयस् इनक्वार्टने हिटलरचे दि. २० फेब्रुवारीचे भाषण रेडिओवर ऑस्ट्रियात सर्वत्र प्रक्षेपित केले. याचा परिणाम म्हणून ऑस्ट्रियाचे जर्मनीशी एकीकरण व्हावे यासाठी नाझींनी आणि त्यांच्या सहानुभूतीच्या लोकानी मोठ्या प्रमाणावर निदर्शने सुरू केली. वीस हजार लोकाच्या जमावाने "ग्राझ" या शहरात ऑस्ट्रियाचा राष्ट्रध्वज काढून त्या ठिकाणी जर्मनीचा स्वस्तिक चिन्हांकित ध्वज उभा केला. सेयस् इनक्वार्ट हाच पोलिस अधिकारी असल्यामुळे त्याने या निदर्शनाविरुद्ध हातच उचलला नाही.

जर्मनीशी एकीकरण व्हावे यासाठी प्रचड निदर्शने होतात आणि पोलिस पाहत राहतात याचा परिणाम असा झाला की शूशेनिग सरकारवरचा लोकाचा विश्वास कोलमडला. लोकानी ऑस्ट्रियन बँकांतून पैसे काढायला सुरवात केली. परदेशीय प्रवाशांचा लोंढा अचानक रोडावू लागला. जर्मन सैन्य केव्हा आत घुसेल याची उघड चर्चा सर्वत्र सुरू झाली.

### शूशेनिगची पश्चातबुद्धी

तसे म्हटले तर डॉ. शूशेनिगचे सरकार हे काही फारसे लोकशाही-प्रधान नव्हते. डोलफसच्या खुनापूर्वीच डोलफसने देशातील समाजवादी विचारसरणीच्या सोशल डेमोक्रेट्स् पक्षाचे कवरडे ढिले केले होते. ४५ टक्के मतदार ज्या थरातून होते त्या कामगार वर्गाच्या संघटनाना जरी गेल्या चार वर्षांत डॉ. शूशेनिगने जवळ केले असले तरी त्या वेळी त्यांनी डॉ. शूशेनिगला एकटे पडू दिले नसते. हा एवढा धोरणी विचार डॉ. शूशेनिगने केला नाही व आता उशीर झाला होता. बऱ्याच कामगार पुढाऱ्याची सुटका नाझींबरोबरच त्याने केली, ती ही झालेली चूक सुधारण्यासाठी. या पुढाऱ्यानी एकत्र येऊन असे ठरवले की झाले गेले विसरून या वेळी डॉ. शूशेनिग सरकारच्या मागे सर्व समाजवादी शक्ती उभ्या करावयाच्या. या दृष्टीने ४ मार्चला त्यानी शूशेनिगकडे शिष्टमडळ नेले व आपल्या सघटनावरची बंदी उठवावी अशी विनंती करून, राजकीय प्रचारस्वातंत्र्य मिळावे अशी मागणी केली. डॉ. शूशेनिगने या मागण्या तावडतोब मान्य केल्या. अर्थात ही त्याची पश्चात् बुद्धीच ठरली.

३ मार्चला बर्चेसगार्डन कराराप्रमाणे १०० नाझी लष्करी अधिकारी ऑस्ट्रियन सैन्यात स्नेहभाव वाढण्याठी दाखल झाले होते. हिटलरने स्वत: या सर्वांची गाठ घेऊन त्याना निरोप दिला होता.

आता डॉ. शूशेनिगला पुढे काय वाढून ठेवले आहे याची योग्य कल्पना आली. त्याने म्हणूनच ठरवले की ऑस्ट्रिया स्वतंत्र राहावा हे देशात बहुसख्य जनतेचे मत आहे हे जगजाहीर करण्यासाठी या प्रश्नावर सार्वमत घ्यावे व ते तातडीने घ्यावे म्हणजे हिटलरला परस्पर उत्तर मिळेल.

काही करण्यापूर्वी सर्व गोष्टी ऑस्ट्रियाचा कागदोपत्री रक्षणकर्ता बेनिटो मुसोलिनी याच्या कानी घालाव्यात या हेतूने डॉ. शूशेनिगचा दूत ७ मार्चला मुसोलिनीला भेटण्यासाठी रवाना झाला. हा दूत म्हणजे डॉ. शूशेनिगचा लष्करी सल्लागार होता. त्याने जाऊन मुसोलिनीच्या कानावर ही गोष्ट घातली, की ऑस्ट्रियात आम्ही सार्वमत घेत आहोत.

मुसोलिनीने उत्तर दिले,

"ही गोष्ट करणे चूक आहे. ऑस्ट्रिया–जर्मनीचे संबध सुधारत असताना ऑस्ट्रियाने अशी गोष्ट करू नये."

हिटलरच्या सेना ऑस्ट्रियात घुसतील या भयाने वर्षभरापूर्वी ब्रेनर खिंडीपाशी इटालियन फौजा जमा करणारा हा ऑस्ट्रियाचा सरक्षणकर्ता असा यावेळी एकदम का उलटावा हे शूशेनिगच्या दूताला कळेना. राजकारणातले सगळे व्यवहार हे असेच, फक्त स्वत:च्या देशाच्या हित-अहिताकडे नजर ठेवून राष्ट्रनेते करीत असतात. अॅबिसिनियाचा लचका हिटलरने मुसोलिनीला काय सुखासुखी तोडू दिला होता ? त्याने जणू त्याला सागितले होते,

"तुझे साम्राज्य आफ्रिकेत वाढव; युरोप हे माझे कुराण आहे." मृदंगाला मुखलेप झाला होता. आणि हिटलरला हवा तसा ध्वनी आता मुसोलिनी काढीत होता.

डॉ. शूशेनिगने ओळखले, 'कठिण समय येता कोण कामास येतो ?' आता जे काय करायचे ते स्वत:च्या हिंमतीवर केले पाहिजे. मुसोलिनीची विरोधी प्रतिक्रिया कळताच ९ मार्चला डॉ. शूशेनिगने इन्सब्रुक ( Innsbruck ) येथे जाहीर केले–

"रविवार दि. १३ मार्चला ऑस्ट्रियात सार्वमत घेतले जाईल."

डॉ. शूशेनिगने १३ मार्चला सार्वमत जाहीर केले ही गोष्ट टाकोटाक बर्लिनला पोचली आणि हिटलरच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

१० मार्चला बर्लिन येथील राईश् कचेरीत एकच धावपळ उडाली. ऑस्ट्रियाचा १३ मार्चच्या सार्वमतापूर्वी कबजा करण्याचा निर्णय हिटलरने घेतला होता व या दृष्टीने शनिवारी १२ मार्चला सैन्याने तयारीत राहण्याच्या सूचना त्याने कार्यालयाला दिल्या.

कायटेल धावत O. K. W. च्या हेडक्वार्टर्समध्ये आला. O. K. W. म्हणजे सर्वोच्च सैन्यसघटना व याची स्थापना हिटलरने केल्याचे पूर्वी सागितले आहेच. जनरल बेक्, जोडल, मॅनस्टीन याची धादल उडाली. जर ऑस्ट्रियात राजपद आणण्याचा प्रयत्न झाला तरच ऑस्ट्रियात सैन्ये घुसवावयाची, अशा गुप्त सूचना असल्यामुळे या दृष्टीने तूर्त काहीच तयारी नव्हती.

## रातोरात सुटलेले हुकूम

जनरल मॅन्स्टीनने सतत पाच तास खपून १० मार्चला सायंकाळी ६ वाजता सैन्याच्या हालचालीचा आराखडा जोडलपुढे ठेवला. सेनादलाला व विमानदलाला तयारीत राहाण्याचे हुकूम रातोरात सुटले. या वेळी हिटलरने काढलेले आज्ञापत्रक नमुना म्हणून मुळातून वाचण्यासारखे आहे.

*Top Secret*

(1) If other measures fail I intend to invade Austria.

(2) The whole operation will be dictated by me.

(3) The forces of Army and Air force must be ready for invasion on March 12, 1938 at the latest by 12 : 00 hrs.

(4) The behaviour of the troops must give impression that we do not want to wage war against our Austrian brothers; therefore any provocation is to be avoided If however resistance is offered it must be broken ruthlessly.

—Hitler

[ अत्यंत गुप्त ]

(१) जर इतर उपाय थकले तर ऑस्ट्रियावर स्वारी करण्याचे मी ठरवले आहे.

(२) ही सर्व कारवाई माझ्या आधिपत्याखाली होईल.

(३) जे सेनादल व वायुदल विभाग यासाठी निवडलेले आहेत त्यानी १२ मार्च १९३८ रोजी रात्री १२ पर्यंत तयारीने असले पाहिजे.

(४) सैन्याने आपली वागणूक अशी ठेवावी की ज्यायोगे आमची ऑस्ट्रियन बांधवाशी युद्ध करण्याची इच्छा नाही हे स्पष्ट होईल. याकरता कितीही चिथावणी मिळाली तरी सैन्याने माथी शांत ठेवावीत. परतु जर प्रतिकार झालाच तर मात्र दयामाया न ठेवता त्याचा मोड करावा.

— हिटलर

१० मार्चला हिटलरने मुसोलिनीला एक प्रदीर्घ पत्र लिहून आपली भूमिका माडली. त्याने ही गोष्ट स्पष्ट केली, की ऑस्ट्रियावरील जर्मनीच्या कबजामुळे इटालीला धोका नाही. शेवटी हिटलर लिहितो :

" Whatever the consequences of the coming events be, I have drawn a definite boundary between Germany and France and now draw one just as definite between Italy and us. It is the Brenner ! "

(पुढील होऊ घातलेल्या घटनांचे काहीही परिणाम घडोत, मी स्वत: आतापर्यंत फ्रान्स व जर्मनी यांच्या सरहद्दीची रेषा मनात पक्की केलेली आहेच. आता इटाली व आमच्यामधील सरहद्दीही मी निश्चित करतो. ब्रेनर खिंड हीच आमची व तुमची सरहद्द राहील.)

या शेवटच्या ओळीचा मथितार्थ फक्त मुसोलिनीलाच कळला असेल. याचा अर्थ असा होता, की ब्रेनरच्या दक्षिणेकडील ऑस्ट्रियाचा टिरोल ( Tyrol ) हा प्रात व्हर्सायच्या तहात इटालीला देऊन टाकण्यात आला होता. तो प्रात आम्ही इटालीकडून परत मागणार नाही अशी हमी अप्रत्यक्षपणे हिटलरने या पत्रात दिली होती. मागे मुसोलिनीने ब्रेनरपाशी सैन्य उभे केले ते याच प्राताच्या सरक्षणासाठी हे हिटलरने ओळखले होते.

## ११ मार्च : आणीबाणीची खलबते

१० मार्चला रात्री डॉ. शूशेनिगला शात झोप लागली. तीन दिवसानी होणाऱ्या सार्वमतात स्वतत्र ऑस्ट्रियाला भरघोस पाठिबा मिळणार याबद्दल त्याला संशय नव्हता; व असे झाले तर परस्पर जर्मनीच्या कचाटचातून आपण सुटू असे तो समजत होता.

रात्र सपली. पहाटे पहाटे डॉ. शूशेनिग जागा झाला तो फोनच्या घणघणाटानेच. त्याने मनगटावरच्या घडचाळात पाहिले, साडेपाच झालेले होते. त्याने फोन उचलला. डॉ. स्कूबल ( Skuble ) हा पोलिस प्रमुख फोनवर सागत होता,

" जर्मनानी साल्झबर्ग येथे सरहद्द बद केली आहे. सर्व गाडचा रद्द करण्यात आल्या असून जर्मन सेना ऑस्ट्रियन सरहद्दीजवळ जमा झाल्या आहेत असे कळते. "

डॉ. शूशेनिगने फोन टाकला व उठून कपडे केले. पहाटेच्या प्रकाशात त्याने आपला निवास सोडला व तो कचेरीकडे निघाला. वाटेत सेट स्टीफन् कॅथेड्रल लागले. चर्चमध्ये पहाटेची प्रार्थना सुरू झाली होती. तो आत शिरला व तिथल्या भक्तगणात सामील झाला. समोर मेणबत्त्या जळत होत्या आणि मेरीची मूर्ती समोर होती. इतराप्रमाणे त्याने सामुदायिक पठणात भाग घेतला व उजवा हात दोन्ही दडांना व कपाळाला लावला. मेरीवर हवाला ठेवून त्याने चर्चचे आवार सोडले.

शूशेनिग कचेरीत पोचला तेव्हा कचेरी उघडलेली नव्हती. त्याने भराभर टेलिफोन केले व मत्रिमंडळाच्या सभासदाना ताबडतोब कचेरीत येण्यास सागितले. पोलिसदलाला त्याने चॅन्सेलरीभोवती व व्हिएन्नाभोवती पोलिस-सरक्षण उभे करण्यास सागितले.

पोलिसाच्या गाडचा व्हिएन्ना शहरात धूमधडाक्याने पळू लागल्या. व्हिएन्ना शहर जागे होतच होते, तो रस्तोरस्ती पोलिसाचे दर्शन होऊ लागले.

मत्रिमडळाच्या सर्व सभासदाचा पत्ता लागला. परतु सेयस् इनक्वार्ट कुठे होता ? तो घरी नव्हता. आदल्या दिवशी रात्री बर्लिनहून तातडीने निरोप आला, म्हणून पॅपेन सकाळी ६ वाजता खास विमानाने रवाना होणार होता. त्याला निरोप द्यायला सेयस् गेला होता. मत्रिमडळाचा आणखी एक सभासद ग्लाईस (Glais) हा सेयसचाच हस्तक होता व तो बर्लिनला आदल्या दिवशीच गेला होता.

ग्लाइस परत आला व त्याने सागितले, " सार्वमत रद्द केल्याशिवाय अन्य मार्ग नाही. हिटलर चिसाळलेला आहे. " ही दुक्कल लगेच चॅन्सेलरीत डॉ. शूशेनिगला भेटायला गेली. यावेळी सकाळचे

दहा वाजले होते.

डॉ. शूशेनिगने डॉ. स्कूबल या पोलिसप्रमुखाचा सल्ला विचारला. डॉ. स्कूबलने सांगितले,

" पोलिसदलात बरेच नाझी आहेत. बर्चेसगार्डन कराराप्रमाणे जे तुरुंगात होते ते सर्व पोलिस पुन. आपापल्या जागांवर घेतले गेले आहेत. पोलिस आपल्याशी शंभर टक्के इमान ठेवतील असे आश्वासन मी देऊ शकत नाही. "

शूशेनिगचे कबरडेच मोडले. त्याने अध्यक्ष मिकलासची गाठ घेतली. चार पाच तास दोघे खलबत करीत होते. अखेर दुपारी दोन वाजता शूशेनिगने सेयस इनक्वार्टला कळवले,

" सार्वमत मागे घेण्यात येत आहे. "

शूशेनिगने ओळखले की आता सेयस इनक्वार्ट हाच हिटलरचा आपल्याजवळचा प्रवक्ता समजायला हवा. सेयस इनक्वार्टने लगेच बर्लिनला फोन केला. २ वाजून ४५ मिनिटांनी गोअरिंगचे सेयस इनक्वार्टशी फोनवरून बोलणे सुरू झाले.

गोअरिंगने कळवले,

" केवळ सार्वमत रद्द करून आता भागणार नाही. मी फ्यूररशी बोलून पुन: फोन करतो. "

गोअरिंगने ३ वाजून ५ मिनिटांनी सेयसला फोन केला · " फ्यूररचे म्हणणे आहे, डॉ. शूशेनिगने राजीनामा दिला पाहिजे व त्याच्या जागी तुला दोन तासात चॅन्सेलर म्हणून नेमले गेले पाहिजे. "

एवढे सागून गोअरिंगने एक कुतूहलजनक वाक्य उच्चारले, "आणि हे पहा ! ठरल्याप्रमाणे बर्लिनला तार यायला हवी. "

ही तार कसली ? ही तार कुणाला करावयाची होती ? हे सर्व कुणी ठरवले होते ?

वुइल्यम केपलर (Keppler) हा हिटलरचा खास दूत दुपारीच बर्लिनहून व्हिएन्नाला आला होता. सेयसने जी तार फ्यूररला करावयाची त्याचा तर्जुमा त्याने सेयसला सांगितला होता. तार अशी करावयाची होती :

" ऑस्ट्रियात कायद्याचे राज्य उरलेले नाही. ताबडतोब सैन्य पाठवा ! "

म्हणजे मंत्रिमंडळात घुसवलेल्या क्विसलिंगने अशी तार करताच सैन्य ऑस्ट्रियात घुसवायचे हे हिटलरने आधीपासून ठरवले होते यात शंका नाही. आतापर्यंत सांगितलेले टेलिफोन संभाषण हे काही कपोलकल्पित नाही. गोअरिंगनेच या सर्व संभाषणांच्या टेप्स् जतन केलेल्या आढळल्या व जर्मनीच्या पराभवानंतर या सर्व टेप रेकॉर्डस् दोस्तांच्या हाती पडल्या !

डॉ. शूशेनिगने हिटलरला काय हवे आहे ते अध्यक्ष मिकलासला कळवले व आपला राजीनामा सादर केला. मिकलासने शूशेनिगचा राजीनामा स्वीकारला. कारण शूशेनिग पुरता मोडला होता. मिकलास फक्त वाकला होता. अजून मोडलेला नव्हता. त्याने फ्यूररची दुसरी सूचना फेटाळली.

" सेयस इनक्वार्टला चॅन्सेलरपद ? अशक्य. ते शक्य नाही. "

मिकलासचे हे उत्तर सायकाळी ५–३० वाजता फोनवर गोअरिंगला कळवण्यात जाले. सेयसने स्वत:च हा फोन केला.

गोअरिंगने कळवले की ७–३० पर्यंत सेयसला चॅन्सेलर म्हणून घोषित केले नाही तर फौजा आत घुसतील. गोअरिंग बराच अस्वस्थ होता. पुढे जगाच्या डोळ्यात धूळ फेकायची तर अखेरच्या क्षणी सेयस चॅन्सेलर झाला व त्याने जर्मन सैन्याला बोलावले असेच घडणे आवश्यक होते. मिकलास तर इरेला पेटला होता.

या दिवशी शिरर व्हिएन्नात होता. त्याची बायको बाळतीण होती व हे बाळतपण सिझरीन शस्त्रक्रिया करावी लागल्यामुळे त्रासाचे झाले होते. शिरर हॉस्पिटलमधून घरी परतत होता. तो लिहितो,

" मी परतत असताना रस्त्यावर नाझींनी कबजा केलेला मला आढळला. मी एका बस-वेमधून बाहेर पडतो तो नाझी जमाव मोठमोठ्याने घोषणा करताना दिसला. घोषणा होत्या,

" हिटलरचा विजय असो ! शूशेनिगला फाशी द्या. "

Heil Hitler ! Hang Schuschnigg !

**परमेश्वर ऑस्ट्रियाचे रक्षण करो !**

मी घरी आलो. रेडिओवर डॉ. शूशेनिगचे निरोपाचे भाषण सुरू होते. शूशेनिगने केलेले हे अखेरचे भाषण हृदय हेलावणारे होते. शूशेनिग म्हणाला,

" जर्मन सरकारने आज आपल्या अध्यक्षाना निर्वाणीचा खलिता धाडला व जर्मन सरकार सांगेल त्या व्यक्तीला चॅन्सेलर नेमा असा आग्रह धरला आहे. असे न होईल तर जर्मन फौजा आत घुसतील अशी धमकीही देण्यात आली आहे. मी सर्व जगाला हे गर्जून सागतो, की ऑस्ट्रियात बडाळी माजली आहे या अर्थाच्या ज्या बातम्या जर्मनीत प्रसृत झाल्या आहेत त्या सर्वस्वी खोट्या आहेत. अथपासून इतीपर्यंत हे सर्व वृत्त खोटे आहे. अध्यक्ष मिकलास यानी मला ऑस्ट्रियन जनतेला हे सागण्यास सागितले आहे की, या अत्यंत कठीण प्रसंगीही रक्त साडण्याची आमची इच्छा नसल्यामुळे सत्तेपुढे आम्ही शरणागती पत्करीत आहोत ! आम्ही सैन्याला प्रतिकार करू नका असा आदेश दिला आहे.

माझ्या देशबांधवानो, मी तुमचा निरोप घेत आहे. अन्त:करणापासून माझी एकच प्रार्थना आहे, परमेश्वर ऑस्ट्रियाचे रक्षण करो ! "

शूशेनिगने जनतेचा निरोप घेतला व आपल्या अगतिकपणाचा पाढा वाचून तो मोकळा झाला. मिकलास मात्र अध्यक्षपदावरून दूर होण्याची तयारी दर्शवेना. मिकलास अध्यक्षपद सोडत नव्हता आणि सेयस इनक्वार्टला चॅन्सेलर म्हणून नेमीत नव्हता. यातील एक गोष्ट तरी घडल्याशिवाय जर्मन फौजा आत बोलावण्याची तार कोण करणार ? आठचा सुमार होऊन गेला होता. पुढची पचेचाळीस मिनिटे गोअरिंग तारेची वाट पाहत होता. इकडे सेयसची मिकलासला उडवण्याची छाती होत नव्हती.

अखेर गोअरिंगची सारी सहनशीलता संपली. त्याने केपलरला बोलावून सागितले,

" सर्व तार करण्याची जरूर नाही. फक्त 'आमची मान्यता आहे' एवढीच तार करा. "

केपलरने सेयसला विचारले, " काय करायचे ? "

पुन: तास उलटला. केपलरचा अखेर फोन आला–

" सेयसची संमती आहे. "

परंतु 'सैन्य पाठवा' या गोष्टीला संमती देण्याचा अधिकार सेय-

सला नव्हता ! तो अधिकार मिकलासकडे होता.

जो तार पाठवलीच गेली नाही तिचा मसुदा दुसऱ्या दिवशी जर्मन वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला. ती तार अशी—

" The provisonal Austrian Government considers it its task to establish peace and order in Austria, Sends to the German Government request to support it in its task and help to prevent bloodshed. For this purpose it asks the German Government to send German troops as soon as possible. "

[ ऑस्ट्रियाचे तात्पुरते सरकार ऑस्ट्रियात शांतता व कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे हे आपले कर्तव्य समजते. म्हणून हे सरकार जर्मन सरकारला अशी विनंती करीत आहे, की हे काम करण्यासाठी व रक्तपात टळावा यासाठी जर्मन सरकारने ऑस्ट्रियात फौजा शक्य तितक्या लवकर धाडाव्यात. ]

सेयसची संमती फोनवर कळली तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. हिटलर वाट पाहत होता ती केवळ मिकलास कधी मोडतो याचीच नव्हे, तर रोमहून काय फोन येतो याचीही त्याला काळजी होती.

रात्री १०–२५ ला रोमहून हिटलरला फोन आला :

" मुसोलिनीने ऑस्ट्रियाचा जर्मनीने केलेला कबजा मान्य केला आहे. " हिटलरचा आनंद उरात मावेना. त्याने फोनवर निरोप्या अिटालियन वकिलाला सांगितले,

" I shall never forget the Duce for this, no matter what happens ! I shall stick to him whatever may happen; ever if the whole world gangs up on him. "

[ ड्यूसला सांगा, मी त्याला कधीही विसरणार नाही. कसलाही प्रसंग येवो मी त्याची साथ करीन. उद्या सारे जग ड्यूसवर उठले तरी मी त्याची साथ सोडणार नाही. ]

इकडे व्हिएन्नात दोन तास मिकलास विचार करीत होता. सर्व बाजूंनी अंधार अंधार झाला होता. शूशेनिग सोडून गेला होता. इटालीने झोपेचे सोंग घेतले होते. इंग्लंड, फ्रान्स काही करतील अशी आशा नव्हती. ज्या वृत्तीने पराभव झाल्यावर सेनानी शरणागती देतो त्या वृत्तीने मिकलासने रात्री १२ वाजून ४५ मिनिटांनी सेयसला चॅन्सेलर नेमले !

म्हणजे सेयस चॅन्सेलर झाला तो मध्यरात्र उलटून गेल्यावर व त्याने जर्मन सैन्य पाठवायला संमती दिली होती ती त्यापूर्वी तीन तास !

१२ मार्च १९३८ उजाडला. शनिवार होता. मध्यरात्रीच सेयस इन्क्वार्ट चॅन्सेलर झाला होता व त्याच क्षणाला जर्मन फौजांनी सरहद्द ओलांडली होती. चॅन्सेलर नसताना जे निमंत्रण सेयसने या फौजांना दिले त्याला आता मोठाच आधार झाला होता.

लोण्याच्या गोळ्यातून सुरी पुढे जावी, तशा जर्मन फौजा पुढे पुढे येत गेल्या. प्रतिकार नव्हता. ऑस्ट्रियन सैन्य झपाटल्यासारखे आपापल्या बराकीतच होते. हळूहळू उजाडले. सर्वत्र रेडिओवरून गोबेल्सने जाहिरात फडकावली.

" हिटलर उद्या दुपारी व्हिएन्नात पोचेल. "

**ज्या रस्त्यावर एक भणंग म्हणून हिटलर एकेकाळी भटकत होता त्याच व्हिएन्नातील रस्त्यावरील त्याचे जयोन्मत्त पदक्षेप...**



## स्वप्नपूर्तीची बेहोषी

फ्यूररच्या येण्याचा मार्ग जाहीर झाल्याबरोबर खेड्यापाड्यातून घाईघाईन स्वागताच्या कमानी उभ्या झाल्या ! ज्यांना सामीलीकरण हवे होते ते गावाचे पुढारी ठरले. ज्यांना नको होते ते मूग गिळून बसले आणि अधांतरी लोंबकळणारी सामान्य जनता उत्साहाने नव्या कल्लोळात सामील झाली—" हाइल हिटलर ! हाइल हिटलर ! ! "

ऑस्ट्रिया ही हिटलरची जन्मभूमी ! व्हिएन्नात तो वाढला. एक भणंग म्हणून ! आज तो व्हिएन्नात शिरणार होता तो आपले सार्वभौम जर्मनीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवून !

पहिले खेडे लागले लिंझ् ! ( Linz ) इथेच तो शाळेत गेला होता. शाळेला त्याने इथेच रामराम ठोकला होता. लिंझला हिटलर एक दिवस थांबला. तेथून जवळच लिओंडिंग (Leonding) या गावी त्याच्या आईवडिलांची स्मारके होती. जाहीर सभेत बोलण्यापूर्वी तो आईवडिलांच्या स्मारकांवर पुष्पचक्र वाहून आला. सायंकाळी लिंझ येथे जाहीर सभेत त्याने भाषण केले,

" When years ago I went forth from this town. I bore in me precisely the same profession of faith which today fills my heart. Judge the depth of my emotions when after so many years I have been able to bring that profession of faith to its fulfilment. I have believed in my mission of restoring my dear homeland to the German Reich. I have lived and fought for it and I believe I have now fulfilled it. "

[ काही वर्षांपूर्वी जेव्हा मी या शहरातून गेलो तेव्हा माझ्या मनात जे जीवितकार्य मी मानीत होतो तेच आजही माझ्या मनात भरून राहिलेले आहे. मी आज कोणत्या मनःस्थितीत आहे याचा तर्क

तुम्हाला सहज करता येईल. इतक्या वर्षानंतर आज मी माझ्या जीवनकार्याचे साफल्य अनुभवीत आहे. जे जीविताचे काम म्हणून पत्करले ते पुरे केल्याच्या आनंदाचा हा दिवस आहे: माझ्या मातृभूमीचे मीलन जर्मन राईशशी घडवणे हे मी माझे जीवितकार्य मानले होते. मी हे करीन असा माझा विश्वास होता. मी त्यासाठी जगलो आणि झगडलो. मला वाटते की मी आज त्यात यशस्वी झालो आहे. ]

ठरल्याप्रमाणे व जाहीर झाल्याप्रमाणे हिटलर व्हिएन्नात दि. १३ मार्चला आला नाही. कारण पुढे गेलेल्या हिमलरने निरोप पाठवला, की फ्यूररच्या सरक्षणाची व्यवस्था पुरी होण्यास थोडा अवधी हवा आहे. याशिवाय ज्या पॅन्झर् तुकड्या एव्हाना व्हिएन्नात पोचायला हव्या होत्या त्यांना वाटेत खोळंबा झाला होता.

१३ मार्चला लिंझ येथेच हिटलरने ऑस्ट्रियाचा जर्मनीशी सामिलनामा पक्का केला. ऑस्ट्रिया यापुढे जर्मनीचा प्रांत झाला. यावर सेयस इनक्वार्ट याची ऑस्ट्रियन चॅन्सेलर म्हणून व जर्मनीच्या वतीने हिटलर, गोअरिंग, रिबेन्ट्रॉप, फिक आणि हेस या पाच जणांनी सह्या केल्या. १० एप्रिलला या सामिलीकरणावर सार्वमत घेण्याचे हिटलरने जाहीर केले.

## सार्वमताचे शिक्कामोर्तब

जे सार्वमत जर्मनीने ऑस्ट्रियाचा कबजा करण्यापूर्वी झाले असते तर स्वतंत्र ऑस्ट्रियाला पाठिंबा मिळेल असे शुशेनिग म्हणत होता, तेच सार्वमत इतक्या आत्मविश्वासाने हिटलर जाहीर करत होता, ते दोन सिद्धांतावर–

(१) देशातील बहुसंख्य जनता ही ठाम मताची नसते. जिकडे सरशी तिकडे वीरश्री आहे असे ती मानते.

(२) विरोधी शक्तीना चिरडण्यासाठी बलाचा वापर हा शंभर टक्के यश देतो.

पुढच्या चार आठवड्यांत म्हणजे १० एप्रिल उजाडण्यापूर्वी हिमलरने ऑस्ट्रियात विरोधी शक्तीचा काटा बळाच्या जोरावर ढिला केला. पन्नास हजाराहून अधिक लोकांची धरपकड करून त्याना तुरुंगात डांबण्यात आले.

१४ मार्च १९३८ ला दुपारी हिटलरने व्हिएन्नात प्रवेश केला. सर्व व्हिएन्ना शहर त्याच्या स्वागताला लोटले होते असे म्हणण्यास हरकत नाही. सगळे शहर जणू म्हणत होते, 'शूरा मी वंदिले !' पुढले चार आठवडे हिटलर प्रचारसभेत भाषणे करीत होता. व्हिएन्नातील अखेरच्या निवडणूक सभेत भाषण करताना ९ एप्रिलला हिटलरने सांगितले–

"I believe that it was God's will to send a youth from here into the Reich to let him grow up, to raise him to be the leader of the nation, so as to enable him to lead back his homeland into the Reich. There is a higher ordering and we are all nothing else than its agents."

[ माझा असा विश्वास आहे की परमेश्वरानेच हे सर्व ठरवले होते. येथूनच एक तरुण राईशकडे जावा. त्याने तेथे वाढावे व राईशचा नेता म्हणून त्याला निवडले जावे, अशाकरता की त्याला आपल्या मातृभूमीचे मीलन राईशबरोबर घडवता यावे. या सर्व गोष्टी परमेश्वरी इच्छेने घडतात आणि आपण केवळ त्या शक्तीच्या हातातील बाहुली ठरतो. ]

हिटलरच्या या आणि अशा अन्तःकरणाला हात घालणाऱ्या भाषणांनी १० एप्रिलला काय घडणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले होते. ९९·७५% मतदान ऑस्ट्रियाच्या सामिलीकरणाच्या बाजूने झाले !

१० एप्रिल १९३८ ला जगाच्या नकाशातून ऑस्ट्रिया हा देश पुसला गेला. ओस्टमार्क ( Ostmark ) या नावाने हा देश मोठ्या जर्मन देशाचा एक प्रांत झाला. व्हिएन्ना ही राजधानी उरली नाही. जर्मनीचे ते एक शहर झाले. सत्तर लाखाहून अधिक जर्मन लोकसंख्येचा हा देश हिटलरने जर्मनीत सामील केला. रक्ताचा एक थेंबही न सांडता ! बंदुकीचा आवाज न करता ! खऱ्या अर्थाने, सर्वस्वी खऱ्या अर्थाने ! !

१२ मार्च १९३८ ला जर्मन सैन्य ऑस्ट्रियन सरहद्द ओलांडीत होते तेव्हा इंग्लंडचे पतप्रधान काय करीत होते ?

## ११ मार्च : डाउनिंग स्ट्रीट

११ मार्चला रात्री १० डाउनिंग स्ट्रीट या आपल्या निवासात रिबेन्ट्रॉपबरोबर ते खाना घेत होते. जेवणाला सुरवात होण्यापूर्वी चेंबर्लेनसाहेबानी जर्मन परराष्ट्र मंत्र्याचे आगत-स्वागत केले. जेवण चालू असताना महत्त्वाची गुप्त बातमी आली, "जर्मन सैन्य ऑस्ट्रियन सरहद्दीकडे जात आहे." चेंबर्लेनसाहेबाचा चेहरा उतरला. जेवण उरकताच घाईघाईने ते आपल्या अभ्यासिकेत गेले. त्यानी निषेधखलिता पाठवण्याचे ठरवले. बर्लिनमधील इंग्लंडचे वकील हेंडरसन् याना पत्र लिहिले जाऊ लागले :

"जर जर्मनीने ऑस्ट्रियाला निर्वाणीचा खलिता धाडल्याची बातमी खरी असेल तर जर्मन सरकारला कळवा–

"His Majesty's Government feel bound to register a protest in the strongest terms."

[ अत्यंत कडक शब्दात आम्ही या कृत्याचा निषेध करतो. ]

या पूर्वी २० फेब्रुवारीला चेंबर्लेनसाहेबांच्या पडेल धोरणाला कंटाळून परराष्ट्र मंत्री अँथनी ईडन यानी राजीनामा दिला होता व त्याची जागा लॉर्ड हॅलिफॅक्स यानी घेतली होती. रिबेन्ट्रॉपने बर्लिनला कळवले,

"हॅलिफॅक्ससाहेब फारच अस्वस्थ दिसले व त्या मानाने चेंबर्लेनसाहेब वरून तरी थंड वाटत होते."

वस्तुस्थिती अशी होती, एक फक्त आतून थंड होता आणि दुसरा आतून बाहेरून सर्व बाजूनीच थंड होता. सरकारातच धग नव्हती !

इंग्लंडमध्ये सरकार तरी जाग्यावर होते. फ्रान्समध्ये १० मार्चला सरकारच नव्हते ! दहा मार्चला तेव्हाचे फ्रेंच पतप्रधान चॉटेम्पस् ( Chautemps ) याचे मंत्रिमंडळ गडगडले होते व नवा पतप्रधान निवडलेला नव्हता.

रशियाने गडबड सुरू केली. 'बड्यांची ( Big Powers ) परिषद बोलवा. आम्ही येऊ, तुम्ही या, काहीतरी ठरवू'. १७ मार्चला केलेल्या या रशियाच्या सूचनेला चेंबर्लेनसाहेबांनी उत्तर दिले,

"असे राष्ट्रांचे गट पाडले तर जागतिक शांतता धोक्यात येईल.

# हे विद्या'पी'ठ की विद्या-'पि'ठ ?

## पी. डी. ए. पुरस्कृत नाट्यवाचनस्पर्धा



मीनाक्षी गणपुले

एडवर्ड मार्शल हॉल या वकिलांनी एका बाईवरील खुनाच्या खटल्यात त्या बाईचे वकीलपत्र घेतले होते. त्या बाईने आपल्या जबानीत म्हटले होते--" How can I kill a child ?" सरकारी पक्षातर्फे सांगण्यात आले की बाईच्या मनात पाप होते व हाच एक विचार ती करीत होती-" मी हे मूल कसं मारू ? " हॉल उभे राहिले. त्यांनी मूळ इंग्रजी वाक्य उच्चारताना शब्दांवरील आघातांच्या जागा बदलल्या. How आणि Can या शब्दांवरील आघातात बदल होताच, अर्थ झाला... बाईला म्हणायचे होते, " मी हे मूल मारणे कधी शक्य आहे का ?" हॉलनी केस जिंकली.

नाट्यवाचनस्पर्धेत भिन्न शब्दांवर अभिप्रेत नसताना अवेळी जोर देऊन वाचकांनी अनेक वेळा नाटककार कसा मारला, याचे विवेचन करताना, पुणे नभोवाणी केंद्राचे प्रमुख श्री. दीक्षित यांनी वरील आठवण विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांना सांगितली.

श्री. दीक्षित यांनी हा चौकार मारून पाठोपाठ एक षट्कार मारला ! त्यांनी समोरचा टेबलावरील कागद उचलला. कार्यक्रमपत्रिकेत दोन चुका होत्या. ' पुणे विद्यापीठ ' ऐवजी ' पुणे विद्यापिठ ' लिहिले होते आणि मीनाक्षी गणपुले यांचे नाव ' मिनाक्षी ' गणपुले असे लिहिले होते. ज्या पी. डी. ए.-प्रागतिक नाट्यसंस्थेने ह्या नाट्यवाचनस्पर्धा जाहीर केल्या होत्या त्याचे एक चालक प्रा. मालवा केळकर हे दीक्षितांच्या या फटकाऱ्याने दचकलेच !

......कॉलेजमधली मुले आहेत, सुशिक्षित आहेत, भाषेचा अभ्यास केलेली असतील, तेव्हा साहजिकच वाचनात एक प्रकारचा डौल येईल असे प्रारंभी वाटले होते. परंतु एक एक नाटक वाचले जाऊ लागले आणि हे अंदाज खोटे ठरू लागले ! तरीही मनात निराशेची काळीकुट्ट अभ्रे जमू लागताच अवचित तऱ्हेने चमकणाऱ्या एखाद्या तेजस्वी विद्युल्लतेप्रमाणे एखादे महाविद्यालय आपली चुणूकही दाखवीत असे. पण ही चमक अगदी थोड्याच महाविद्यालयांत दिसून आली. बहुतेक वेळा विद्यार्थीवर्गाविषयी जबरदस्त निराशा पदरी पडली.

गेल्या पाच वर्षांप्रमाणे यंदाही स्पर्धक विद्यार्थ्यांमध्ये अपार उत्साह होता, हे स्पर्धेतील दहा महाविद्यालयांतील स्पर्धक गटांनी भाग घेऊन पटवून दिले. स्पर्धेत सादर केलेल्या विविध नाटकांची निवडही दर्जेदार होती. यांतील सामाजिक, ऐतिहासिक नाटकांबरोबर एका पौराणिक नाटकाचाही समावेश केला होता, ही गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे. ' अपराध मीच केला ' या नव्याकोऱ्या नाटकानेही लक्ष वेधून घेतले.

### परीक्षकांनीही टाळ्या दिल्या

नाटकांची निवड उत्तम असली तरी त्यांचा वाचनाने होणारा परिणाम मात्र फारच सामान्य वाटला. नव्हे पदोपदी निराशाच जाणवत होती. त्यातल्या त्यात इंजिनिअरिंग, फर्ग्युसन आणि पुणे विद्यापीठ यांच्या गटांचे कार्य डोळ्यात भरत होते. विशेषकरून इंजिनिअरिंगने सादर केलेल्या सरिता पदकीकृत 'बाधा' नाटकाने परिणामाचा उच्चांक गाठला. वास्तविक नाटकाचा विषय काहीसा अवघड, प्रमुख व्यक्तिरेखा जितकी नाजूक, परिणामकारक तितकी समजायला आणि व्यक्त करायला गूढ. पण तरीही त्याचे वाचन अतिशय परिणामकारक वाटले. केवळ श्रोतेच नव्हे तर परीक्षकही टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात सामील झाले होते. वास्तविक परीक्षकांनी तटस्थ राहून त्या वेळी कोणतेही मत व्यक्त करायचे नसते. पण त्यांनाही राहवले नाही. नाटकाचे यश दिसते ते यातच !

या वाचनात असे प्रभावी होते तरी काय, असे कोणी विचारील, तर गुणांची एक लांब यादीच सांगावी लागेल. तरीही दिग्दर्शनातील

---

अशी परिषद नको ! "

याच भाषणात चेंबर्लेनसाहेबांनी नवीन घोडचूक करून ठेवली. त्यांनी सांगितले,

" झेकोस्लोव्हाकियाला ब्रिटनने संरक्षणाची निराळी हमी देण्याचे कारण नाही. फ्रँको-झेक कराराप्रमाणे झेकोस्लोव्हाकियावर हल्ला झाला व फ्रेंच सैन्याने, या कराराप्रमाणे तिथे सैन्य पाठवले, तर ब्रिटन फ्रान्सच्या पाठीशी उभे राहील. "

हिटलरने हे भाषण वृत्तपत्रात वाचले. तो मनाशी हसला. म्हणजे झेकोस्लोव्हाकियाच्या मदतीला फ्रान्स आले तर इंग्लंड येणार ! तूर्त फ्रान्सला एखादा पंतप्रधान तरी पाठवा इंग्लंडमधून... ! !

१० एप्रिलला सार्वमताच्या आवरणाखाली ऑस्ट्रियाचे साग्रसंगीत श्राद्ध पार पडल्यावर, फक्त अकरा दिवसांनी म्हणजे २१ एप्रिलला, हिटलरने जनरल कायटेलला आपल्या खोलीत बोलावले व आज्ञा दिली--

" हिरवी फाईल द्या ! "

झेकोस्लोव्हाकियाची नवीन कुंडली या फायलीत होती !

[ पुढील अंकी चालू ]

कौतुकास्पद वेगळेपण, आणि मीनाक्षी गणपुले यांच्या कामातील अनुकरणीय तन्मयता याचा उल्लेख अगत्याने केलाच पाहिजे. नाटक ऐकत असताना त्याला समर्थ दिग्दर्शनाची जोड मिळाली आहे ही गोष्ट पदोपदी जाणवत होती. एका प्रवेशात नायिकेचे अनेक रंगेल मित्र तिचा निरोप घेऊन जात आहेत असा प्रसंग आहे. या प्रवेशात खरोखरच एक एक व्यक्ती जणू रंगमंचावरूनच निघून जात आहे असा भास इतक्या सफाईने निर्माण केला होता की श्रोते थक्क झाले! याचप्रमाणे दिग्दर्शनातील कितीतरी बारकावे या नाटकात दिसून आले. मीनाक्षी गणपुले हिने केलेली ताराची भूमिका इतकी तन्मयतेने आणि सहजतेने केली की तिचे कौतुक करावे तितके थोडेच! त्या भूमिकेचा परिणाम दीर्घकाळ श्रोत्याच्या मनावर राहिला. तीन अंकातील ताराच्या स्वभावातील फरक दाखवताना तिने त्या भूमिकेतील समज आणि अभ्यास यांचा प्रत्यय आणून दिला. याच महाविद्यालयातील दिलीप सूर्यवंशी यानेही अकृत्रिम सहजतेचा नमुना सादर केला. जणू काही हे नाटक प्रत्यक्ष पाहत आहोत असा भास होत होता. भाषणातील दृश्ये, त्यावर देण्यात येणारा जोर, आदि गोष्टीही परिणामकारक होत्या.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या 'श्रीमंत' मध्ये मालिनीबाई आणि रत्ना या परस्परविरोधी भूमिका सादर करून नीला कुलकर्णी यानी बरीच प्रशंसा घेतली. दोन भिन्न भूमिका सादर करताना लागणारा आवाजातील बदल आणि पद्धती याबाबतीत त्यांनी केलेली कामगिरी इतर कोणालाही न जमणारी होती.

पुणे विद्यापीठाने 'कौंतेय' नाटक वाचले छान! पण साधिक परिणामाच्या दृष्टीने ते उणे पडले. कर्णाचे काम करणारे विजय देव याचे वाचन स्मरणीय होते.

अन्य महाविद्यालयीन वाचनाबद्दल फारसे काही अगत्याने सांगावे असे आढळले नाही. कित्येकाना तर 'नाट्यवाचन' म्हणजे काय, हेसुद्धा समजत नव्हते.

**संगीताहूनही कठिण**

नाट्यवाचन म्हणजे काय हे स्पर्धेतील एक परीक्षक श्री. शांताराम आठवले यांनी आपल्या भाषणातून चांगल्या तऱ्हेने प्रत्ययास आणून दिले. ते म्हणाले—"नाट्यवाचन हा प्रकार आता चांगला रुजला आहे. हा प्रकार दिसायला साधा व सोपा वाटतो. पण खरोखरी पाहता तो तसा नाही. नुसत्या शब्दाच्या साहाय्याने नाटक डोळ्यापुढे उभे करणे ही सामान्य गोष्ट नाही. रंगमंच, रंगरंगोटी, नेपथ्य इत्यादी कसलीही साधने नाहीत. केवळ शब्द! पण शब्दाचे सामर्थ्य अपार आहे. वाचनाच्या द्वारे नाट्य निर्माण करायचे असेल तर शब्दावर प्रभुत्व आणि वाणीची देणगी हवी. शब्दाला देखील रूप असते, रंग असतो. त्याना स्वतःचा ढंग असतो, नाद असतो, लय असते,, इतकेच नव्हे तर त्यांना रस आणि भावही असतो. विषाचे लोळ किंवा अमृताचे कल्लोळ निर्माण करण्याचे अपार सामर्थ्य शब्दात आहे. म्हणूनच नाट्यवाचन ही शब्दब्रह्माची साधना आहे. संगीतातील प्रावीण्यापेक्षा गद्यावरील प्रभुत्व, ही कठीण कला आहे. संगीताप्रमाणेच गद्यालाही सूर असतो, ताल असतो, लय असते. नाद असतो, गती असते. ताना, मुरक्या, खटके, मींड ही केवळ गाण्यातच असतात असे नाही तर गद्यातही असतात. संगीतात वाद्यांची साथ असते तर गद्यात शब्दाचे वजन, आवाजाचे चढउतार, शब्दांची फेक इत्यादी सौंदर्य असते. पण खेदाची गोष्ट अशी की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शब्दांचे सामर्थ्य, भाषेचा डौल, वाणीची स्वच्छता इत्यादींचे महत्त्वच कळले नाही. याचबरोबर नाटकातील व्यक्ती, त्याचा कथेशी असलेला संबंध आणि त्या संदर्भातील तिचे महत्त्व या गोष्टी काय आहेत हे बहुतेक विद्यार्थ्यांना कळले नाही."

**क्रूष्ण, आस्त्रीत, हत्यार**

विद्यार्थ्यांना 'फ' आणि 'फ़' या दोन शब्दांतील फरक माहीत नव्हता असे वाटते. 'मी फिरायला जातो', 'तू, मला फार आवडतेस' किंवा 'फक्त एकदाच माझ्याकडे पहा' या वाक्यातील उच्चार अत्यंत दयनीय होता. कारण 'फर्ज, फर्क, फेअर' सारख्या हिंदी-इंग्रजी उच्चाराप्रमाणे फ चा उच्चार मराठीत नाही, ही गोष्ट कोणालाही उमगलेली नाही. 'श्रीमंत' किंवा 'आश्रित' या शब्दात 'श्री' चा उच्चार स्त्री असा केला जात होता! त्याचप्रमाणे कृत चा उच्चार क्रित, कृपाचा

[पृष्ठ ३८ वर चालू]

क्रीडा

## शहाणा वृत्तलेखक

क्रिकेट खेळ मोठया गमतीचा असतो. जेव्हा संघ जाहीर होतो तेव्हा कप्तान व यष्टिरक्षक ह्या दोघाची कामगिरी काय हे जाहीर केलेले असते. उरलेले नऊ जण फलंदाजी किंवा गोलंदाजी करतात. असे असले तरी केवळ फलंदाजीच करणारे काही असतात. प्रत्येक गोलंदाज हा फलंदाजी करतोच, पण प्रत्येक फलंदाज हा गोलंदाजी करतोच असे नाही. ऑस्ट्रेलियाचा लिंडसे हॅसेट हा गाजलेला फलंदाज. त्याने कधी गोलंदाजी केलेली नव्हती. १९३८ साली ब्रॅडमनच्या नेतृत्वाखाली तो प्रथम ऑस्ट्रेलियन संघातून इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला. मॅकेब आणि वेट हे त्या वेळी ऑस्ट्रेलियाचे आघाडीचे गोलंदाज फारसे प्रभावी नव्हते. यामुळे पहिली चार-पाच षट्के टाकून झाली की ओरेली व फ्लीटवुड स्मिथ या फिरक्या गोलंदाजाना गडी बाद करण्याचे मुख्य काम करावे लागे. अर्थात् हे दोघे बहुधा आपले काम चोख करीत असत. एकदा एका सामन्यात मात्र ऑस्ट्रेलियाची पंचाईत झाली. ओरेली व फ्लीटवुड स्मिथ हेदेखील हताश झाले. पहिलीच जोडी फुटेना! नॉटिंगहॅमशायरचा आघाडीचा फलंदाज कीटन हा चांगलाच सेट झाला

### स्लिपमधील स्लिप्स्!

क्षेत्ररक्षणात स्लिपमधील क्षेत्ररक्षकांना अत्यंत जागरूक राहावे लागते. या ठिकाणी झेल घेणे आणि सोडणे यावर कित्येक कसोटी खेळाडूंचे भवितव्य ठरत असते. स्लिपमधील झेल हे झेलावे लागण्यापेक्षा उचलावे लागतात. नुकत्याच झालेल्या इंग्लंड–ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यातील स्लिपमधील एक सुटलेला आणि पकडला गेलेला झेल.

होता. स्लिपमध्ये हॅसेटने ब्रॅडमनच्या मागे लकडा लावला, " मी एक षटक टाकून पाहू का ? " ब्रॅडमनने अनिच्छेने शेवटी चेंडू हॅसेटकडे दिला. प्रेक्षक हसू लागले. कीटनलाही गंमत वाटली. हॅसेटने पहिला चेंडू टाकला तो यष्टीच्या बाहेर ! बाहेरून वेडावाकडा जाणारा चेंडू सीमापार पाठवावा म्हणून कीटनने बॅट फिरवली. टोला निराळा लागला आणि स्लिपमध्ये फ्लीटवुड स्मिथ याच्या हातात झेल देऊन कीटन बाद झाला. कीटन-, झेल फ्लीवुड स्मिथ- गोलंदाज हॅसेट अशी पहिली विकेट पडण्याची नांदी झाली. तिकडे ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रांना तारा जात होत्या. पहिली विकेट पडताच तार गेली. तिथला लेखनिक बुचकळयात पडला. त्याने विचार केला की तार पाठवतानाच घोटाळा झाला असावा. दुसऱ्या दिवशी सर्व ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रांत त्याने सुधारलेली बातमी दिली, कीटन-झेल हॅसेट गोलंदाज-फ्लीटवुड स्मिथ ! हॅसेटला आपण घेतलेला पहिला बळी ऑस्ट्रेलियातील क्रिकेट षोकिनांना कळलेलाच नाही ही गोष्ट दौरा संपून परत आल्यावर कळली.

## २ : 'कठिण समय येता बर्ज कामास येतो !'

ऑस्ट्रेलियाचा क्वीन्सलंड येथील खेळाडू पीटर बर्ज याचे नाव, नुकत्याच संपलेल्या इंग्लंड-ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्याने सर्वतोमुखी केले आहे. पीटर बर्जचे वजन २०० पौंड आहे आणि तो एवढा धिप्पाड आहे की त्याच्याबरोबर सुप्रसिद्ध मुष्टियोद्धा रॉकी मार्सियानो याला फलंदाजीला पाठवला तरच जोडी शोभून दिसावी ! १९५६ सालापासून तो ऑस्ट्रेलियन संघात दाखल झाला. परंतु बहुधा त्याला कसोटी सामन्यातून गचांडीच मिळे ! दोन कसोटी सामन्यातील साधे सामने त्याला खेळावे लागत. १९५९ साली तो भारतात आला होता व भारताविरुद्ध देखील ऑस्ट्रेलियाने त्याला कसोटी सामन्यात खेळू दिले नाही. परंतु त्याचा खेळाचा दणका असा आहे की जेव्हा जेव्हा तो धावा करी तेव्हा क्षेत्ररक्षकांची धाबी दणाणून जात असत. १९६१ साली अॅडेलेड येथील सामन्यात रिची बेनोने त्याला संघात मुद्दाम घेतले होते. कारण हार्वे हात दुखवल्यामुळे खेळू शकत नव्हता. बेनोने बर्जचा आग्रह धरला. क्वीन्सलंड येथून निघताना बर्जने सांगितले, " एकतर यापुढे मी कसोटी सामन्यात कायमचा दाखल होईन किंवा माझ्या क्रिकेट-कारकीर्दीचीच इतिश्री होईल ! " अॅडेलेड सामन्यात वेस्ट इंडियन ऑस्ट्रेलियाचे पहिले चारपाच फलंदाज भराभर बाद केले. रिची बेनो नाबाद होता. बर्ज खेळायला आला. तो पिचजवळ येताच बेनो त्याला म्हणाला, " हे बघ, मागे वळू नको ! प्रत्येक चेंडू पुढे जाऊन फटकारलास तरच




तगडा पीटर बर्ज !

धडगत लागेल. " बर्ज आला तो गोलंदाजी झोडपीत सुटला. त्याच वर्षी इंग्लंडच्या ओव्हल मैदानावर त्याने १८१ धावा काढल्या. नुकत्याच झालेल्या इंग्लंडच्या दौऱ्यात हेडिंग्ले येथील सामन्यात बर्जने हॉकच्या मदतीने १६० धावा काढून ऑस्ट्रेलियाला सामना जिंकून दिला :

असा हा धाडसी बर्ज देखील शकुन-अपशकुन मानतो ! फलंदाजीला जाताना प्रथम तो डाव्या पावलालाच पॅड बांधतो आणि मग उजव्या. इतकेच नव्हे तर पॅव्हेलियनबाहेर पडताना तो जोडीदाराच्या डाव्या बाजूनेच चालतो. अजूनपर्यंत तो मागे का पडला याचे कारण तो म्हणतो, " मी जेव्हा खेळायला बाहेर येतो तेव्हा समजा, ऑस्ट्रेलियाची धावसख्या दणदणीत झालेली असली तर मला खेळायला मजाच वाटत नाही. " यंदाच्या कसोटी सामन्यात म्हणूनच बर्ज चमकला. कारण लॉरी, ओनील, सिम्पसन चटाचट बाद झाले की बर्जच्या अंगात वीरश्री संचरे आणि हे या दौऱ्यात अनेक वेळा झाले ! !

• • •

चार हातातून झेल सुटला !
बूथने बायकॉटला दिलेले जीवदान !



झेल उचलला,
वोल्हर्सच्या चेंडूवर सिम्सनने ट्रूमनला असे टिपले !



लोकसभा

# खरा नेता रुढ चाकोरीतून जात नाही

## मतलबी आक्षेपकांना शास्त्रींची चपराक

**अविश्वास-ठरावावरील चर्चा**

शास्त्री-मंत्रिमंडळाविरुद्ध आलेल्या पहिल्याच अविश्वास-ठरावावर लोकसभेत सहा दिवस चर्चा होऊन तो ५० विरुद्ध ३०७ मतानी फेटाळला गेला. ठराव फेटाळला जाणार हे उघडच होते. पण सरकारी धोरण व कारभारावर विरोधी पक्षाची काय टीका आहे आणि सरकार त्याला कितपत समाधानकारक उत्तर देऊ शकेल या दृष्टीनेच अशा ठरावावरील चर्चेकडे पहावयास हवे. ही चर्चा वाचताना गेल्या वर्षी नेहरू-मंत्रिमंडळविरुद्ध आलेल्या अविश्वास-ठरावावरील चर्चेची आठवण होणे स्वाभाविक आहे. गेल्या वर्षीचा ठराव ६१ विरुद्ध ३४६ मतांनी फेटाळला गेला होता. म्हणजे विरोधकाना असलेला पाठिंबा गेल्या वर्षापेक्षा कमीच झाल्याचे दिसते.

**स्वतंत्र पक्षाच्या भूमिकेत बदल**

या दोन अविश्वास ठरावांचा विचार करताना लक्षात येणारा आणखी एक महत्त्वाचा फरक म्हणजे स्वतंत्र पक्ष आणि कम्युनिस्ट यांच्या भूमिकात झालेला बदल. गेल्या वर्षी स्वतंत्र पक्षाने ठरावाला पाठिंबा दिला होता. पण यावेळी त्यांचा गट दूर राहिला. कम्युनिस्ट गेल्या वर्षी तटस्थ राहिले होते. पण या वेळी त्यानी ठरावाला पाठिंबा दिला होता. आपल्या पक्षाच्या बदललेल्या भूमिकेचे स्पष्टीकरण करताना त्या पक्षाचे नवे खासदार श्री. नारायण दांडेकर यानी सागितले, की सध्याचे सरकार अधिकारावर येऊन फारच थोडे दिवस झाले आहेत. 'वाडवडिलाच्या पापांबद्दल मुलाला फाशी देणे' योग्य होणार नाही. पंतप्रधानाच्या अलीकडच्या काही निवेदनात आम्हाला वास्तवतेची जाणीव दिसत आहे. विशेषतः नियोजनात पूर्वी मोठ्या उद्योगधद्यावर अवाजवी कर दिला जात होता. त्याऐवजी लोकाच्या नित्याच्या गरजा भागविणारे उत्पादन वाढविण्यावर भर दिला पाहिजे असे पंतप्रधान प्रतिपादू लागले आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले.

नेहरू मंत्रिमंडळातील मोरारजी देसाई, स. का पाटील यांसारखे उजव्या गटाचे मंत्री प्रतिगामी आहेत, त्याना काढून टाकावे अशी भूमिका गेल्या वर्षीच्या ठरावावर कम्युनिस्टानी घेतली होती. म्हणजे त्याचा विरोध सबंध मंत्रिमंडळाला नव्हे तर काही मंत्र्यांना होता. यावेळी मात्र ठराबाला पाठिंबा देऊन त्यानी सबध मंत्रिमंडळालाच विरोध केला. नेहरूंच्या धोरणापासून सरकार दूर जात आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेसाठी नेहरूनी नियोजित केलेली उद्दिष्टे खाली आणण्याचा प्रयत्न चालू आहे हा त्याच्या टीकेचा मुख्य रोख होता.

दोन ठरावाच्या चर्चेत जाणवलेला आणखी एक बदल म्हणजे गेल्या वर्षी आचार्य कृपलानीनी ठराव मांडण्यात पुढाकार घेतला होता. पण या वर्षी त्यानी ठरावाला पाठिंबा दिला नाही. ठरावाला कम्युनिस्टाचा पाठिंबा आहे म्हणून आपण त्यापासून दूर राहत आहोत असे कारण त्यानी सागितले.

सखोल अभ्यास व बिनतोड युक्तिवाद विरोधी खासदारांच्या भाषणातून फारसा दिसून आला नाही. सर्वसामान्य स्वरूपाचे आरोप करण्यावरच त्याचा भर होता. गोपालन याच्या भाषणात मात्र काहीशी अभ्यासपूर्ण टीका दिसून आली. पगारवाढ झाली असली तरी वाढत्या महागाईच्या मानाने ती अत्यत अपुरी असून प्रत्यक्षात खऱ्या पगाराचे प्रमाणात कशी घट झाली आहे हे त्यानी रिझर्व बँकेच्या पाहणीचे आधारे दाखवून दिले. दोन योजनाच्या काळात कामगाराच्या खऱ्या पगारात ९ टक्के घट झाली तसेच शेतमजुरांच्या पगारात ११ टक्के घट झाली आणि मध्यवर्ति सरकारी नोकराच्या पगाराचे बाबतीत तर ही घट १६ टक्के आहे, असे त्यानी सागितले.

---

[ पान ३६ वरून चालू ]

कृपा, आणि कृष्णचा कृष्ण असेही, अगावर शहारे आणणारे उच्चार होते ! ! 'हत्यार' शब्दाचा उच्चार 'हत्त्यार' असाही केला जात होता ! एकंदरीत काय, ज्याला जास्त कळत होते त्याचे हाल होते !

शब्दांचे उच्चार तर चुकीचे होतेच पण वाक्याला अर्थ असतो व तो चुकीच्या शब्दावर जोर दिल्यामुळे अगर वाक्याची फोड चुकीची केल्याने काय अनर्थ ओढवतात हे विद्यार्थ्यांना समजू नय काय ? शांताराम आठवले यानी निर्दिष्ट केलेली दोन उदाहरणे मननीय आहेत. उदा० 'अहिल्येला देखील शिळा होऊन पडाव लागल' किंवा 'आई ! जगदबेला काळजी !' ही वाक्ये पहा. त्यातील शब्दांची फोड भलत्याच ठिकाणी झालीच पण शब्दावरील जोरही अनावश्यक ठिकाणी पडल्याने सारेच काही हास्यास्पद ठरले.

नव्या पिढीकडून उच्चारांची अगर शुद्धलेखनाबाबत जी हेळसाड होत आहे त्याचा विचार करणे अगत्याचे आहे ही गोष्ट या नाट्यवाचन-स्पर्धेमुळेच ध्यानात आली. अभिनयाने भारावून जाऊन प्रत्यक्ष नाटक पाहणाऱ्या प्रेक्षकाना हे दोष कदाचित जाणवत नाहीत. पण नाट्यवाचनात मात्र हे प्रकर्षाने जाणवते. याचमुळे या स्पर्धा आयोजित करून आजच्या विद्यार्थ्यांची पातळी काय आहे हे दाखवून दिल्याबद्दल पी. डी. ए. चे खास अभिनंदन !

• • •

# बिरेन मित्रांचा ओरिसातील गडबडगुंडा

### पंतप्रधान शास्त्रींचे उत्तर

अधिकारारूढ पक्षातर्फे पंतप्रधान शास्त्री, गृहमंत्री नंदा, अर्थमंत्री कृष्णमाचारी आणि निर्वासित पुनर्वसन मंत्री महावीर त्यागी यांची प्रमुख भाषणे झाली. शास्त्रींनी आपल्या शंभर मिनिटांच्या भाषणात विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना केवळ शाब्दिक कोटिक्रमाने टीका खोडून न टाकता देशापुढील प्रश्न सोडविण्यासाठी सरकार कोणते उपाय योजू पहात आहे हे विशद केले. धान्यप्रश्न व लाचलुचपती-नेच त्यांच्या भाषणाचा बराचसा भाग व्यापला होता. धान्यपरि-स्थितीचे दृष्टीने येते दोन महिने कठीण आहेत हे पूर्वी अनेकदा सांग-ण्यात आले तेच त्यांनी पुनः सांगितले. कमाल व किमान भावांसंबंधी तज्ञांची समिति आपल्या शिफारशी महिनाअखेर करील असे त्यांनी सांगितले. पण केवळ भावनियंत्रणाने प्रश्न सुटणार नाही. सरकार-जवळ पुरेसा साठा आणि कार्यक्षम वाटपव्यवस्था असल्याशिवाय भावनियंत्रण यशस्वी होत नाही. पण साठेबाजांविरुद्ध मोहिमेबाबत शास्त्री काहीच बोलले नाहीत.

लाचलुचपतीसंबंधी बोलताना मंत्र्यांवरील आरोपांबाबत ते म्हणाले, ' एखाद्या मंत्र्याविरुद्ध केलेला आरोप किंवा तक्रार प्रथमदर्शनी पुराव्यावरून सबळ आहे असे पंतप्रधान किंवा मुख्य मंत्र्यांनी सांगि-तल्यास त्या मंत्र्याने तावडतोब राजिनामा दिला पाहिजे. जेथे मुख्य-मंत्र्याविरुद्धच आरोप आहेत तेथे त्याने आपण होऊन राजीनामा दिला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

### रूढ चाकोरीने जाणार नाही

सरकार नेहरूंच्या धोरणापासून दूर जात आहे या टीकेस उत्तर देतांना शास्त्रींनी मूलभूत भूमिका आणि बदलत्या परिस्थितीप्रमाणे धोरणात करावा लागणारा बदल यात भेद केला. अंतर्गत क्षेत्रात लोकशाही व समाजवाद आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अलिप्ततेचे व शांततेचे धोरण ही नेहरूंची मूलभूत भूमिका आपण पुढे चालवू पण धोरणाच्या बाबतीत त्यांच्याच रूढ चाकोरीतून न जाता नवे मार्गहि आपण चोखाळू असे त्यांनी सांगितले व असे करणे म्हणजे मूलभूत भूमिकेपासून दूर जाणे नव्हे हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी रशियाचे पतप्रधान क्रुश्चेव्ह यांचा दाखला दिला व " रूढ चाकोरीतून जाण्याचे नाकारून नवा मार्ग अवलंबिणारे क्रुश्चेव्ह आधुनिक काळातील सर्वात मोठे मार्क्सवादी आहेत " असा त्यांचा गौरव करून पंतप्रधान म्हणाले, " खरा नेता रूढ चाकोरीतून जात नाही, कारण राजकीय जीवनात परिस्थिती, व्यक्ति, वातावरण बदलत असते. या बदलत्या परिस्थितीला उत्तर खऱ्या नेत्याने दिले पाहिजे."

सरकारच्या बाजूने अनेक काँग्रेस खासदारांपेक्षा प्रभावी भाषण अपक्ष-सभासद फ्रॅंक अँथनी यांनी केले. पर्यायी सरकार स्थापण्याचे सामर्थ्य नसता वारंवार अविश्वास ठराव आणणे ही संसदीय लोक-शाहीची थट्टा आहे असे त्यांनी सांगितले. काँग्रेसमध्ये कितीहि लाच-लुचपत व अकार्यक्षमता असली तरी तिच्यामुळेच देश अराजकापासून वाचला आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. ●

बिरेन मित्रा



### मुख्य मंत्र्यांचे राजिनाम्याचे नाटक

काँग्रेसच्या मध्यवर्ती नेतृत्वाचा वचक राज्यांतील नेत्यांवर राहिलेला नाही असेच ओरिसातील अलीकडच्या घटनांवरून दिसते. कामराज योजनेनुसार मुख्यमंत्री श्री. विजयानंद पटनाईक यांनी राजीनामा दिल्यानंतर श्री. बिरेन मित्र यांची काँग्रेसपक्षाचे नवे नेते व मुख्य मंत्री म्हणून निवड सप्टेंबर १९६३ मध्ये झाली. ही निवड एकमताने झाल्याचा देखावा करण्यात आला तरी वस्तुस्थिती तशी नव्हती. पक्षात दोन गट होते. काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे निरीक्षक हाफीज इब्राहिम यांनी दोन्ही गटांचे बळ अजमाविण्यासाठी गुप्त मतदान घेतले. त्यात मित्र यांना ६३ व त्यांचे प्रतिस्पर्धी शिक्षणमंत्री पवित्र मोहन प्रधान यांच्या गटास १५ मते पडली. दोन सभासद गैरहजर होते. एका वर्षात मित्र यांच्या गटाचे बळ वाढले व प्रधान गटाचे कमी झाले असे १८ सप्टेंबरच्या सभेत झालेल्या मतदानावरून दिसते. पण मित्रगटाचे वजन वाढले त्याबरोबर मित्र आणि त्यांचे काही सहकारी मंत्री यांच्याविरुद्ध आरोपही वाढत गेले. याचा परिणाम म्हणूनच की काय, श्री. बिरेन मित्र यांनी आपला राजिनामा सादर केला. पण हा राजिनामा हे एक बेमालुमपणे वठवलेले नाटकच होते असे ताज्या घडामोडीवरून वाटते. बिरेन मित्र यांच्या या नाटकाची काँग्रसश्रेष्ठींनाही अखेरपर्यंत कल्पना आली नाही आणि अखेर आपल्या धोरणाप्रमाणे त्यांना वागायला लावण्याऐवजी त्यांच्या वाग-ण्याचे समर्थन करण्याची पाळी पार्लमेंटमध्ये श्री. शास्त्री यांच्यावर आली.

लोकसभेत अविश्वास ठरावावर बोलताना मंत्र्यासबंधी तयार केलेली आचारसंहिता शास्त्रींनी सांगितली. पण त्याच दिवशी ओरिसात या आचारसंहितेचा भंग झाला. मुख्यमंत्र्यांचे वर्तन संशयातीत असले पाहिजे, त्याच्याविरुद्ध काही आरोप आल्यास त्याने आपण होऊन राजिनामा दिला पाहिजे असे शास्त्रींनी सांगितले. ओरिसाचे मुख्यमंत्री व काही मंत्र्याविरुद्ध राष्ट्राध्यक्षांकडे आरोपपत्र सादर करण्यात आलेले आहे. तेव्हा मित्र यांनी या कारणासाठी राजीनामा द्यावयास हवा होता. पण तसे करण्यात नामुष्की होती. आपल्या राजिनाम्याभोवती उदात्ततेचे वलय मित्र यांना निर्माण करावयाचे होते म्हणून त्यांनी विधानसभेतील विद्यार्थी दंगलीचा प्रसंग निवडला. आपला राजिनाम्याचा निर्णय ठाम आहे अशी कांग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची समजूत मित्र यांनी करून दिली. पण विधानसभा पक्षाची मात्र त्यांनी तशी समजूत करून दिली नव्हती. एकीकडे राजिनाम्याचा देखावा करायचा आणि दुसरीकडे पक्षाच्या बैठकीत आपल्या नेतृत्वावर विश्वासाचा ठराव पास करून घ्यावयाचा असा त्याचा डाव होता असे दिसते. माझी इच्छा राजिनामा द्यावयाची होती. पण पक्षाच्या इच्छेखातर मला मुख्य मंत्रिपदावर राहावे लागत आहे असा देखावा ते आज करीत आहेत.

ओरिसातील काही मंत्र्यावरील आरोपाबाबत काहीही निर्णय अजून घेण्यात आलेला नाही व चौकशी करण्यासारखी परिस्थिती आहे असेही सरकारने म्हटलेले नाही असे शास्त्रींनी सांगितले. "ओरिसातील काही मंत्री आणि माजी मंत्री याच्याविरुद्ध जे आरोप करण्यात आले आहेत त्यांच्या प्राथमिक चौकशीला सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनने सुरवात केली आहे आणि त्यापुढे काय करण्यात येईल हे प्राथमिक चौकशीच्या निकालावर अवलबून राहील", असे राज्यसभेत यापूर्वी गृहमंत्री नंदा यानी सागितले होते व सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगशनचे अधिकारी ओरिसाच्या राजधानीत येऊन गेल्याची बातमीहि वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती. मित्र मुख्यमंत्रिपदावर राहिल्याने चौकशीत अडथळा येणार नाही असे शास्त्रींनी सांगितले.

वास्तविक एका राज्यातील लोकनियुक्त मंत्रिमंडळातल्या काही मंत्र्यांविरुद्ध मध्यवर्ति सरकारच्या गुप्त पोलिसानी चौकशी सुरू करणे हा त्या मंत्र्याचाच नव्हे तर लोकशाहीचा अपमान आहे. एकतर या मंत्र्याना राजिनामा द्यायला सांगून चौकशी सुरु करावयास हवी होती किंवा कैरोंच्या चौकशीसाठी दास कमिशन नेमले तसे एखादे कमिशन नेमावयास हवे होते. तसे केले असते म्हणजे ओरिसाच्या राजकारणातील आजचा घोळ व गोंधळ टळला असता.

कांग्रेसश्रेष्ठींची कायम डोकेदुखी होऊन बसलेली दोन राज्ये आहेत. एक केरळ आणि दुसरे ओरिसा. वास्तविक ओरिसा विधानसभेत १४० पैकी ८५ म्हणजे मोठे बहुमत कांग्रेसमागे आहे. पण सत्ता हातून जाण्याचा धोका नसल्यामुळेच गटबाजी, गैरकारभार व लाचलुचपतीचा तेथे कळस झाला आहे.

### मंत्र्यांविरुद्ध केलेले आरोप

ओरिसा मंत्र्याविरुद्ध जे आरोप आहेत ते काही केवळ मित्र मुख्यमंत्री झाल्यापासूनचे नसून पटनाईक यांच्या वेळेपासूनचे एवढेच नव्हे तर मेहेताब यांच्या वेळेपासूनचे आहेत. यातील काही महत्त्वाचे आरोप पुढीलप्रमाणे :

● भुवनेश्वरच्या कांग्रेस अधिवेशनाचे व्यवस्थेसाठी सरकारी यंत्रणा राबविण्यात आली. त्यावेळचे मुख्यमंत्री पटनाईक यांनी सरकारी खातेप्रमुखाशी चर्चा करून व्यवस्थेची योजना आखली. ओरिसातील विरोधी पक्षाच्या आठ खासदारानी याबद्दल निषेध व्यक्त करणारे पत्रक ऑगस्ट १९६३ मध्ये काढले होते.

● पटनाईक व मित्र यांनी अधिकारपदाचा उपयोग स्वार्थी हेतूसाठी केला. दोघाच्या बायकांच्या नावाने चालविल्या जाणाऱ्या कंपन्यांनी ओरिसा सरकारशी करार केलेले आहेत. प्रदेश कांग्रेसच्या हिशोबाची तपासणी गेली तीन वर्षे झालेली नाही. भुवनेश्वर कांग्रेससाठी किती खर्च आला हे दीड वर्ष होऊन गेले तरी स्वागत समितीला अजून सागण्यात आलेले नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामासाठी मजुरांच्या बनावट सहकारी संस्था बनविल्या जातात. त्यांना लाखो रुपये दिले जात आहेत असे आरोप ओरिसा कांग्रेसमधील बंडखोर गटाचे तीन आमदार व एका पंचायत समितीचे चेअरमन यानी कांग्रेस अध्यक्ष कामराज याना जुलै १९६४ मध्ये पाठविलेल्या संयुक्त पत्रात केले आहेत.

● मित्र यानी १९५१ ते १९५६ या काळात सिराजुद्दिन आणि कंपनीकडून दीड लाख रुपये कांग्रेसकार्यासाठी घेतले पण ते प्रत्यक्षात कांग्रेस कार्यासाठीच खर्च केले काय असा प्रश्न गेल्या वर्षी जुलैत ओरिसाचे माजी मुख्यमंत्री डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनी उपस्थित केला होता. पण त्याला उत्तर देताना पटनाईक यानी मेहताब यांच्याहि हालचालीवर प्रकाश पाडला. सिराजुद्दिन कंपनीला क्रोमाइट खाणीचे लीज मेहताब याच्या शिफारशीमुळेच मिळाले. बिरेन मित्र त्यावेळी मेहताबाचे उजवे हात होते, असे पटनाईक यांनी या पत्रकात म्हटले आहे.

● 'ओरिसा एजटस' ही बिरेन मित्र यांच्या पत्नीच्या नावाची कंपनी आहे. मित्र मंत्री असताना त्यानी या कंपनीस तीन कॉन्ट्रॅक्टस दिली तेव्हां विधानसभेच्या सभासदत्वास त्याना अपात्र ठरवावे असा अर्ज एन्. सी. महती यानी ओरिसा गव्हर्नरकडे केला होता. त्यानी तो निवडणूक कमिशनरकडे सोपविला. आरोप सिद्ध झालेला नाही असा निर्णय कमिशनने दिला असला तरी हा अर्ज फार उशीरा म्हणजे चार वर्षांनंतर करण्यात आला. तसेच निवडणूक कमिशनला फार अपुरे अधिकार आहेत; साक्षीदारांना बोलावणे, त्याची शपथेवर साक्ष घेणे, कागदाचे दाखले करण्यास भाग पाडणे हे कमिशनस् ऑफ इन्क्वायरी ॲक्टखाली नेमल्या जाणाऱ्या कमिशनला असलेले अधिकार निवडणूक कमिशनलाहि असले पाहिजेत असे कमिशनने निकालात म्हटले आहे ते महत्त्वाचे आहे.

● ओरिसातील अधिकारारूढ पक्षाच्या कारभारात गैरप्रकार, वशिलेबाजी, पक्षपात, दडपशाही, छळणूक मोठ्या प्रमाणात लाचलुचपत चालू आहे असा आरोप ओरिसाच्या ६३ नेत्यानी राष्ट्राध्यक्षाच्या ऑगस्ट १९६४ मध्ये पाठविलेल्या निवेदनात केला असून चौकशी कमिशन नेमण्याची मागणी त्यात केली आहे.

या निरनिराळ्या आरोपाबाबत सत्य शोधावयाचे तर दास कमिशनच्या धर्तीवर कमिशन नेमणे हाच एक योग्य मार्ग आहे. ते नेमण्यास जितका विलब होईल तितके राज्यकर्ते अधिक अप्रिय होऊन असंतोष वाढत जाईल. ●

# हिंदी महासागरावर सत्ता कोणाची?

## लष्करी तळांसाठी बड्यांच्या चालू असणाऱ्या हालचाली

हिंदी महासागर आता बडया राष्ट्रांच्या राजकारणाचे क्षेत्र होऊ लागला आहे असे गेल्या काही दिवसातील हालचालीवरून दिसते. सेचेल्स बेट किंवा मॉरिशस बेट समूहापैकी एखाद्या बेटावर संयुक्त तळ स्थापण्याचे दृष्टीने ब्रिटन–अमेरिका पाहणी करीत आहेत अश्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. अण्वस्त्रसज्ज पाणबुडयाचा तळ येथे होणार असेल तरी हिंदी महासागर बडया राष्ट्रांच्या संघर्षाचे क्षेत्र बनणार काय अशी चिंता व्यक्त करण्यात येऊ लागली. तेव्हा हा अण्वस्त्राचा किंवा इतर शस्त्राचा लष्करी तळ नसून केवळ दळणवळण केंद्र व एक टप्पा म्हणून याचा उपयोग केला जाणार आहे असे स्पष्टीकरण ब्रिटन–अमेरिकेने केले. अटलांटिक व पॅसिफिक महासागरात पाश्चात्य राष्ट्राचे हितसंबंध सुरक्षित राखण्याच्या जबाबदारीत अमेरिकेने मोठा वाटा उचललेला आहे. अमेरिकेचे सहावे व सातवे आरमार या बाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावीत आहे. हिंदी महासागरात ब्रिटनने या बाबतीत मदत करावी अशी अमेरिकेची अपेक्षा आहे. व त्या दृष्टीनेच हे तळ उभारण्यात येत आहेत.

चीनच्या आक्रमक हालचालीमुळे हिंदी महासागराच्या संरक्षणाला एक निराळे महत्त्व प्राप्त झाले आहे. पाश्चात्यांच्या लष्करी तळाचे साखळीत पुरेसे लष्करी तळ जेथे नाहीत असा हिंदी महासागर हाच एक कच्चा दुवा आहे. ही पोकळी अशीच राहू दिली तर चीन ती भरून काढील आणि या सागराकाठच्या राष्ट्राचे स्वातंत्र्यास धोका निर्माण होईल म्हणून या भागात तळ किंवा दळणवळण केंद्रे आम्ही उभारीत आहोत असे पाश्चात्य राष्ट्रांचे समर्थन आहे.

चिनी धोक्यापासून तुमचे रक्षण करण्यासाठी हे तळ किंवा केंद्रे उभारली जात आहेत असे कितीहि भासविण्यात येत असले तरी त्यामागील मुख्य उद्देश ब्रिटिश हितसंबंधाचे रक्षण करण्याचा आहे. एडन किंवा सिंगापूरमध्ये उठाव झाल्यास ताबडतोब लष्करी मदत पाठविता यावी हा त्यामागील उद्देश आहे.

### तळाबरोबर परकीय वर्चस्व


हिंदी महासागरातील या तळाच्या हालचाली ऑस्ट्रेलियाचे दृष्टीनेहि महत्त्वाच्या आहेत. ऑस्ट्रेलियाच्या वायव्य किनाऱ्यावर एक्समथ आखाताच्या भागात अमेरिकेला रेडिओ दळणवळण केंद्र उभारू देण्यास ऑस्ट्रेलियाने या पूर्वीच मान्यता दिली आहे. या केंद्रावर आमचेच नियंत्रण राहील अशी अट अमेरिकेने घातली होती व ती मान्य करणे ऑस्ट्रेलियाला भाग पडले. परकीय तळांबरोबर परकीय वर्चस्व येते ते असे. आता असेच केंद्र चागोस द्वीपकल्पाच्या भागात अमेरिका उभारू पहात आहे.

को को बेटे इग्लंडने ऑस्ट्रेलियाला १९५० साली दिली तेथे इंग्लंडचे केबल व वायरलेस स्टेशन तसेच आंतरराष्ट्रीय विमान तळ आहे.

### रशियाच्या हालचाली

पाश्चात्याच्या याप्रमाणे तळाच्या हालचाली चालू असल्या तरी हिंदी महासागरात त्यांना मुक्तद्वार मिळणार नाही, कारण रशियाचेहि या भागाकडे लक्ष आहे. इंडोनेशियाला रशियाने बोटी, विमाने, शस्त्रे व तांत्रिक मदत देऊ केली असून अँबन येथे अण्वस्त्रसज्ज पाणबुड्यांचा तळ रशिया उभारण्याची शक्यता आहे. अर्थात असा तळ एवढ्यात उभारला जाणार नाही; पण असे तळ उभारण्याच्या पाश्चात्य राष्ट्राच्या हालचाली दिसल्या तर मात्र रशियाहि त्या दिशेने हालचाल करील.

**– समीक्षक**




पाश्चात्य राष्ट्रांच्या हितसबधाच्या रक्षणासाठी हिंदी महासागरात सेचेल्स किंवा मॉरिशस बेटावर तळ उभारण्याच्या इंग्लल–अमेरिकेच्या हालचाली चालू आहेत. अण्वस्त्रसज्ज पाणबुडयाचा तळ आम्ही येथे उभारणार नाही असे त्यानी जाहीर केले असले तरी असा तळ त्यानी पुढेमागे उभारलाच तर त्याला शह म्हणून इडोनेशियात अँबन येथे रशिया तळ उभारण्याची शक्यता आहे.

सौ. प्रेमसागर



चित्रपट

# मर्चंट आयव्हरी प्रॉडक्शन्सचा

# घरबार

## दर्शनी समाधान!

**कथा अगदी साधी आहे.**

एका शाळा मास्तरचा नवा संसार हा चित्रपटाचा विषय. त्याची पत्नी आहे खेड्यात वाढलेली. हिंदोळ्यावर बालपण आणि ऊस सोलून खात, तरुणपण उंडारलेले. शहरी संस्कृतीचा पुरेसा गंध नाही. नवऱ्याने मिळवावे, आपण घर सांभाळावे एवढीच तिची अपेक्षा. परंतु शाळामास्तरच्या संसारात कमाई फारच अपुरी. सुरुवातीला दोघांचे स्वभाव एकमेकांना परके. पैशाचे सोंग आणता येणे शक्य नसल्यामुळे, लहान सहान गोष्टीही आपल्याला संसारात पारख्या होत आहेत. जेमतेम उदरभरणच करू शकतो या जाणीवेमुळे मनाचा कोंडमारा होणारा पती. घरी आल्यावर किरकोळ कारणावरून तो चिडतो–मांडतो. त्यातच तिला दिवस जातात. पहिल्या मुलाचा आनंद त्याला जाणवतच नाही का ? आनंद जाणवतो आणि संसारात येणारा हा नवा पाहुणा नकोसाही वाटतो. बायकोलाहि यावेळी हे सर्व नकोसे वाटते. पती म्हणतो,

" यावेळेला कशाला ? बाळंतपणाचा खर्च. हे सर्व कसं भागायचं ? " पत्नी निराशेने घेरलेली असतेच. जीवनातला आनंदाचा क्षण असा घरंगळतो. ती विषादाने म्हणते,

" ही काय माझी एकटीची चूक ? " दृश्य इथेच संपते. सुबुद्ध मध्यमवर्गीय प्रेक्षक या दृश्याने हलतो.

तरुण सुंदर पत्नीचे अस्तित्व कधी त्याच्या वृत्ती भरास आणतात. दोघे बहरतातही. पण हे अपवादाने घडते. धुसफुस हाच नियम असतो. पती पगारवाढ व्हावी यासाठी लाचार होतो. अपमान सहन करतो. वरिष्ठांपुढे पोतेरे होतो. पगारवाढ मिळतच नाही. शिकवतानाही तो तंद्रीत राहातो. वर्ग चेकाळतो. सहशिक्षक त्याला दम भरतात–' तुमच्या वर्गाचा आम्हांला त्रास होतो. ' हे सर्व मुलांच्या देखत घडते. हा अपमान त्याला जिव्हारी लागतो. सहशिक्षक वरिष्ठाकडे तक्रार करून नोकरी हातची घालवीन अशी धमकी देतो. पुन्हा यालाच पराभूत होऊन क्षमा मागावी लागते. त्याला वाटते लग्न केले हीच चूक झाली.

पत्नीला वाटते आपले माहेरी असतानाचेच दिवस सुखाचे गेले. आता कसले सुख ? आपण शिकलो नाही. पतीबरोबर कधी कुठे चहा-फराळाला गेलो तर बशीतले पदार्थ बेताबेताने खावेत, हे देखिल आपल्याला कळत नाही. आपण असा अर्धवटपणा करतो म्हणून पतीला आवडत नाही.

तितक्यात तिच्या सासुबाई तिच्या बाळंतपणासाठी येतात. आपल्याशिवाय घरातले पान हलू नये असे अजून आईला वाटते. आपण सासूशी कसे वागत होतो, नवऱ्याचे आपल्यावर किती प्रेम होते, घर, संसार कसा टापटिपीचा ठेवीत होतो ? आणि या सुनेला सासूची कदर नाही, घराची टापटीप नाही. सुनेला हा विचित्र सासुरवास असह्य होतो. ती माहेरी जाते. आई आणि मुलगाच माग उरतात.

आता त्याला सारखी बायकोची सतत आठवण येते. त्याची स्थिती पाहिली की आई त्रागा करते. " मी कुणाला नको आहे, माझं कोण आहे ! " हा जप सुरू होतो. हे ऐकणे असह्य होऊन मुलगा बायकोसाठी कौतुकाने आणलेले कापड, ' तुलाचं आणलंय ' असं सांगून आईला देतो. आई खुलते. मग एक दिवशी बायको परत येते. तोच तिला पत्र पाठवून बोलावून घेतो. दोघांच्या लक्षात येते की दोघांचे एकमेकांवर प्रेम आहे. येवढ्यात त्याच्या वहिणीच्या मुलीचे लग्न ठरते. तो वहिणीला पत्र लिहितो, 'आईला बोलावून घे. तुझ्या मदतीसाठी. आग्रहानं बोलाव. तार कर." तार येते. त्याची आई सांगते, " बाबा. मला जायला हवं. मी गेल्याशिवाय का उरक पडणार आहे तिथे ? म्हणून तर तिनं तार केली. मला गेलंच पाहिजे. " आई जाते. आपल्या स्वतःच्याच आयुष्याच्या कोषात अजून घुटमळणारी सासू जाताच, त्याच तुटपुंज्या संसाराची मालकीण सुखावते. कारण आता सुरुवातीचे ' दुधाचे दात ' पडले आहेत. आपण दोघेजण एकमेकांवर प्रेम करतो याचा साक्षात्कार दोघांना झाला आहे.

### मजेदार उपकथानक

या कथेला एक मजेदार उपकथानक आहे. एका अमेरिकन कुटुंबाशी या शाळामास्तराची मैत्री आहे. त्या कुटुंबातील तरुण भारतात आत्म्याचा शोध घेत आहे. त्याला मुक्ती हवी आहे. संसारापासून दूर जाण्याची कला, सर्वसंगपरित्यागातील सुख त्याला हवे आहे. त्याची भारतीय मैत्रिण आहे. तिला मात्र अमेरिकेचे वेड आहे. उत्तान हावभावाची मादक नृत्ये तिला आवडतात. तो अमेरिकन मित्र तिच्याबाबत निराश आहे. आपल्या शाळामास्तर मित्राला तो म्हणतो,

" तुम्ही भारतीय किती मोठे ! यू नो सो मेनी योगाज्. " मास्तर म्हणतात, " कसचं काय हो ? आम्ही तर आताशी कुठं डोकं वर काढतो आहोत. भिलाईचा पोलाद कारखाना, चित्तरंजनला रेल्वे एंजिनं, पहिली पंचवार्षिक योजना...... "

अमेरिकन मित्र म्हणतो, " छे, छे, आत्म्याविषयी सांग. मुक्ती कशी साधता ते सांग. "

आज भारतातील जनतेकडे बाहेरून पाश्चात्य कोणत्या दृष्टिकोनातून पाहतात, याचा प्रत्यय हा चित्रपट पाहून येतो. भौतिक सुखाचा अतिरेक होऊन, आज अमेरिकन माणूस भारतामध्ये शांतीच्या शोधार्थ येतो. उलट इथल्या मध्यमवर्गीय माणसाला भौतिक प्रगतीचे आलेख म्हणजे आपली प्रगती, असे वाटते. कमीत कमी गरजातही इथे माणसे सुखाने ससार करतात. घटस्फोट अपवाद आहेत. हे कोडे अमेरिकन माणसाला पडते. याच भूमीत अध्यात्माचा विचार रुजतो हे त्याला माहीत आहे. याच मार्गाने शाती मिळविण्यासाठी जिज्ञासू इकडे येतात. प्रत्यक्षात मात्र इथल्या संसारातील दु:खे केवळ त्या संसारी माणसालाच जाणवतात. रशियात राजकपूर-नर्गिस यांचे कौतुक वाटावे आणि सत्यजित रें ना अमेरिकेत बाजार मिळावा याचा उलगडा आता त्वरित होतो. दारिद्र्यातील सुख हे अमेरिकेला कौतुक आहे आणि श्रीमंती नाचगाणी ही रशियन जनतेची भूक आहे. जे ज्याना मिळत नाही, ते मिळवण्यासाठी दोन टोकाची ही माणसे धडपडत आहेत.

## अभिनय उत्तम

शशी कपूर यानी केलेले (प्रेमसागर) शाळामास्तरचे काम आणि लीला नायडू यानी केलेली त्याच्या पत्नीची (इदू) भूमिका ही अप्रतिम वठली आहेत. लीला नायडू यांच्या बोलक्या डोळ्याच्या दिग्दर्शकाने कल्पकतेने उपयोग केला आहे. छायाचित्रण आणि सकलन ही दोन्ही अत्यंत प्रभावी आहेत. चित्रपटाला पार्श्वसंगीत दिले आहे अली-अकबरखाँ व जयदेव यानी. 'किनारे किनारे' चित्रपटाच्या परीक्षणात जयदेव यांच्या सगीत-दिग्दर्शनाचा आम्ही गौरव केलाच होता.

अर्थात् चित्रपटभर उत्तम पार्श्वसंगीत आहे ते सिलोन रेडिओचे. घरातले सवाद चालू असताना, वा हॉटेलातील दृश्यात लाळ गळावी तसा सिलोन रेडिओ बोर्नव्हिटाच्या, कॅडबरीच्या जाहिराती ओकत असतो. लग्नसमारंभात रेकॉर्ड चालू असते, "कोई मुझे जगली कहे!" त्यामुळे चित्रपट पाहत असताना आपण चित्रपट पाहत आहोत हेच विसरतो. शेजारच्या घरातली, आसपासची दृश्येच पाहात आहोत असे वाटते. चित्रपटाने पेललेली ही वास्तवता हे केवढे मोठे यश आहे! आणि ही वास्तवता केवळ वाझोटी नाही. आपल्या जीवनात शिरलेल्या सिनेसगीतावरचे हे जीवघेणे भाष्य आहे. चित्रपटात नृत्य नाही. कथा नर्तिकेच्या जीवनावर नसेल तर चित्रपटात नृत्य कसे येते हा भारतीय प्रेक्षकाना नेहमी पडणारा प्रश्न या चित्रपटात उपस्थित होत नाही. जेम्स आयव्हरी याचे दिग्दर्शन, सत्यजित रे यांच्या चाकोरीबाहेर रेसभर जात नाही. दाढी करणारा माणूस दाखवून ते सकाळ सूचित करतात. ज्या घरात कथा आकार घेते त्याची संपूर्ण कल्पना कॅमेरा प्रेक्षकाना देतो. हे कसबही दिग्दर्शकाचेच म्हणायला हवे.

## नायकाला पोटही आहे!

सर्व चित्रपटभर आम्हाला विशेष अप्रूप वाटत होते ते याचे की या हिंदी सिनेमातला नायक पोटाचा उद्योग करतो! या उद्योगातील म्हणजे मास्तरकीतील मान, अपमान, त्याची पत्नी, संसारातल्या त्याच्या व्यथा यांचा हा चित्रपट आहे. चागले दिग्दर्शन, यशस्वी छायाचित्रण, कलापूर्ण सकलन, आणि समजूतदार भूमिका या सर्वांमुळे हा चित्रपट एक चागला चित्रपट झाला आहे. ही कथा रूथ झावबाला याची असून त्यानीच पटकथा व संवाद लिहिले आहेत.

स्वभावपरिपोषाच्या दृष्टीने यातल्या भूमिका सुसगत आहेत. अपवाद आहे तो सासूच्या चित्रणाचा. तिच्या सासुरवासाचे स्वरूप ठोकळेबाज व कृत्रिम वाटते. मुलावरील प्रेमापोटी सुनेवर जे सूक्ष्म अन्याय होतात, तेवढेच दाखवले असते तरी चित्रपट अधिक उंचीवर गेला असता.

## कांही संभ्रम

चित्रपटाला कथानकाचा धागा त्रोटक असल्यामुळे चित्रपट अपुरा वाटतो. नवऱ्याला सोडून गेलेली पत्नी ही परत येते ती नवऱ्याच्या ओढीमुळे, हे तर्काने जाणावे लागते. नवरा तिला पत्र लिहितो म्हणावे तर लिहिलेले पत्र तो फाडून टाकतो असे दाखवले आहे. अर्थात चागल्या वास्तवकथेचा सुखान्त शेवट हा नेहमीच अपुरा वाटतो. याचे मुख्य कारण वातस्तवता अखेरपर्यंत पेलावयाचीच तर *अशा कथावस्तूला शेवटच* नसतो. म्हणूनच हा चित्रपट अचानक सपतो व प्रेक्षक काहीसे संभ्रमात पडतात.

अखेरच्या दृश्यात दोघे पति-पत्नी मित्राच्या लग्नसमारंभातून बसमधून घरी परतत आहेत असे दृश्य आहे. तो आपल्या हातातील पुष्पमाला तिच्या हातात देतो. ती त्याला खेटून बसली आहे. दोघाच्या दृष्टीत आपला विवाह झाला, ही किती सुखदायक घटना आहे याचा आनद भरला आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणात सासूला जे कृत्रिम महत्त्व दिले गेले त्याचा परिणाम असा होतो, की या दोघाच्या सुखात फक्त सासूचाच अडसर होता व ती निघून जाताच, दोघे सुखी झाली असा प्रेक्षकांचा चुकीचा समज होतो. दिग्दर्शकाला हे अभिप्रेत नाही असे वाटते.

चित्रपटाची श्रेयनामावली, सुरुवातीला दिलेले मनुस्मृतीतील वचन, शेवटचे आभार प्रदर्शन हे सर्व इंग्रजीत आहे. शाळामास्तर प्रेम सागर व त्याचा अमेरिकन मित्र याचे होणारे संभाषण हे इग्रजीतच आहे. याचा परिणाम प्रेक्षकांवर वाईट होतो. काहीतरी महत्त्वाची गोष्ट आपल्याला समजलीच नाही, असे इग्रजी न समजणाऱ्या प्रेक्षकाला वाटते व तो नाराज होतो. इंग्रजी सभाषणाचा हिंदी तर्जुमा 'डब' केला असता तरी चालले असते.

चित्रपटाच्या सुरुवातीपासून वाटत होते की, या चित्रपटावर सत्यजित रे याच्या 'अभिजान' 'महानगर' आदि कलाकृतीची छाप आहे. चित्रपट सपल्यावर चित्रपटासाठी ज्यानी सहकार्य केले त्याची नावे आहेत. त्यात अग्रभागी नाव येते सत्यजित रे!

चित्रपटाचे हे सर्व यश मान्य करूनही सत्यजित रे यांच्या चित्रपटांशी तुलना करता, हा चित्रपट संपूर्ण निर्दोष कलाकृती वाटत नाही. याचे कारण रे यानीच एका ठिकाणी सागितले आहे. ते म्हणतात,

"No council of any sort can ever hope to improve the artistic standard of our films; for that is a matter of individual talent and the requisite talent is either there or not there."

या चित्रपटाचे दिग्दर्शक जेम्स आयव्हरी आणि निर्माते इस्माईल मर्चंट यांच्या बाबतीत एवढेच म्हणता येईल, की त्यानी 'गुरू तेथे ज्ञान' *हे ओळखून गुरू तरी मोलाचा* केला आहे! 'दर्शनी समाधान' आहे या भरंवशावर प्रेक्षकांनी या प्रयत्नाची कदर केली पाहिजे.

—महेश

# चकाटया

हंसतील त्याचे दात दिसतील (असले तर)

एका वकिलांनी मृत्युशय्येवरून मृत्युपत्र केलं. त्यात त्यांनी आपली सारी संपत्ति मूर्ख, वेड्या आणि मांडखोर माणसांना देऊन टाकली होती. " असं करण्याचं कारण ? " डॉक्टरानीं विचारले.

वकील म्हणाले, ' ही सारी संपत्ति मी ज्यांच्याकडून मिळविली त्यांनाच मी ती परत करून टाकीत आहे,

स्वयंपाकघरात काहीतरी धप्पकन् पडलं. पाठोपाठ कपाट उघडण्याचा आवाज आला, तसे मोरोपंत एकदम जागे झाले. त्यांनी मोठ्यानं विचारलं, ' कोण आहे रे आत ? '

' कुणी नाही–मी मांजर आहे ! ' आतून उत्तर आलं.

' मग हरकत नाही– ' डोक्यावरून परत पांघरूण घेत मोरोपंत पुटपुटले.

•

नानूला लकडीपुलावर एक चिनी माणूस भेटला. त्याने त्याला त्याचं नांव विचारलं. तेव्हा तो म्हणाला, ' शिक ! '

' शिक ? ' तुमचं नाव शिक आहे ? ' नानूने आश्चर्याने विचारले.

' अं–म्हणजे मी ते मराठीत भाषांतर करून सांगितलं. माझं खरं नाव " आऽऽक् छू आहे ! "

•

' मी एका विधवेशी लग्न केलं. या बाईना आधीची एक मुलगी होती. ती अर्थातच माझी सावत्र मुलगी ! माझ्या विधूर वडिलांनी तिच्याशी लग्न केलं. म्हणजे माझे वडिल माझे जावई व माझी मुलगी माझी सावत्र आई झाली. खरं ना ? '

' हो ! '

' मग तिची आई म्हणजे माझी आजी झाली. तिच्याशी मी लग्न केलं म्हणजे मी माझ्या आजीशी लग्न केलं. म्हणजेच मी माझाच आजोबा झालो ! '

•

'ती माझ्याशी फार वाईट रीतीनं वागली;

' माझ्याशीहि ! '

' असं ? '

' तिनं मला नकार दिला '

' मला तिनं होकार दिला ! '


•

माझ्या एका मित्राने एक प्रेमाचा ' सीन ' तब्बल पंचवीस मिनिटे सिनेमागृहात पाहिला–नि एकदम त्याच्या लक्षात आलं की आपण पडद्याच्या उलट दिशेला तोंड करून बसलो आहोत !

•







सिनेमागृहांतील चमत्कार

[ सोव्हिएत देशवरून ]

दसरा अंकातील दोन विशेष उल्लेखनीय लेख

# माणूस

## १ : समर्थ भारताच्या सुवर्ण युगाकडे ......

सद्य:स्थितीचे विश्लेषण, भावी प्रगतीची दिशा

## २ : दिल्ली कुठे आहे ?

चिनी आक्रमणाला दोन वर्षे झाली. देशात आणिबाणीची परिस्थिती असल्याचे सांगितले जाते. पण प्रत्यक्ष राजधानीत काय चालले आहे ? 'आणिबाणी' ची आच दिल्लीच्या राजकारणाला आणि राज्यकारभाराला लागली आहे का ?

'माणूस' ने आपला खास प्रतिनिधी पाठवून तयार केलेला एक वृत्तलेख.

शिवाय निवडक कथा ...

'नाझी भस्मासुर' लेखमालेचा पुढील हप्ता

नेहमीची सदरे. आणिही इतर पुष्कळ

**किंमत सव्वा रुपया : प्रसिद्धी : दि. १५ ऑक्टोबर १९६४**


- पंचवीस टक्के कमिशन वजा करून एजंटांनी रक्कम पाठवून वेळेवर मागणी नोंदवावी.
- किरकोळ प्रत रजि. बुक-पोस्टने दीड रुपया केवळ

माणूस, ४१९ नारायण पेठ पुणे, २.

MANOOS FORTNIGHTLY : 1 OCTOBER 1964 : FIFTY TWO PAISA R. N. B 9304


# सवलतीच्या दोन आकर्षक योजनांची

## लोकाग्रहास्तव केलेली मुदतवाढ



# राजा शिवछत्रपती

भाग एक ते दहा

लेखक : ब. मो. पुरंदरे

प्रसिद्धी : डिसेंबर १९६४

दीड हजार पृष्ठांच्या ज्या साधार पण ललितरम्य शिवचरित्राने मराठी वाचकाला आजवर एक अपूर्व मोहिनी घातली,

जो ग्रंथ प्रत्येक मराठी भाषिकाच्या घरी असावा यासाठी आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी अव्वल आणि मातब्बर मंडळी लेखद्वारा, पत्रद्वारा, संभाषणातून वा भाषणातून आपला अमोल शब्द वेचीत आहेत,

तो हा ग्रंथ सर्वसामान्य परिस्थितीतील मराठी माणसाला विकत घेऊन संग्रही ठेवता यावा म्हणून –**राजहंस प्रकाशन संस्था**

सवलतीच्या पुढील दोन योजना जाहीर करीत आहे.

**१ : राजहंस प्रकाशन संस्थेकडे पांच वर्षांसाठी शंभर रुपयांची ठेव ठेवणारास हे संपूर्ण शिवचरित्र व्याजाच्या मोबदल्यांत विनामूल्य घरपोच दिले जाईल. पांच वर्षांनंतर ठेव परत करण्यात येईल. यासंबंधी अधिक तपशील हवा असल्यास पत्रकाची मागणी संस्थेकडे करावी.**

**२ : या तृतीय आवृत्तीच्या संपूर्ण शिवचरित्र संचाची किंमत प्रसिद्धीनंतर रुपये पसतीस राहील. १५ नोव्हेंबर १९६४ पर्यंत रुपये पंचवीस फक्त पाठवून प्रसिद्धिपूर्व ग्राहक होता येईल.**

[ **संच पोस्टाने हवा असेल तर रजि. पोस्टखर्चासाठी अडीच रुपये अधिक पाठविणे.** ]

ठेवीची वा प्रसिद्धिपूर्व ग्राहकाची रक्कम ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

चेक असल्यास शक्यतो पुणे-मुंबई येथील बँकेवरचा पाठवावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास वटणावळ ७५ न. पै. अधिक पाठवावेत.

चित्रकार दीनानाथ दलालांची शंभरहून अधिक रेखाचित्रे व आकर्षक मुखपृष्ठे, ऐतिहासिक स्थळांची व व्यक्तींची छायाचित्रे, पांढरा शुभ्र कागद, मोहरदार छपाई, टिकाऊ बांधणी–या व इतर वैशिष्ट्यांनी युक्त असल्याने, एका सुबक पेटीतून वाचकांच्या भेटीस येणारा हा संच म्हणजे प्रत्येक कुटुंबाचे, प्रत्येक ग्रंथालयाचे एक भूषणच ठरणार आहे.

## राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रायव्हेट लि.,